# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ सोमवार १६ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## भारत आता स्वतःच्या अटींवर करार करतो



### ३८ देशांशी झालेल्या ट्रेड डील्सवर पीएम मोदींचे भाष्य

**नवी दिल्ली /वृत्तसंस्था-**: अमेरिका आणि युरोपियन युनियनसोबत झालेल्या व्यापार करारांबाबत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताची आर्थिक दिशा, सुधारणा, खासगी क्षेत्राची भूमिका, संरक्षण क्षेत्र आणि डिजिटल एआय भविष्यावर सविस्तर भाष्य केले. वृत्तसंस्था पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधान मोदी म्हणाले की, राजकीय स्थैर्यामुळे भारतातगुंतवणूकदारांचा विश्वास पुन्हा वाढला आहे. मजबूत मॅन्युफॅक्चरिंग सेक्टर, सेवा क्षेत्र आणि एमएसएमई (सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग) यांच्या बळावर भारत आज ३८ देशांसोबत स्वतःच्या अटींवर व्यापार करार करण्यास सक्षम झाला आहे. पीएम मोदी पुढे म्हणाले, भारताचे मुक्त व्यापार करार (FTA) हे विशेषतः टेक्सटाईल, लेदर, केमिकल्स, हस्तकला, दागिने आदी क्षेत्रांतील लघु व मध्यम उद्योगांना जागतिक बाजारपेठेत प्रवेश मिळवून देण्यासाठी करण्यात आले आहेत. यामुळे भारतीय उद्योगांची स्पर्धात्मकता वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

**संरक्षण बजेट वाढीचे समर्थन** - संरक्षण बजेटमध्ये झालेल्या वाढीचा उल्लेख करत पंतप्रधानांनी सांगितले की, सध्याच्या जागतिक आणि प्रादेशिक परिस्थितीनुसार संरक्षण क्षेत्राचे आधुनिकीकरण करणे सरकारचे कर्तव्य आहे. आमच्या सरकारने देशाच्या सशस्त्र दलांना बळकट करण्यासाठी आणि त्यांना सर्वतोपरी पाठबळ देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत आणि पुढेही ते सुरू राहतील.

**यूपीए सरकारच्या आर्थिक धोरणांवर टीका**- पंतप्रधान मोदी यांनी यूपीए सरकारच्या आर्थिक कुप्रशासनावर तीव्र टीका केली. त्यांच्या मते, त्या काळात भारताला इतर देशांसोबत आत्मविश्वासाने ट्रेड डील्सवर चर्चा करता येत नव्हती. यूपीए काळात अनेकदा व्यापार करारांवर चर्चा सुरू व्हायची, पण त्या अर्ध्यावरच मोडीत निघायच्या. ☞(पान २ वर)

## कोलंबोत टीम इंडियाचा 'रुद्राभिषेक'

# महाशिवरात्रीला पाकिस्तान विरुद्ध विजयाचा महातांडव!

### युवराज-गंभीर-गिलचे 'महारिकॉर्ड' मोडत केले ५ मोठे विक्रम!

**कोलंबो /वृत्तसंस्था-** कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर रंगलेल्या भारत-पाकिस्तान टी-२० वर्ल्ड कप सामन्यात भारतीय सलामीवीर ईशान किशनने धवाधार खेळी केली. आपल्या स्फोटक फलंदाजीने त्याने नवा इतिहास रचला. सामन्याच्या पहिल्याच षटकात अभिषेक शर्माची विकेट गेली. तरीही त्याचे दडपन न घेता त्याने आक्रमक पवित्रा घेतला. शाहीन आफ्रिदीला पहिल्याच चेंडूवर षटकार खेचत त्याने आपले इरादे स्पष्ट केले. ईशानने केवळ २७ चेंडूत अर्धशतक ठोकत पाकिस्ताननी गोलंदाजीचा धुव्वा उडवला. त्याने ४० चेंडूत १० चौकार आणि ३ षटकार खेचत ७७ धावांचा धमाका केला. मात्र, आपल्या या खेळीने त्याने ५ ऐतिहासिक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. पॉवरप्लेमध्ये ४२ धावा कुटत ईशान किशनने शुभमन गिलचा विक्रम मोडला. गिलने आशिया कप २०२५ मध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात पॉवरप्लेमध्ये ३५ धावा केल्या होत्या. ईशान, पाकिस्तानविरुद्ध टी-२० मध्ये दुसरे सर्वात जलद अर्धशतक ठोकणारा भारतीय फलंदाज ठरला



#### ईशान किशनचे ५ नवे विक्रम

- ईशानने २७ चेंडूत अर्धशतक झळकावत भारत-पाक टी-२० सामन्यांमधील तिसरे वेगवान अर्धशतक नोंदवले. त्याने युवराज सिंगचा (२९ चेंडू) विक्रम मोडीत काढला.

आहे. अभिषेक शर्मा पहिल्या स्थानावर आहे.

- ईशानने गौतम गंभीरचा विक्रमही मोडला. त्याने ७७ धावांच्या खेळीसह भारत-पाक टी-२० इतिहासात चौथी सर्वात मोठी खेळी केली. त्याने भारताचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर (७५ धावा, २००७) यांना मागे टाकले. याशिवाय, ईशान सलामीवीर म्हणून पाकिस्तानविरुद्धच्या टी-२० मध्ये सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या करणारा खेळाडूही ठरला. ☞(पान २ वर)

## धावत्या कारला अचानक आग; डॉक्टर दांपत्याचे प्रसंगावधानामुळे अनर्थ टळला

### बीड तालुक्यातील लिंबागणेश परिसरात दुर्घटना

**बीड /वृत्तसंस्था-** बीड तालुक्यातील लिंबागणेश परिसरात रविवारी पहाटे सव्वा सहा वाजण्याच्या सुमारास धावत्या कारला अचानक आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने, डॉक्टर दांपत्याच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली.

डॉ. भारत मेंगडे आणि डॉ. प्रतिभा मेंगडे हे बोरखेड येथील शेतात बोअरवेलसाठी येणाऱ्या यंत्रसामग्रीची पाहणी करण्यासाठी निघाले होते. महाजनवाडी



फाट्याजवळ त्यांच्या Tata Indica Vista (एमएच २३ वाय २३२१) या कारमधून अचानक धूर निघू लागला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी तत्काळ वाहन थांबवून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. काही क्षणांतच कारने पेट घेतला.

प्राथमिक माहितीनुसार, वायरिंगमधील शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. डॉ. भारत मेंगडे यांच्या सतर्कतेमुळे जीवितहानी ☞(पान २ वर)

## जम्मू-काश्मीरमध्ये मनी लॉन्ड्रिंग नेटवर्कचा पर्दाफाश

### ८००० बँक खाते गोठवली, दहशतवादी फंडिंगची शक्यता

**जम्मू /वृत्तसंस्था--** काश्मीरमध्ये सुरक्षा यंत्रणांनी बेनामी बँक खात्यांच्या (म्यूल अकाउंट्स) माध्यमातून मनी लॉन्ड्रिंग आणि सायबर फसवणूक करणाऱ्या एका मोठ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या खात्यांचा वापर केवळ आर्थिक गुन्ह्यांसाठीच नव्हे, तर दहशतवादी फंडिंगसाठीही होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या तीन वर्षांत अशा तब्बल ८,००० बँक खाती गोठवण्यात आली आहेत. वृत्तसंस्था पीटीआयच्या माहितीनुसार, ही गुप्त बँक खाती सायबर फसवणुकीच्या जगातील सर्वात कमकुवत पण सर्वात महत्त्वाची कडी मानली जातात. या खात्यांशिवाय गुन्हेगारी पैशाचे



क्रिप्टोकरन्सीमध्ये रूपांतर करणे जवळपास अशक्य असल्याचे सुरक्षा यंत्रणांचे म्हणणे आहे.

**म्यूल अकाउंट म्हणजे काय?**- बेनामी किंवा इतरांच्या नावावरील बँक खात्यांना 'म्यूल अकाउंट' असे म्हटले जाते. सायबर गुन्हेगार सहसा स्वतःच्या नावाचे खाते वापरत नाहीत. ते तिसऱ्या व्यक्तींच्या खात्यांचा वापर करून पैसे फिरवतात. अनेक वेळा कमिशन किंवा आर्थिक फायद्याचे आमिष दाखवून सामान्य नागरिकांकडून ही खाती वापरून घेतली जातात.

**दहशतवादी व फुटीरतावादी गटांकडून गैरवापराची भीती** सुरक्षा यंत्रणांना शंका आहे की, विविध दहशतवादी संघटना आणि फुटीरतावादी शक्ती या खात्यांचा वापर देशविरोधी कारवायांसाठी आर्थिक मदत देण्यासाठी करू शकतात. त्यामुळे या प्रकरणाकडे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गांभीर्याने पाहिले जात आहे.

**बँकांशी समन्वय साधण्याचे निर्देश**- सेंट्रल सिक्योरिटी एजन्सीने या संदर्भात जम्मू-काश्मीर पोलिस आणि इतर सुरक्षा दलांना अलर्ट केले आहे. बँकांशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे, संशयित खात्यांची ओळख पटवण्याचे आणि म्यूल अकाउंट्स वाढू नयेत यासाठी तातडीची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**२०१७ पासून NIA ची मोठी मोहीम** - सन २०१७ पासून राष्ट्रीय तपास संस्था जम्मू-काश्मीरमध्ये बेकायदेशीर आर्थिक व्यवहार रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवत आहे. या मोहिमेमुळे हवाला व्यवहारांवर मोठ्या प्रमाणात आळा बसला आहे. मात्र, ☞(पान २ वर)






## तेजस ठाकरे रुग्णालयात दाखल

### मुंबईतील रिलायन्स रुग्णालयात उपचार सुरु

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचे धाकटे पुत्र तेजस ठाकरेंना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मागील चार दिवसांपासून ते रुग्णालयात दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. बुधवारी त्यांना एच. एन. रिलायन्स रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु असल्याची माहिती मिळत आहे.



**तेजस ठाकरेंना झालंय काय?** -तेजस ठाकरे यांची तब्येत ठीक नसल्याने बुधवारी गिरगांव येथील एच एन रिलायन्स ☞(पान २ वर)

## महाशिवरात्रीनिमित्त दर्शनाला जाताना काळाचा घाला
## हरिश्चंद्रगड येथे कड्याचा दगड कोसळून भाविकाचा मृत्यू

**ओतूर/वृत्तसंस्था-** सह्याद्री पर्वतरांगांतील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व पर्यटनस्थळ असलेल्या हरिश्चंद्रगडावर दुर्दैवी घटना घडली. कड्यावरील सैल दगड अचानक कोसळून एका भाविकाच्या डोक्यात व पाठीवर लागल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना रविवारी (दि. १५) सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास घडली असून सुरेश किसन दामसे (वय ३५, रा. घोडेगाव, ता. आंबेगाव) असे या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या



भाविकाचे नाव आहे.

भाविकांचा एक गट गड परिसरात महाशिवरात्रीनिमित्त देवदर्शन व फिरण्यासाठी गेला होता. यावेळी वरील कड्याच्या भागातून अचानक दगड कोसळला. मोठा दगड थेट दामसे या भाविकाच्या डोक्यात व पाठीवर लागल्याने गंभीर दुखापत होऊन त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शींनी त्यास तब्बल ५ किलोमीटर चादरीची झोळी करून पायवाटेने खाली आणून रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ, ट्रेकर्स व बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह खाली आणण्यासाठी मोठी कसरत करावी लागली. त्यानंतर पंचनामा करून मृतदेह पुढील ☞(पान २ वर)

## ३० मार्कांची धमकी..! विद्यार्थिनींना अश्लील संदेश पाठवणाऱ्या प्राध्यापकावर गुन्हा दाखल

**माळेगाव/वृत्तसंस्था-** माळेगाव शहरातील एका कॉलेजमधील एका प्राध्यापकावर अल्पवयीन विद्यार्थिनींना अश्लील संदेश पाठवून छळल्याबद्दल पोक्सोसह इतर गुन्हा दाखल केला गेला आहे. यामुळे बारामती तालुक्यात खळबळ उडाली असून, सर्व पालकवर्ग या घटनेमुळे चिंतेत आहेत. आम्ही आमच्या मुलींना कोणाच्या भरवशावर शिक्षणासाठी पाठवायचे, असा प्रश्न समोर आला आहे.



शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या प्राध्यापक नितीन शंकर तावरे (वय ४२, रा. सांगवी, ता. बारामती), असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. त्यांच्या विरोधात संदीप रमेश शहा यांनी फिर्याद दिली आहे. हा शिक्षक स्थानिक असल्यामुळे मुलींना दम देत असे की, माझे कोणीही वाकडे करू शकत नाही. त्यामुळे मुली सतत घाबरलेल्या असायच्या. नराधम प्राध्यापक नितीन तावरे यांनी डिप्लोमा इंजिनिअर शाखेत प्रथम वर्षात शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनींना, ☞(पान २ वर)

## पुण्यातील महापौरांसह भाजप नेत्यांवर गुन्हा दाखल करा; काँग्रेसचा इशारा

**पुणे/प्रतिनिधी** : दोन ऐतिहासिक व्यक्तींविषयी करण्यात आलेल्या वादग्रस्त विधानामुळे शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून आंदोलनादरम्यान दगडफेक झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे भाजप आणि काँग्रेस यांच्यातील वाद अधिक तीव्र झाला आहे.

काँग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी माध्यमांशी बोलतांना सांगितले की, भाजप कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यासाठी पोलिसांकडे लेखी तक्रार दिली आहे. महापौर मंजुषा नागपुरे, शहराध्यक्ष धीरज घाटे, तसेच दुष्यंत मोहोळ



यांच्यासह इतर कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करून अटकेची कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.शिंदे पुढे म्हणाले, उद्या काँग्रेस पक्षाची बैठक घेऊन पुढील ☞(पान २ वर)

### सुट्टीची सूचन

आज दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ सोमवार रोजी महाशिवरात्री (शिव पुजन) निमित्त जनमाध्यम कार्यालयास सुट्टी असल्याने दि. १७ फेब्रुवारीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

## दिल्लीतील व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूलने स्थापन केली आणखी एक संघटना

### दहशतवादी डॉक्टरांच्या नव्या अन्सार इंटरिम संघटनेचे तपास यंत्रणांपुढे आव्हान

**श्रीनगर/वृत्तसंस्था-** ; दिल्लीतील लाल किल्ला स्फोटाने प्रसिद्धीस आलेल्या व्हाईट कॉलर टेरर मॉड्यूलने 'अन्सार इंटरिम' नावाची नवी दहशतवादी संघटना स्थापन केल्याचे तपासात समोर आले आहे. या प्रकरणाचा तपास आता राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपवण्यात आला आहे. या संघटनेत किती सहभागी होते, सध्या किती कार्यरत आहेत, याचा शोध घेण्याचे आव्हान एनआयएपुढे निर्माण झाले आहे.

या मॉड्यूलमध्ये सहभागी असलेले डॉक्टर २०१६ पासूनच कट्टरपंथी विचारांकडे ओढले गेले होते. १० नोव्हेंबर रोजी लाल किल्ल्याबाहेर झालेल्या कार स्फोटाचा मुख्य सूत्रधार डॉ. उमर-उन नबी याने २०१६ आणि २०१८ मध्ये



दहशतवादी गटात सामील होण्याचा अयशस्वी प्रयत्न केला होता. अखेर एप्रिल २०२२ मध्ये श्रीनगरमधील ईदगाह येथे झालेल्या एका बैठकीत मुजमिल गनी, अदील राथर आणि मौलवी इरफान यांसारख्या साथीदारांसह त्यांनी स्वतःची संघटना बांधण्याचा निर्णय घेतला. अन्सार इंटरिम असे नावे असून, तपासा धिकाऱ्यांच्या मते अन्सार हा शब्द अल-कायदा या संघटनेशी संबंधित आहे. या संघटनेत अदील राथरला अमीर (प्रमुख), मौलवी इरफानला उपप्रमुख आणि गनी याला खजिनदार म्हणून नियुक्त करण्यात आले होते.




# सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथे ब्रेन ट्युमरची जटिल शस्त्रक्रिया यशस्वी



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल) अमरावती येथे ७० वर्षीय महिलेवर अत्यंत जटिल व धोकादायक मेंदूतील ट्युमरची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यात आली. संबंधित महिला चिंचोली बु., ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती येथील रहिवासी आहे.

महिलेच्या मेंदूमधील मुख्य रक्तवाहिन्यांमध्ये ट्युमर असल्याने ही शस्त्रक्रिया अतिशय गुंतागुंतीची व अतिशय जोखमीची होती. सदर शस्त्रक्रियेदरम्यान सुमारे ८०० ग्रॅम वजनाची गाठ यशस्वीरित्या काढण्यात आली. शस्त्रक्रियेच्या गुंतागुंतीमुळे अनेक मोठ्या रुग्णालयांनी ही केस नाकारली होती. मात्र अमरावती येथील सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने धाडसाने व कौशल्यपूर्णरीत्या ही शस्त्रक्रिया पूर्ण केली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा होत आहे. ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत विनामूल्य करण्यात आली. या शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली न्यूरोसर्जन डॉ. योगेश सावदेकर, डॉ. अभिजीत बेले, डॉ . अमोल ढगे, भूलतज्ज्ञ डॉ. बाळकृष्ण बागवाले, डॉ. शितल सोळंके, डॉ. दिपाली देशमुख, डॉ. अश्विनी मडावी, डॉ. रमणीका ढोमणे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. नोडल ऑफिसर डॉ. उज्वला मोहोड, डॉ. मालोकर, डॉ. अनिता अंभोरे, डॉ. जयनीत, डॉ. दक्षयानी, डॉ. श्रद्धा, डॉ. समीर, समाजसेवा अधीक्षक शितल बोंडे, डॉ. पायल रोकडे, डॉ. दिव्यानी मुंदाने, अधिसेविका चंदा खोडके यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर दिपाली देशमुख, यश गवई, शुभम गवई, स्नेहल काळे, आकाश काळे, वेदांत इंदूरकर आदींनी शस्त्रक्रियेदरम्यान मोलाचे सहकार्य केले.

> ही अत्यंत जटिल शस्त्रक्रिया होती. मेंदूशी संबंधित अतिमहत्वाच्या नसांचा सहभाग असल्यामुळे ही शस्त्रक्रिया मोठे आव्हान ठरणारी होती. रुग्ण महिलेची प्रकृती आणि शस्त्रक्रियेची गुंतागुंत लक्षात घेता संपूर्ण टीमने अत्यंत काळजीपूर्वक नियोजन केले. अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर, प्रगत तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक साधनसामग्री यांच्या साहाय्याने आम्ही ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करू शकलो, याचा आम्हाला मनस्वी आनंद आहे.
>
> सुपर स्पेशलिस्ट हॉस्पिटल, अमरावती येथे अशा अनेक गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या होत आहेत. अशा प्रकारच्या जटिल शस्त्रक्रियांसाठी अचूक नियोजन, तज्ज्ञ डॉक्टरांची साथ आणि सर्व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे यांचे मार्गदर्शन व नेतृत्व मोलाचे ठरते. रुग्णाच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत, अत्याधुनिक वैद्यकीय सेवा देणे हेच आमचे ध्येय आहे.
>
> **-डॉ. योगेश सावदेकर (न्यूरोसर्जन)**

# रेल्वेच्या डब्यात तरुणाची आत्महत्या

## -अमरावती रेल्वे स्थानकावरील प्रकार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अमरावती रेल्वे स्टेशन येथे शनिवारी सकाळी एक धक्कादायक घटना उघडकीस आली. रेल्वे गाडीतील शौचालयात एका इसमाने गळफास घेतल्याची माहिती समोर आली असून, संबंधित व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नसून तो अंदाजे ३५ वर्षांचा असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळच्या सुमारास रेल्वे स्थानकावर उभी असलेल्या गाडीतील बाथरूम बराच वेळ बंद असल्याचे लक्षात आल्यानंतर कर्मचाऱ्यांनी दरवाजा उघडला. त्यावेळी संबंधित इसम गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. घटनेची माहिती तात्काळ रेल्वे पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला. त्यानंतर सकाळी सुमारे ११ वाजता मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आला. डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. मृत व्यक्तीकडे कोणतेही ओळखपत्र आढळून आले नसल्याने त्याची ओळख पटविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. रेल्वे पोलिसांनी आसपासच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, मृतकाच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या घटनेमुळे स्थानक परिसरात काही काळ खळबळ उडाली होती. पुढील तपास रेल्वे पोलीस करीत आहेत.



विजेता चषक प्रदान करण्यात आले.

मुट कोर्ट स्पर्धेत नेहमीच डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अग्रेसर राहिलेले आहे. यंदाही मुट ट्रायल स्पर्धेत आपले वर्चस्व कायम ठेवत यश प्राप्त केले.

प्राचार्या डॉ.वर्षा देशमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे व त्यांचे प्रशिक्षक डॉ. राजेश पाटील यांचे कौतुक केले.विजेत्या चमूला ॲड.प्रतीक पाटील, ॲड.प्रफुल तापडिया, ॲड.वैभव इंगळे, ॲड.अरिहंत कोठारी, ॲड.संकेत इंगळे, ॲड.गौरव राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

# १ व १० वरील उर्वरित

## भारत आता स्वतःच्या अटींवर करार करतो

दीर्घ वाटाघाटीनंतरही ठोस निष्कर्ष लागत नव्हते, असे मोदींनी सांगितले.

मोदी पुढे म्हणाले की, डेटा सेंटर्स हे भारतातील तरुणांसाठी रोजगाराचे मोठे स्त्रोत ठरणार आहेत. आम्ही संपूर्ण जगातील डेटा भारतात होस्ट करण्यासाठी खुले आमंत्रण देत आहोत, असे त्यांनी सांगितले. याशिवाय, ळझ्छ मुळे व्यवहार करण्याची पद्धत पूर्णपणे बदलली असून भारत डिजिटल व्यवहारांमध्ये जागतिक नेता बनला आहे, असेही त्यांनी नमूद केले. भारत कंप्युटिंग क्षमतेचा विस्तार आणि डेटा सेंटर इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत करून एक समृद्ध एआय (ँघ) इकोसिस्टम उभारत आहे. यामुळे भविष्यातील तंत्रज्ञानाधारित अर्थव्यवस्थेसाठी भक्कम पाया तयार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## कोलंबोत टीम इंडियाचा 'रुद्राभिषेक'

इशानचा 'झंझावात' आणि सूर्याचे 'तेज'

प्रथम फलंदाजी करताना भारताची सुरुवात अडखळत झाली. पहिल्याच षटकात अभिषेक शर्मा शून्यावर बाद झाला खरा, पण त्यानंतर मैदानात आलेला इशान किशन पाकिस्तानी गोलंदाजांसाठी 'काळ' ठरला. त्याने ४० चेंडूंत ७७ धावांची (१० चौकार, ३ षटकार) स्फोटक खेळी करत पाकिस्तानचा 'पॉवरप्ले'च हिरावून घेतला. कर्णधार सूर्यकुमार यादवने (३२) आणि शेवटच्या षटकात शिवम दुबे (२७) व रिंकू सिंहने केलेल्या फटकेबाजीमुळे भारताने १७५ धावांचे डोंगरासारखे आव्हान उभे केले.

पाकिस्तानी फलंदाजीचे लोटांगण

१७६ धावांचा पाठलाग करायला उतरलेल्या पाकिस्तानला पहिल्याच षटकात हार्दिक पंड्याने साहिबजादा फरहानला शून्यावर बाद करून पहिला झटका दिला. त्यानंतर आला जगाचा तारणहार जसप्रीत बुमराह! त्याने सईम अयुब आणि कर्णधार सलमान आघाला आपल्या 'ब्रह्मास्त्रा'ने गारद केले. पाकिस्तानची अवस्था २ षटकांत ३ बाद १३ अशी दयनीय झाली होती.

टी-२० विश्वचषकाच्या रणांगणात भारतीय संघाचा दबदबा आजही अबाधित आहे. भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये आतापर्यंत विश्वचषकाच्या इतिहासात एकूण ९ सामने खेळले गेले आहेत. या ९ लढतींपैकी तब्बल ८ वेळा टीम इंडियाने पाकिस्तानला धूळ चारत विजयश्री खेचून आणली आहे, तर पाकिस्तानला केवळ एकाच सामन्यात विजय मिळवता आला आहे.आजच्या या दिमाखदार विजयामुळे भारताने या फॉरमॅटमध्ये पाकिस्तानविरुद्धचे आपले वर्चस्व केवळ सिद्धच केले नाही, तर ते अधिक भक्कम केले आहे. विश्वचषकाच्या व्यासपीठावर भारताला रोखणे पाकिस्तानसाठी पुन्हा एकदा 'अशक्य' असल्याचेच या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

## धावत्या कारला अचानक आग;

टळली; मात्र वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. डॉ. गणेश ढवळे, विक्रांत वाणी, सय्यद अख्तर आणि सुमित मुळे यांच्यासह महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी तसेच शिवाजी घरत, सतीश घरत, ऋषिकेश घरत, अभिषेक घरत आणि अक्षय घरत यांनी आग विझविण्यास सहकार्य केले.

## जम्मू-काश्मीरमध्ये मनी

अधिकाऱ्यांना शंका आहे की, आता 'डिजिटल हवाला' हा नवा मार्ग वापरला जात असावा.सुरक्षा यंत्रणांच्या अभ्यासानुसार, चीन, मलेशिया, म्यानमार आणि कंबोडिया येथील काही घटक जम्मू-काश्मीरमधील लोकांना प्रायव्हेट क्रिप्टो वॉलेट्स तयार करण्यास सांगत आहेत. ही वॉलेट्स ञ्झ्- चा वापर करून तयार केली जातात, यासाठी ख्य्ग किंवा ओळख पडताळणीची गरज नसते.

**जम्मू-काश्मीरमध्ये ञ्झ्- वापरावर बंदी**

एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, फसवणुकीचे संपूर्ण इकोसिस्टम या खात्यांवर अवलंबून आहे. पैशासाठी ठराविक गंतव्य नसेल, तर स्कॅम पहिल्याच टप्प्यावर फसतो. खाते भाड्याने देणारे लोक केवळ बळी नसतात, ते गुन्ह्याच्या यंत्रणेचा भाग असतात. या पार्श्वभूमीवर जम्मू-काश्मीर पोलिसांनी आधीच ञ्झ्- च्या वापरावर बंदी घातली आहे, कारण ञ्झ्- मुळे दहशतवादी आणि फुटीरतावादी घटकांना ओळख टाळणे सोपे होते.

## तेजस ठाकरे रुग्णालयात

रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं सूत्रांनी सांगितलं. तेव्हापासून त्यांच्यावर उपचार सुरु असून आता तब्येतीत सुधारणा झाल्याची माहिती आहे. तेजस ठाकरे यांना ताप असल्यामुळे रुग्णालयात दाखल केल्याची माहिती मिळत आहे. मुंबईत सध्या तापाची कोणतीही साथ नाही. मात्र सातत्याने बदलते हवामान, प्रदूषण पातळीतील वाढ आणि विषाणूंचा वेगवान प्रसार होत असल्यामुळे शहरातील व्हायरल फिवरच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. डॉक्टर आणि क्लिनिक्समध्ये दररोज १० ते २० रुग्ण व्हायरल फिव्हर म्हणजेच ताप, डोकेदुखी, अंगदुखी, थकवा, गळ्यात खवखव होणे आणि खोकल्यासारख्या लक्षणांच्या तक्रारी घेऊन उपचारांसाठी येत आहेत.

## महाशिवरात्रीनिमित्त दर्शनाला

तपासासाठी पाठविण्यात आला.

या घटनेमुळे गडावर आलेल्या भाविक व पर्यटकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. डोंगरकड्याजवळ जाताना काळजी घेणे, सैल दगड असलेल्या भागात न जाणे तसेच प्रशासनाने सुरक्षिततेच्या उपाययोजना वाढवाव्यात, अशी मागणी व्यक्त होत आहे.

## ३० मार्कांची धमकी..!

त्यांच्या इच्छेविरुद्ध अश्लील भाषेत व्हॉट्स?पवर संदेश पाठवले. या संदेशाला उत्तर न दिल्यास माझ्या हातात असलेल्या ३० मार्कांचा इशारा देत होते.

तसेच, वर्गात शिकवत असताना विद्यार्थिनींना स्पर्श करणे, त्यांच्या जवळ जाणे, बेंचवर हात ठेवून शरीरास हात लावण्याचा प्रयत्न करणे, मुलींच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करणे, त्यांनी विरोध केला तर वर्गात टार्गेट करून अपमान करणे, अशी कृत्ये २२ जानेवारी ते १२ फेब्रुवारी २०२६ दरम्यान केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा तपास उपनिरीक्षक देविदास साळवे करीत आहेत.

## पुण्यातील महापौरांसह भाजप

आंदोलनाची दिशा ठरवली जाईल. जर गुन्हा दाखल करून अटक झाली नाही, तर याहून मोठे आंदोलन छेडले जाईल.

दरम्यान, पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी शहरात अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे. दोन्ही पक्षांकडून एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू असून, येत्या काही दिवसांत राजकीय वातावरण आणखी तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## लक्षावधी भाविक, पर्यटक व शेतकऱ्यांच्या

प्रशासनाने तातडीने पारदर्शक भूमिका स्पष्ट करावी, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे.

**संतप्त ग्रामस्थांचे आठ प्रश्न-** वारी परिसर वर्षभर भाविकांनी गजबजलेला असतो. येथेच वान नदीवरील हनुमान सागर (वान प्रकल्प धरण) असून धरणाचा बॅकवॉटर भाग व्याघ्र प्रकल्पात येतो. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी वन विभागासमोर थेट प्रश्न उभे केले आहेत. त्यामध्ये मगरी सोडण्यामागील मागणी नेमकी कोणाची? भाविकांच्या सुरक्षेची जबाबदारी कोण घेणार? एका मगरीचा मृत्यू नेमका कशामुळे? पावसाळ्यात धरणातून पाणी सोडल्यास मगरी पूर्णा-तापी खोऱ्यात वाहून जाण्याचा धोका? मागील २० वर्षांत मगरींचे अस्तित्व नसताना अचानक हा निर्णय का? या मगरी परत पाठविण्याबाबत प्रक्रिया काय?ग्रामपंचायतीची एनओसी व जनजागृती का झाली नाही? स्थलांतरानंतरचा मृत्यू पाहता येथील वातावरण खरंच पोषक आहे का? यांचा समावेश आहे.

**'मगरी परत पाठवा, अन्यथा आंदोलन'-** वारी पिंपरखेडच्या सरपंच मिना गोपाल महारनर यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त करत, 'ग्रामपंचायतीची एनओसी न घेता, कोणतीही जनजागृती न करता हा निर्णय घेतला. नागरिकांच्या सुरक्षेसाठी आम्ही आंदोलन छेडू,' असा इशारा दिला.झरी बाजार (मोहापाणी) येथील सरपंच जायरून खातून बरकत खान यांनीही 'हा प्रकार नागरिकांचा आणि मगरांचाही जीव धोक्यात घालणारा आहे. मेळघाटाला कुंपण नसताना मगरी सोडणे म्हणजे जाणीवपूर्वक धोका निर्माण करणे,' अशी टीका केली.

## न्यायाधीशांच्या घरांवर चोरट्यांचा डल्ला

तोडण्यात आले, तर 'पैनगंगा' इमारतीतील दोन न्यायाधीशांच्या घरांत चोरी झाली. तसेच जज कॉलनीमागील न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या दोन इमारतींतील चार घरांतही घरफोडी करण्यात आली. स्थानिकांच्या मते, बंद घरांच्या कुलुपांवर साचलेली धूळ पाहून चोरट्यांनी घर रिकामे असल्याचा अंदाज घेतला असावा. पूर्वनियोजित रेकीची शक्यता नाकारता येत नाही.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांची पाहणी-** चोरीची माहिती मिळताच अमरावतीचे पोलीस आयुक्त राकेश ओला व पोलीस उपायुक्त गणेश शिंदे यांनी घटनास्थळी धाव घेतली. फॉरेन्सिक पथकाकडून तपास सुरू असून सीसीटीव्ही फुटेजमध्ये चोरटे कॉलनीच्या मागील बाजूस असलेल्या झुडपांजवळून भिंत ओलांडून पळताना दिसत आहेत. या गुन्ह्याचा पुढील तपास एपीआय अमर वसावे करीत असून संशयितांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कामाला लागली आहेत. कॉलनी परिसरात पोलिस गस्त वाढविण्यात आली आहे. न्यायव्यवस्थेच्या अधिकाऱ्यांच्या निवासस्थानीच घरफोडी झाल्याने नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. पोलिसांकडून आरोपींना लवकरच जेरबंद केले जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांवर काँग्रेसचा

राहून मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवावा. विरोधकांना आपली ताकद दाखवण्याची हीच योग्य वेळ आहे.' संघटनात्मक बांधणी, नव्या कार्यकर्त्यांची नोंदणी आणि गावनिहाय नियोजन यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत खासदार बळवंतराव वानखडे यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. 'संघटनाची मजबुती हीच निवडणूक विजयाची गुरुकिल्ली आहे. ग्रामीण भागात काँग्रेसची पकड अधिक भक्कम करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम केले पाहिजे. जनतेच्या प्रश्नांवर लढा देत भाजपाला त्यांची जागा दाखवण्याची वेळ आता आली आहे,' असे ते म्हणाले.या प्रसंगी नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीला संजय वानखडे,हरीशभाऊ मोरे, सुनिल गावंडे, श्रीकांत बोंडे,साहेबराव भदे,नामदेवराव तनपुरे,बाबाराव बहुरूपी, श्रीकांत झोडपे, दिनेश वानखडे,श्रीधरराव काळे,प्रमोद दाळू,राजू कुरेशी,अनिकेत ढेंगळे,राजेंद्र नागपुरे,सतीशराव हाडोळे,समाधान दहातोंडे, बाबूभाई इनामदार,शोएब खान,राहुल गवई, अमोल होले,सच्चिदानंद बेलसरे, राजेश सेमलकर, बाबुरावजी गावंडे,सुरेश देशमुख,शंतनु सोलव, वैभव वानखडे,रामेश्वर चव्हाण, हेमंतराव येवले,ईश्वर बुंदेले,कलीम भाई, येतेशाम नबील,सुरेश आडे,शेख हैदर,तेजस अभ्यंकर, श्रीनिवास सूर्यवंशी,सिद्धार्थ बोबडे, वैभव वानखडे,देवेंद्र पेटकर,भाई देशमुख, श्याम बेलसरे, अतिश शिरभाते,शिवाजी देशमुख, कैलास भाऊ आवारे, अमोल बोरेकर, पोपट, घोडेराव,विलास बोरेकर, बिट्टू मंगरोळे, राहुल बोडखे,किशोर देशमुख,मुकुंदराव देशमुख,सेतूभाऊ देशमुख, श्रीनित राऊत आणि तालुका व शहर पदाधिकारी, बूथ प्रमुख, युवक व महिला आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी निवडणुकांसाठी ठोस रणनीती आखत संघटनात्मक बळकटीचा संकल्प यावेळी करण्यात आला.

## सुवर्णकार लुट प्रकरणाचा ४८ तासांत

माहिती मिळताच पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी स्वतः घटनास्थळी भेट देत गुन्हे शाखेला तातडीने तपासाचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली चार विशेष पथके तयार करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन ट्रॅकिंग आणि गोपनीय माहितीदारांच्या मदतीने आरोपींचा माग काढण्यात यश आले. १५ फेब्रुवारी रोजी नांदगाव पेठ टोलनाका परिसरातील गुणवंत महाराज रेस्टॉरंटजवळ सापळा रचून सात आरोपींना अटक करण्यात आली.

**१.१२ कोटींचा मुद्देमाल जप्त-** आरोपींकडून ७०० ग्रॅम सोन्याचे दागिने (अंदाजे १.०५ कोटी रुपये), १.१९ लाखांची रोकड, गुन्ह्यातील चारचाकी व दोन दुचाकी (४ लाख रुपये), ७ मोबाईल फोन (२.१० लाख रुपये) व ३ चाकू असा एकूण १ कोटी १२ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**सराईत गुन्हेगारांचा समावेश-** आरोपींमध्ये सैयद इम्रान मिर ऊर्फ उर्फ दबंग (वय ३२, रा.लालखडी मदरसाजवळ, अमरावती), फिरोज खान कासम खान (वय३२, रा. बिस्मील्लानगर, लालखडी, अमरावती), शोएब खान अमीन खान (वय २१, रा. रहमतनगर, अमरावती), शेख इम्रान ऊर्फ इम्मु शेख रहेमान (वय ३३, रा. हबीबनगर नम्बर १, अमरावती), शेख रिझवान उर्फ कालू अब्दुल रहेमान खान (वय १९, रा. हैदरपुरा, अमरावती), शुभम उर्फ बंटी ज्ञानेश्वर खंडारे (वय ३३, रा. कठोरा बु.अमरावती) व सुरज सिध्दार्थ तायडे (वय ३५, रा. बोरगाव धर्माळे, अमरावताी) अशी अटक आरोपींची नावे असून त्यांच्यावर पूर्वीही गंभीर गुन्हे नोंद असल्याचे तपासात समोर आले आहे.

**पोलिस पथकाला रिवार्ड घोषीत-** कारवाईत सहभागी पोलिसांना रिवार्ड घोषीत करण्यात आला. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेत्तृत्वात एपीआय मनिष वाकोडे, महेश इंगोले, इम्रान नाईकवाडे, पीएसआय गजानन सोनुने, पोलिस अमलदार सुनिल लासुरकर, फिरोज खान, सतिश देशमुख, दिपक देशमुख, दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तीक देशमुख, मंगेश परिमल, झहीर शेख, सचिन बहाळे, झहिरुद्दीन शेख, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, विकास गुडधे, अतुल संभे, मिर्झा नईम बेग, नाझिम उद्दीन सैय्यद, विशाल वाकपांजर, सागर ठाकरे, रंजीत गावंडे, राजीक रायलीवाले, सुरज चव्हाण, निखील गेडाम, योगेश पवार, चालक संदिप खंडारे, प्रभात पोकळे, चेतन शर्मा, राहुल दुधे तसेच गाडगेनगरचे प्रभारी अधिकारी पोलिस निरीक्षक अतुल वर, सायबरचे पोलिस निरीक्षक महेंद्र अंभोरे, एपीआय अनिकेत कासार, एपीआय प्रियंका कोटावार, चेतन गुल्हाने, अश्विन यादव, सुषमा आठवले यांच्या संयुक्त पथकाने केली.

## अंजनगाव-अकोट मार्गावर अपघात,

डॉक्टरांनी घोषित केले.

**नगर परिषदेने लक्ष देण्याची गरज-** अंजनगाव-अकोट महामार्गावर नगर परिषदेचा कचरा डेपो आहे. या डेपोमुळे परिसरात भटक्या कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर वावर असतो. हे कुत्रे वारंवार धावत्या वाहनांसमोर येत असल्याने येथे छोटे-मोठे अपघात नित्याचेच झाले आहेत. नगर परिषद प्रशासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी आता नागरिकांकडून केली जात आहे.

## आर्वी हत्याकांड प्रकरणी सहा

मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. तपासानंतर मृताची ओळख शेख शाहरुख शेख रउफ (वय ३०, रा. आर्वी, जि. वर्धा) अशी पटली. पैशांच्या वादातून हा खून घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पोलिसांनी आर्वी व अंजनगाव सुर्जी येथील सहा जणांना अटक केली आहे. आर्वी येथील टिकेश प्रशांत महाजन (वय २८), प्रशांत हरीचंद्र महाजन (वय ५९) आणि अली अजगर (वय २८) तर अंजनगाव सुर्जी येथील शुभम मोहनलाल रॉय (वय २८), हर्षित प्रकाश गौर (वय १९) आणि निखिल दीपचंद गौर (वय ३२) यांचा समावेश आहे. हत्या केल्यानंतर आरोपींनी मृतदेह जहानपूर शिवारात नेऊन जाळण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पुरावे लपविण्यासाठी मृतदेह कॅनॉलमध्ये फेकण्यात आल्याची माहिती तपासात समोर आली आहे. मात्र, पोलिसांनी वेगाने तपासाची सूत्रे हलवून काही तासांतच आरोपींचा माग काढला. हत्या नेमकी कशा कारणातून झाली, यात आणखी कोणी सहभागी आहे का, तसेच हत्येत वापरलेली साधने व अन्य पुरावे शोधण्यासाठी पोलिसांनी कोठडीची मागणी केली होती. न्यायालयाने ती मान्य करत पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणामुळे परिसरात तणावाचे वातावरण असून, पोलिसांकडून तपास अधिक गतीने सुरू आहे.

## डॉ.पंजाबराव देशमुख विधी

महाविद्यालयाचे चमू यामध्ये श्रावणी निस्ताने, कृष्णा नलवाडे आणि भाग्यश्री हरणे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून स्पर्धेचे विजेतपद मिळवले .बेस्ट जजमेंट रायटिंग भाग्यश्री हरणे,बेस्ट एडवोकेट कृष्णा नलवाडे ,बेस्ट लेडी एडवोकेट रनर अप श्रावणी निस्ताने आणि बेस्ट विटनेस यांचे सुद्धा बक्षीसे मिळवली. विद्यार्थ्यांना पारितोषिक म्हणून रोख रक्कम व

## नरनाळा निसर्ग पर्यटन

केला.आमदार रणधीर सावरकर यांनी नरनाळा परिसर पर्यटन नकाशावर ठळकपणे यावा, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. आमदार प्रकाश भारसाकळे यांनीही पर्यटन विकासातून स्थानिकांना पूरक व्यवसाय निर्माण होतील, असे सांगितले. मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव श्रीकर परदेशी म्हणाले, नव्या निसर्ग पर्यटन धोरणामुळे काही काळ महोत्सव होऊ शकला नाही; मात्र आता त्याचे पुनरुज्जीवन झाले ही आनंदाची बाब आहे. जतन, संवर्धन आणि मनोरंजन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून इको हेरिटेजला चालना देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी प्रास्ताविकात सांगितले की, सुमारे हजार वर्षांचा इतिहास लाभलेल्या नरनाळा किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व आणि परिसरातील वनसंपदा लक्षात घेता पर्यटन विकासासाठी हा महोत्सव महत्त्वाचा टप्पा ठरेल.

महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी बोटिंग व विविध साहसी खेळांचा शुभारंभ करण्यात आला. उद्‌घाटनानंतर स्थानिक कलावंतांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. त्यानंतर लोकप्रिय मराठी कार्यक्रम चला हवा येऊ द्या सादर करण्यात आला. महोत्सवाला नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

## पल्लवी गुडधे मृत्यूप्रकरणी भुलतज्ज्ञ

या गंभीर प्रकरणाची दखल घेत २७ फेब्रुवारी रोजी जिल्हा शल्य चिकित्सकांनी पाच तज्ज्ञ डॉक्टरांची समिती गठीत करून चौकशी सुरू केली. चौकशीचा प्राथमिक अहवाल प्राप्त होताच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अपूर्व कडू आणि भुलतज्ज्ञ डॉ. अनुप बोंद्रे यांना कार्यमुक्त केले. शनिवारी सायंकाळी चौकशी समितीचा अंतिम अहवाल पोलिसांकडे सादर करण्यात आला. अहवालात भुलतज्ज्ञ डॉ. अनुप बोंद्रे यांच्या निष्काळजीपणामुळेच पल्लवी गुडधे यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे. त्या आधारे राजापेठ पोलिसांनी डॉ. अनुप बोंद्रे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## हर हर महादेवाचा गजर...,

कार्यक्रमात त्या बोलत होत्या.दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा अमरावतीमध्ये महाशिवरात्री निमित्त प्रत्येक शिवालयात विविध धार्मिक- आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यादरम्यान आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके यांनी अमरावती महानगर स्थित शिव मंदिर- अंबागेट, गडगडेश्वर महादेव मंदिर, आसरा माता विठ्ठल मंदिर -यशोदा नगर क्रमांक - २,विद्या निकेतन कॉलनी-अर्जुन नगर - एसएसडी बंगला परिसर स्थित भोलेनाथ मंदिर,श्री सोमेश्वर संस्थान परिसर देव पार्क पनपालिया ले - आऊट- शेगाव- रहाटगाव रोड, , ओम कॉलनी, श्री शिव मंदिर - विश्वेश्वर अध्यात्मपीठ श्री क्षेत्र रेवसा, शिवसाई मंदिर - यशोमंगल कॉलनी, श्री महादेव मंदिर हरीओम नगर,श्री शंकर मंदिर - रहाटगाव आदी ठिकाणी आयोजित कार्यक्रम स्थळी भेट देऊन भगवान शिव व शक्तीस्वरूपा माता पार्वतीदेवीचे दर्शन घेत कृपाशीर्वाद घेतले. यादरम्यान भगवान शिवशंकर - माता पार्वती यांच्या प्रतिमेस नमन - वंदन - पूजन व माल्यार्पण करीत आमदार सुलभा खोडके यांनी भावीकभक्तांचे मनोरथ पूर्ण होण्याची भगवान भोलेनाथ चरणी नतमस्तक होत प्रार्थना केली. अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्याची रात्र महाशिवरात्री... व्रत आणि जागरण ' शिवतत्व ' ओळखण्याची संधी असा पौराणिक कथेतील उल्लेख करीत महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्व पौराणिक कथांव्यतिरिक्त योग परंपरेमध्ये या दिवसाला आणि रात्रीला इतके महत्व दिले जाते. महाशिवरात्री ही एक संधी आणि शक्यता आहे. ती विशाल शून्यता अनुभवण्याची जी प्रत्येक मानवाच्या आत आहे, जी सर्व सृष्टीचा स्त्रोत आहे. एकीकडे भगवान शिव संहारक म्हणून ओळखले जातात. तर दुसरीकडे ते सर्वात कृपाळू म्हणून ओळखले जातात.अशी माहिती विशद करीत आध्यात्मिक कार्यक्रमार्थ आमंत्रित शिवभक्त, पारायणकार, कीर्तनकार यांनी उपस्थितांना शिव - शक्ती पूजन - आराधना - उपासना भक्तीचे महत्व पटवून दिल्याचे चित्र यावेळी प्रत्येक शिवालयात दिसून आले.

यादरम्यान आयोजित फराळ साहित्य वाटप स्थळी सहभाग नोंदवित आमदार सुलभा खोडके यांनी भावीक भक्तांना उसळ व फलाहाराचे वितरण केले. यासोबतच आरोग्य तपासणी शिबीर स्थळी भेट देऊन आयोजकांच्या वतीने सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य अबाधित राखण्याच्या या नवोपक्रमाची आमदार सुलभा खोडके, आमदार संजय खोडके यांनी प्रशंसा करीत आयोजकांच्या या लोककल्याणकारी कार्याला त्यांनी शुभेच्छा दिल्यात.महाशिवरात्रीच्या शुभ पर्वावर ठिकठिकाणी शिवलिंगावर अखंड जलधारा अभिषेक, बिल्वपत्र समर्पण, भजन संध्या, किर्तन, श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ, प्रवचन, शिवलिलामृत - उपासना, उसळ - फलाहार वाटप, ओम नमः शिवाय चा अखंडीत नामजप,हर हर महादेवचा जयघोष आदी कार्यक्रमात भाविकभक्त तल्लीन झाल्याचे दृश्य यावेळी दिसून आले.याप्रसंगी आमदार सुलभा खोडके यांच्या समवेत आमदार संजय खोडके आदी सहित अंबागेट, यशोदा नगर क्रमांक - २,गडगडेश्वर, विद्या निकेतन कॉलनी, पनपालिया ले - आऊट, रहाटगाव, ओम कॉलनी, यशोमंगल कॉलनी, हरिओम नगर, रेवसा येथील भाविकभक्त तसेच महाशिवरात्री महोत्सव २०२६ आयोजन समितीचे सदस्य व पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# बंजारा समाजाच्या कायम पाठीशी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## पोहरादेवीत उद्योग निर्मितीला चालना देणार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे





■ प्रतिनिधी | वाशिम ■

**संत सेवालाल महाराज यांनी समाजाला स्वाभिमान, सदाचार आणि सेवाभावाचा मार्ग दाखविला. त्यांचे विचार आजच्या काळात अधिक प्रेरणादायी आहेत. पोहरादेवी हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहे.**

**पर्यटन विकास हा केवळ आर्थिक प्रगतीपुरता मर्यादित नसतो, तर तो स्थानिक संस्कृती, परंपरा आणि मूल्यांचे संवर्धन करणारा असतो. पोहरादेवी परिसराचा नियोजनबद्ध विकास करताना श्रद्धेचा सन्मान राखून सुविधा अधिक सक्षम करण्यात येईल. बंजारा समाजाच्या कायम पाठीशी असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. दूरदृश्यप्रणालीव्दारे संदेश देतांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, संत सेवालाल महाराज यांचे विचार समाजात समता, बंधुता आणि सेवाभाव रुजवणारे आहेत. पोहरादेवी हे केवळ धार्मिक स्थळ नसून, पर्यटनाच्या दृष्टीनेही मोठी क्षमता असलेले केंद्र आहे. या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन आवश्यक त्या पायाभूत सुविधा, रस्ते, निवास व पर्यटक सुविधांसाठी सातत्याने प्रयत्न करणार आहे. संत सेवालाल महाराज यांचा वारसा जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पोहरादेवीसारख्या तीर्थक्षेत्रांचा विकास झाला, तर स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. शासन विकास आणि सामाजिक समरसतेसाठी कटिबद्ध आहे. पोहरादेवीत उद्योग निर्मितीला चालना देणार असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केले. या कार्यक्रमाला मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख, आमदार धर्मगुरू बाबुसिंग महाराज, आमदार किरण सरनाईक, आ. सई डाहाके, आ. राजेश राठोड , आ. किसन वानखडे, पुसदच्या नगराध्यक्षा मोहिनी नाईक, जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पर्यटन उपसंचालक विजय जाधव, माजी खासदार हरिभाऊ राठोड यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील पोहरादेवी येथे आयोजित श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवाचे उद्‌घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले. यावेळी ते बोलत होते.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी पर्यटन महोत्सवाची रूपरेषा विषद केली. समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी कायम प्रयत्नशील आहे. संत सेवालाल महाराज यांच्या विचारांवर समाज चालत आहे. जयंती शासन स्तरावर साजरी करण्यात येते. विकासकामांची माहिती दिली. शासनाचे भक्कम पाठबळ पोहरादेवी विकासासाठी मिळत आहे. बंजारा काशीची परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल होत आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास शासनाने श्री संत सेवालाल महाराज यांचे नाव दिल्याबाबत शासनाचे आभार व्यक्त केले.

महंत जितेंद्र महाराज यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, संत सेवालाल महाराज यांनी शांतीचा संदेश दिला. बंजारा समाजाचा विकास करावा. राज्यमंत्री इंद्रनील नाईक म्हणाले की, संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सवामुळे पोहरादेवीचा नावलौकिक वाढत आहे. अशा उपक्रमांतून युवा पिढीला संस्कृतीची ओळख होते. शासनाच्या विविध योजनांचा लाभ या भागातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील राहील. पोहरादेवीला जोडणारी विकास कामांची माहिती दिली. पर्यटन राज्यमंत्री म्हणून पोहरादेवी विकासासाठी हातभार लावला जाईल.

### सेवारत्न पुरस्कारांचे वितरण

महोत्सवाच्या निमित्ताने समाजसेवा, सांस्कृतिक कार्य आणि सामाजिक बांधिलकीच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ७ मान्यवरांना सेवारत्न पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी पुरस्कारप्राप्त व्यक्तींचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. या भव्य आयोजनामुळे पोहरादेवी येथील श्री संत सेवालाल महाराज जयंती पर्यटन महोत्सव राज्यपातळीवर विशेष लक्षवेधी ठरला असून, भविष्यात या परिसराच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या महोत्सवामुळे श्रद्धा, संस्कृती आणि पर्यटन विकास यांचा प्रभावी संगम घडून येत असल्याचे चित्र दिसून आले. कार्यक्रमाला विविध मान्यवर, महंत, विश्वस्त, ट्रस्टी, नागरिक उपस्थित होते.

---

## महाशिवरात्रिनिमित्त श्रीक्षेत्र महादेव संस्थान ईचा-नागी येथे फराळाचे वाटप



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील तीर्थक्षेत्र गट 'ब' दर्जा प्राप्त असलेल्या श्रीक्षेत्र महादेव संस्थान, ईचा-नागी येथे रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रि निमित्त येणाऱ्या भक्तांना श्रीक्षेत्र महादेव संस्थान, ईचा-नागी व पंचक्रोशीतील शिवभक्तांच्यावतीने फराळ व चहाचे वितरण करण्यात आले होते.

श्रीक्षेत्र महादेव संस्थान, ईचा-नागी हे पंचक्रोशीतील जागृत देवस्थान म्हणून नावलौकिक असुन, महाशिवरात्रिच्या निमित्त संस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमांमध्ये सकाळी शिव-पार्वती अभिषेक, महाआरती, आलेल्या सर्व भक्तांना दुपारी २ क्विंटल हुसळ, केळे व चहा- पाण्याचे वाटप, संध्याकाळी शिवलीला-अमृत ग्रंथाचे सामुहिक वाचन व महिला भजनी मंडळाचे अखंड - विना हरि नामस्मरण अश्या अनेक धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यासर्व कार्यक्रमांमध्ये व शिवपार्वतीच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

## माजी आमदार प्रा. तुकाराम बिडकर यांना भावपूर्ण आदरांजली

■ प्रतिनिधी | कुंभारी ■

बहुआयामी व्यक्तिमत्त्व लाभलेले माजी आमदार तथा विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे माजी अध्यक्ष स्व. प्रा. तुकाराम बिडकर यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त जय बजरंग मंडळाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. येथील प्रेरणास्थळ श्री गणेश कला महाविद्यालय, एमआयडीसी कुंभारी येथे हा कार्यक्रम अत्यंत शोकाकुल वातावरणात पार पडला.



ज्ञान, कला, क्रीडा, कसरती, कवायती, चित्रपट निर्मिती, लेखन, दिग्दर्शन यांसह कृषी, औद्योगिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे प्रा. बिडकर हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या कार्याची आठवण उपस्थितांनी कृतज्ञतेने केली.

या वेळी जय बजरंग परिवाराचे श्रीकृष्ण बिरकड, चंद्रभान अतकरे, प्रकाश बिरकड, राधा बिडकर, किरण बिरकड, ऋषीकन्या अतकरे, शत्रुघ्न बिरकड, सदानंद गावंडे, प्रा. सदाशिव शेळके, गजानन इंगळे, वामनराव तायडे, बाळासाहेब देशमुख, गजानन म्हैसने, बाळासाहेब अतकरे आदी उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक संघ विदर्भ सचिव दिनेश तायडे, अकोला जिल्हाध्यक्ष विलास खुमकर, मार्गदर्शक बळीराम झांमरे, दिग्दर्शक निलेश जळमकर, शारीरिक शिक्षण संघटना विदर्भ सचिव राजेंद्र जळमकर, दीपक बिडकर, अध्यक्ष दिनकर गायकवाड, अनिल मालगे, ज्ञानेश्वर बिरकड, सुरेश बोचरे, डॉ. किसन मेहेरे, विलास इंगळे, राजेश आमले, दिनकर धामणकर, डॉ. सूर्यभान नागूलकर, जानराव आगळे, प्रवीण वाघमारे, संतोष काकपुरे, विजय म्हैसने यांच्यासह जय बजरंग परिवार व व्यायामशाळेचे पदाधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## हॉकी स्टिकच्या प्रहाराने विद्यार्थ्याचा पाय फ्रॅक्चर

### शाळेच्या आवारात झाले भांडण; पालकांची पोलिसांत तक्रार

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील डाबकी रोड परिसरातील अन्नपूर्णा माता मंदिरासमोरील एका शाळेत खेळाच्या तासिकेदरम्यान घडलेल्या प्रकारात पाचवीतील एका विद्यार्थ्याचा पाय फ्रॅक्चर झाल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना १० फेब्रुवारी रोजी घडली असून, याप्रकरणी विद्यार्थ्याच्या पालकांनी डाबकी रोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाचवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची खेळाची तासिका सुरू होती. सर्व विद्यार्थी मैदानावर खेळत असताना एका विद्यार्थ्याचा फुटबॉल दुसऱ्या विद्यार्थ्याजवळ गेला. फुटबॉल लागून कोणतीही दुखापत झाली नसतानाही संबंधित विद्यार्थ्याने रागाच्या भरात दुसऱ्या विद्यार्थ्याच्या पायावर हॉकी स्टिकने जोरदार प्रहार केला. या प्रहारात विद्यार्थ्याच्या पायाला गंभीर दुखापत होऊन फ्रॅक्चर झाल्याचे समोर आले आहे. घटना शाळेच्या वेळेत आणि शाळेच्या आवारात घडल्याने शालेय प्रशासनाच्या देखरेखीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. घटनेच्या वेळी शिक्षक उपस्थित होते का? विद्यार्थ्यांवर योग्य देखरेख का नव्हती? अशा अनेक प्रश्नांची चर्चा पालकवर्गात सुरू आहे. दरम्यान, जखमी विद्यार्थ्यावर उपचार सुरू असून, या प्रकरणात शाळा प्रशासनाची जबाबदारी निश्चित करण्याची मागणी पालकांकडून होत आहे.

पोलिसांनी तक्रारीची नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

---

## पुलवामा हल्ल्यातील शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली




■ प्रतिनिधी | अकोला ■

१४ फेब्रुवारी हा दिवस सर्वसाधारणपणे युवकांकडून प्रेमदिन म्हणून साजरा केला जातो; मात्र मोठी उमरी प्रभाग क्रमांक ४ मधील तरुणांनी देशभक्तीचा अनोखा संदेश देत पुलवामा दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. बदलत्या काळाचे भान ठेवत तरुणांनी राष्ट्रप्रेमाची भावना व्यक्त करत शहीदांच्या स्मृतींना अभिवादन केले.

१४ फेब्रुवारी २०१९ रोजी जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर-जम्मू राष्ट्रीय महामार्ग वर केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या जवानांचा ताफा जात असताना स्फोटकांनी भरलेली कार बसला धडकवून भीषण स्फोट घडवून आणण्यात आला होता. या भ्याड हल्ल्यात ४० जवान शहीद झाले होते, तर अनेक जखमी झाले. सुरक्षा दलांवरील हा सर्वात मोठ्या दहशतवादी हल्ल्यांपैकी एक मानला जातो.

या काळ्या घटनेच्या स्मृती जागवत गावातील सैन्य व लष्करात कार्यरत जवान सुट्टीवर आले असताना त्यांच्या पुढाकारातून श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण चोपडे होते. कार्यक्रमासाठी संदीप कडू, सुरेंद्र बंड, मनोहर इंगळे, आकाश जायले, आकाश सपकाळ, भास्करराव शिरभाते यांनी विशेष पुढाकार घेतला. यावेळी अ‍ॅड. सुरत चंदनकार, अ‍ॅड. आकाश भगत, गौरव सोनोने, रोहन बोरकर, विक्रम धाडगे, विशाल घरडे, सदानंद पळसपगार, अभी तायडे, दिनकर सपकाळ तसेच परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## संत सेवालाल महाराज जयंती उत्साहात



**खेट्री :** पातूर तालुक्यातील सावरगाव येथे संत सेवालाल महाराज यांची जयंती उत्साहपूर्ण व भक्तिभावाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त गावातील मुख्य रस्त्यावरून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. पारंपरिक बंजारा वेशभूषेत सजलेल्या महिला-पुरुषांसह लहान मुलींच्या सहभागामुळे शोभायात्रेला विशेष आकर्षण लाभले. कार्यक्रमाची सुरुवात संतांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. उपस्थितांनी आपल्या मनोगतातून महाराजांच्या कार्याचा गौरव करत समाजातील एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक प्रगतीसाठी त्यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. जयंतीनिमित्त बंजारा बोलीतील गीत, पारंपरिक नृत्य व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. बंजारा नृत्य सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. ग्रामस्थ, तरुण मंडळाचे कार्यकर्ते तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाशिवरात्री निमित्त सालासर बालाजी मंदिरात बाबा अमरनाथाची भव्य झांकी

■ प्रतिनिधी | अकोला ■

गंगानगर येथील पवित्र सालासर बालाजी मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त बाबा अमरनाथाची भव्य झांकी साकारण्यात आली असून भाविकांची मोठी गर्दी होत आहे. श्री सालासर बालाजी सेवा समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उत्सवात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

उत्सवानिमित्त पुरोहित हरीश गोगरकर व सहकारी पुरोहितांनी अखंड लघुरुद्रपाठाचे पठण केले. देशभरातील विविध पवित्र नद्यांच्या पाण्याने १००८ जलधारांद्वारे अखंड सहस्त्रधारा जलाभिषेक करण्यात आला. यावेळी 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा अखंड जप करण्यात येत परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

मंदिरात शिवलिंगाचा आकर्षक व भव्य अलंकार करण्यात आला होता. त्यानंतर भाविकांच्या उपस्थितीत सामूहिक महाआरती पार पडली. महाशिवरात्रीनिमित्त मंदिर परिसरात रंगीत विद्युत रोषणाई व फुलांची देखणी सजावट करण्यात आली होती. तसेच मुलांच्या मनोरंजनासाठी विशेष कक्ष उभारण्यात आला होता.



बाबा अमरनाथाच्या झांकी दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. श्रद्धा व भक्तीभावाने वातावरण भारावून गेले होते. या झांकी उत्सवाचा समारोप सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजेपर्यंत होणार आहे. शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून झांकी दर्शन व सहस्त्रधारा जलाभिषेकाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सालासर बालाजी सेवा समितीच्या सेवादारांनी केले आहे.

---

## समाजसेवक विनोद रोकडे यांना 'समाजरत्न पुरस्कार' जाहीर

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शहरातील सामाजिक क्षेत्रात सातत्यपूर्ण व उल्लेखनीय योगदान देणारे समाजसेवक विनोद मंगलचंद रोकडे (जैन) यांना दैनिक दैनिक चालु वार्ता यांच्या वतीने दिला जाणारा 'समाजरत्न पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. समाजसेवा, शैक्षणिक उपक्रम, युवक मार्गदर्शन तसेच गरजू घटकांसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान घोषित करण्यात आला.

रोकडे यांनी विघ्नहर्ता फाउंडेशनच्या माध्यमातून रक्तदान शिबिरे व विविध सामाजिक उपक्रम राबवले असून, श्री दिगंबर जैन ग्लोबल युवा महासभाचे वाशिम जिल्हाध्यक्ष म्हणूनही त्यांनी सक्रिय योगदान दिले आहे. सामाजिक ऐक्य वाढवणे, युवकांना योग्य दिशा देणे आणि गरजूंना तत्पर मदत करणे, हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य ठरले आहे. हा पुरस्कार १९ फेब्रुवारी २०२६ रोजी, छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त पुणे येथे आयोजित सोहळ्यात मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर होताच मालेगाव शहरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पाटणी चौक येथे भाजपाचे तीव्र निषेध आंदोलन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ आज भारतीय जनता पार्टी वाशिम शहर, वाशिम तालुका व अनसिंग मंडळाच्या वतीने पाटणी चौक येथे जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी शहराध्यक्ष मनिष मंत्री, तालुकाध्यक्ष एकनाथ कड पाटील, अनसिंग मंडळाध्यक्ष संतोष उगले पाटील

नगरसेवक गणेश खंडाळकर, अनिल ताजने, नितेश राठी, कुणाल हेडा, यांच्यासह स्वप्निल जाधव, रामा इंगळे, सुनील तापडिया, सुभाष नानोटे, राम ठेंगडे, योगेश लोनसुने, अमोल जाधव, शंकर देशमुख, गजानन गोटे, महादेव कव्हर, योगेश राजगुरू, प्रमोद इंगोले, गजानन पाटोळे, राजू कालवार , कु. सीमा वाळके, सौ. सीमा आंबेकर, राजेश घुले, गोपाल पहाडे, राम बोरा, सौरभ गंगावणे, नितीन शिवलकर, गजानन वाळके, पवन किल्लेदार व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




यावेळी बोलताना शहर अध्यक्ष मनिष मंत्री यांनी स्पष्ट केले की, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत, स्वाभिमानाचे प्रतीक व हिंदवी स्वराज्याचे प्रणेते आहेत. त्यांच्या कार्याचा व विचारांचा महाराष्ट्राच्या घडणीत अत्यंत महत्त्वाचा वाटा आहे. अशा महान व्यक्तिमत्त्वाची तुलना इतर कोणत्याही ऐतिहासिक व्यक्तीशी करणे अयोग्य व महाराष्ट्राच्या भावनांना ठेच देणारे आहे. भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, महाराष्ट्राच्या इतिहासात व राज्याच्या घडामोडींमध्ये टिपू सुलतान यांचा थेट संबंध नसताना अशी तुलना करणे हे जाणीवपूर्वक केलेले वक्तव्य असून ते कदापि सहन केले जाणार नाही. भारतीय जनता पार्टी अशा प्रकारच्या विधानांचा तीव्र शब्दांत निषेध करते व भविष्यात अशी विधाने टाळावीत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला. सदर निषेध आंदोलन शांततेत व संघटित पद्धतीने पार पडले.

# पुण्यात भाजपा-काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने

## हर्षवर्धन सपकाळांच्या वक्तव्यावरून वाद पेटला

**पुणे**- काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची थेट छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबरोबर तुलना करणारे वक्तव्य केल्यानंतर राज्यात चांगलेच राजकारण तापले आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर जोरदार टीका केली.

दरम्यान, हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध करत भाजपाच्या कार्यकर्त्यांकडून आज राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. पुण्यात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आज आंदोलन केले. मात्र, यावेळी भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याने मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले.




भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पुणे काँग्रेस भवनाच्या बाहेर आंदोलन करत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आंदोलनावेळी दगडफेक आणि बाटल्या फेकल्याचा आरोप काँग्रेसने केला असून यामध्ये काही कारच्या काचा फुटल्या, तसेच गाड्यांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच काँग्रेसच्या एका कार्यकर्त्याला दगड लागल्याने तो रक्तबंबाळ झाल्याचीही माहिती समोर येत आहे.

दरम्यान, भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्यामुळे पुण्यात काही वेळ मोठा गोंधळ आणि तणाव निर्माण झाला होता.

मात्र, त्यानंतर पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले असून आता तणावपूर्ण शांतता आहे.

काँग्रेसभवनाच्या बाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे.

# राष्ट्रवादीच्या विलीनीकरणावर गप्प राहण्याचा निर्णय

## शशिकांत शिंदे यांची भूमिका

**पुणे**- अजितदादांच्या निधना नंतर दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेने जोर धरला होता. दोन्ही बाजूंच्या नेत्यांकडून दावे-प्रतिदावे करण्यात येत होते. मात्र शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसने अचानक या चर्चेला पूर्णविराम देत गप्प राहण्याचा निर्णय घेतला आहे. या विषयावर काहीही भाष्य करणार नाही, अशी भूमिका प्रदेश अध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी आज जाहीर केली.



दादा असताना दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाबाबतचा निर्णय झाला होता. त्यांच्या पक्षातील अनेक लोक याबाबत बोलत आहेत. मात्र आता आम्ही हा विषय बंद केला आहे. आम्हीच विलीनीकरणाच्या मागे लागलो आहे असं चित्र निर्माण केलं जात आहे. आमच्याकडून यासाठी गडबड करण्यात आलेली नाही. दादांच्या निधनानंतर त्यांचीच चर्चा सुरू झाली. त्यानंतर आम्ही फक्त सत्य बोललो, शपथपूर्वक बोललो. आम्ही एवढंच म्हणालो की, दादांची ही इच्छा होती ती पूर्ण करायची आहे, मात्र आता यावर बोलायचं नाही हे आम्ही ठरवलं आहे. राष्ट्रवादी पक्ष पुन्हा जोमाने काम करण्याच्या भूमिकेत असल्याचे शशिकांत शिंदे यांनी स्पष्ट केले.

विलीनीकरण झाल्यानंतर तुम्ही एनडीएसोबत जाणार होतात की अजित पवार एनडीएतून बाहेर पडणार होते? या प्रश्नावर बोलताना शिंदे म्हणाले, 'याबाबत काय निर्णय घ्यायचा हे जिल्हा परिषद निवडणुकीच्या निकालानंतर ठरणार होतं. त्यांच्या मनात काय होतं, माझ्या मनात काय होतं, हे आता गेल्यानंतर सांगणं योग्य नाही. इथून पुढे एनडीएसोबत जायचं की नाही, हा त्यांचा निर्णय असणार आहे. सुनेत्रा वहिनींचा तो अधिकार असणार आहे, असे शिंदे म्हणाले.

# विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना अलिबागमधील शेतकऱ्यांनी हुसकावले

## मालक घरात नसताना विनापरवाना शेतात घुसून जमिनीची मोजणी

**अलिबीग**- शेतकरी कुटुंब लग्नाला गेले असताना विनापरवाना त्यांच्या हद्दीत घुसून जमीन मोजणी करणारे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि त्यांच्या बगलबच्च्यांना अलिबागच्या म्हात्रोळी गावातील पाटील कुटुंबीयांनी अक्षरशः हुसकावून लावले. नार्वेकर यांच्यासोबत असलेल्या बगलबच्च्यांना 'पुन्हा आमच्या शेतात पाय टाकाल तर खबरदार' असा सज्जड दमच या शेतकरी कुटुंबाने दिला.



अलिबाग तालुक्यातील म्हात्रोळी गावात सेजल शहा यांची अडीच एकर जागा आहे. ही जागा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना खरेदी करायची असून त्याबाबतचे आर्थिक व्यवहार सुरू आहेत. या जागेची मोजणी करण्यासाठी राहुल नार्वेकर म्हात्रोळीत त्यांच्या साथीदारांसह पोहोचले. त्यांच्यासोबत जमीन मोजणी करणारे कर्मचारीही होतेआम्ही लग्नाला गेल्याचा गैरफायदा घेता कायद्यायाची माहिती पाटील कुटुंबीयांना कळताच ते थेट त्यांच्या शेतात आले. नार्वेकर आणि त्यांच्या साथीदारांना मोजणी करताना पाहून त्यांच्या संतापाचा भडका उडाला. तुम्ही ज्या जागेत उभे आहात ती आमची आहे. विनापरवानगी आमच्या शेतात तुम्ही घुसखोरी का केली? आमच्या शेतात घुसून मोजणी करण्याचा तुम्हाला अधिकार कोणी दिला? आम्ही लग्नाला गेलो त्याचा गैरफायदा घेऊन आमच्या शेतात घुसता काय? असा संतप्त सवाल पाटील कुटुंबीयांनी केला. एका महिलेने तर नार्वेकर यांच्या साथीदारावर हात उगारला. त्यांचा रुद्रावतार पाहून नार्वेकरांसोबत असलेले साथीदार आणि मोजणी अधिकाऱ्यांनी तिथून काढता पाय घेतला. दरम्यान, जागेचे मालक रमेश पाटील यांनी हा आमचा कौटुंबीक वाद असून, नार्वेकरांच यांचा संबंध नसल्याचे सांगितले.

# बॅलेट पेपरवरील निवडणुकीत तेलंगणात भाजपचा दारुण पराभव

## काँग्रेसचा मोठा विजय; १५३७ जागा जिंकल्या

**तेलंगणा**- मतपत्रिकेवर झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचा दारुण पराभव झाला आहे. काँग्रेसने सर्वाधिक वॉर्ड ताब्यात घेत मोठा विजय मिळवला आहे. पश्चिम बंगालसह पाच राज्यांत होऊ घातलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेससाठी हा 'बूस्टर डोस' मानला जात आहे.



पक्षीय बलाबल
(जाहीर निकाल २९९५)

| | |
|---|---|
| काँग्रेस | १५३७ |
| बीआरएस | ७८१ |
| भाजप | ३३६ |
| एमआयएम | ७० |
| अपक्ष | १८३ |
| इतर | ७५ |
| माकप | ३ |

तेलंगणात ११६ नगरपालिका, ७ महापालिका व पंचायत समित्यांचे निकाल आज घोषित झाले. आतापर्यंत २९९५ वॉर्डांचे निकाल हाती आले असून त्यापैकी १५३७ वॉर्ड काँग्रेसने जिंकले आहेत. भाजप, एमआयएम आणि बीआरएस या तिन्ही प्रमुख पक्षांना काँग्रेसने आस्मान दाखवले आहे. प्रमुख विरोधी पक्ष बीआरएस ७८१ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे.

तेलंगणात रेवंथ रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसचे सरकार आहे. त्यांच्या लोकप्रियतेचा काँग्रेसला फायदा झाला. एमआयएमने समाधानकारक कामगिरी केली आहे. पेंद्रातील सत्तेची साथ असतानाही भाजपला जेमतेम यश मिळाले आहे.

तेलंगणाची सत्ता गमावल्यापासून के. चंद्रशेखर राव यांची भारत राष्ट्र समिती (बीआरएस) दुबळी होत चालली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये या पक्षाला फारशी कामगिरी करता आलेली नाही. राज्याच्या शहरी भागात बीआरएसचा याआधी चांगला दबदबा होता. मात्र, यावेळी शहरांमध्ये बीआरएसला एकही जागा मिळाली नाही.

# शाहिदच्या 'ओ रोमियो'ची ८.२५ कोटींची ओपनिंग

**मुंबई**- दिग्दर्शक विशाल भारद्वाज यांचा व्हॅलेंटाईन डेच्या एक दिवस आधी सिनेमागृहात प्रदर्शित झालेल्या 'ओ रोमियो'ने पहिल्याच दिवशी ८.२५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटात शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर शनिवार आणि रविवारी चांगला गल्ला जमवेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. 'ओ रोमियो' या चित्रपटाने शाहिद कपूरचा याआधीचा चित्रपट 'देवा'ला मागे टाकले




आहे. 'देवा'ने पहिल्या दिवशी केवळ ५.५ कोटींची ओपनिंग केली होती. तर शाहिदच्या कबीर सिंहने २० कोटींची ओपनिंग केली होती. 'ओ रोमियो'साठी शाहिद कपूरने ४५ कोटी तर तृप्तीला ६ कोटी रुपये फी मिळाले.

### इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या पुरस्काराकरिता

# २१ फेब्रुवारी पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई**- इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत देण्यात येणारे महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार आणि क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार या पुरस्कारासाठी सन २०२५-२६ वर्षाकरिता इच्छुक व्यक्ती तसेच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्था यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

यासाठी व्यक्ती व संस्थांनी २१ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करावे असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक मुंबई शहर प्रसाद खैरनार यांनी केले आहे.

पुरस्कारासाठी अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत, अर्जदार व्यक्ती, संस्था महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराने संबंधित समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक अथवा अन्य क्षेत्रातील उत्थानासाठी सलग व उल्लेखनीय स्वरूपाचे कार्य केलेले असावे.

अर्ज विहित नमुन्यात करणे बंधनकारक असून शासन निर्णयात नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे, कार्याचा सविस्तर अहवाल, शिफारस पत्रे व प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अपूर्ण, चुकीची माहिती असलेले अथवा मुदतीनंतर प्राप्त होणारे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतले जाणार नाहीत. पुरस्काराबाबत अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येईल व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.अर्जाचा नमुना, शासन निर्णयातील सविस्तर अटी व शर्ती तसेच पुरस्कारांबाबतची अधिक माहिती सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, मुंबई शहर (चौथा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, आर.सी. चेंबुरकर मार्ग, चेंबुर पुर्व ४०००७१) येथे उपलब्ध असून २१ फेब्रुवारी २०२६ सायं. पाच वाजेपर्यंत संबंधित पुरस्कारासाठीचे प्रस्ताव या कार्यालयास करणे आवश्यक आहे. पात्र व इच्छुक व्यक्ती व संस्थांनी विहित मुदतीत प्रस्ताव करावेत, असे प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# १२वीच्या विद्यार्थ्याचा थेट सुप्रीम कोर्टात युक्तिवाद

## मेडिकल कॉलेजला प्रवेश न मिळाल्याने केस लढली अन् जिंकली

**जबलपूर**- शिक्षणाची ओढ असलेल्या एका १२ वी उत्तीर्ण झालेल्या १९ वर्षीय विद्यार्थ्याने आपल्या शैक्षणिक हक्कासाठी थेट सुप्रीम कोर्टात धाव घेतली. सुप्रीम कोर्टात वकिलामार्फत बाजू न मांडता स्वतःच कोर्टात युक्तिवाद केला आणि केस जिंकून दाखवली. अथर्व चतुर्वेदी असे या तरुणाचे नाव आहे. तो मध्य प्रदेशातील जबलपूरमधील रहिवासी आहे.

अथर्वने दोन वेळा 'नीट' परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. तरीही त्याला मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला नाही. अथर्व आर्थिक मागासवर्ग या प्रवर्गात येतो. परंतु, खासगी मेडिकल कॉलेजमध्ये ईव्हीएस कोटा नसल्याने त्याचा प्रवेश होऊ शकला नाही. सुप्रीम कोर्टात सरन्यायाधीश सूर्य कांत यांचे खंडपीठ सुनावणीनंतर उठण्याच्या प्रयत्नात असताना एका आवाजाने १० मिनिटे बोलण्याची विनंती खंडपीठाकडे केली. हा आवाज कोणत्याही वकिलाचा नव्हता, तर जबलपूरमधील १२ वी पास आणि १९ वर्षीय अथर्व चतुर्वेदी याचा होता. अथर्वचे डॉक्टर व्हायचे स्वप्न होते. संविधानाच्या कलम १४२ अंतर्गत अथर्वने



सुप्रीम कोर्टात जबरदस्त युक्तिवाद केला. या युक्तिवादानंतर सुप्रीम कोर्टाने एनएमसी आणि मध्य प्रदेश सरकारला निर्देश दिले की, राज्य सरकारने खासगी कॉलेजमध्ये ईडब्ल्यूएस आरक्षण अधिसूचित केले नाही.

त्यामुळे त्याला प्रवेश मिळाला नाही. ईडब्ल्यूएस वर्गातील पात्र विद्यार्थ्यांना २०२५-२६ सत्रासाठी प्रोव्हिजनल एमबीबीएससाठी प्रवेश द्यावा. अथर्वने ही केवळ कायदेशीर लढाई जिंकली नाही, तर त्याने पाहिलेले स्वप्न सत्यात उतरवण्याचा मार्ग मोकळा केला आहे.

**डॉक्टर कशाला, वकील व्हा!**

अथर्वने इंजिनीअरिंग आणि मेडिकल दोन्ही एन्ट्रस परीक्षा उत्तीर्ण केलेल्या आहेत. त्याने बायोलॉजी निवडले. मेडिकलसाठी लागणारी नीट परीक्षा एकदा नव्हे, तर दोनदा पास केली. अथर्वने ५३० गुण मिळवले होते.

ज्यावेळी जबलपूर हायकोर्टात अथर्वने युक्तिवाद केला, तर न्यायाधीशांनी गमतीत म्हटले, अथर्वने डॉक्टर नाही, तर वकील व्हायला हवे. तुम्ही चुकीच्या क्षेत्रात जात आहात, असेही न्यायाधीशांनी गमतीत म्हटले होते.

# संक्षिप्त


## १.२८ लाख कोटी रुपयांचे सोने गायब

**नवी दिल्ली**- भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) शुक्रवारी जाहीर केलेल्या परकीय चलन साठ्याच्या (फॉरेक्स रिझर्व्ह) ताज्या आकडेवारीत धक्कादायक माहिती समोर आली आहे. केवळ एका आठवड्यात देशाच्या सोन्याच्या साठ्यात सुमारे १.२८ लाख कोटी रुपयांची घट झाली असून गोल्ड रिझर्व्हमध्ये १४ अब्ज डॉलरहून अधिक घसरण नोंदवली गेली आहे. मात्र त्याच काळात परकीय चलन मालमत्तेत ७.५० अब्ज डॉलरहून अधिक वाढ झाली. परिणामी देशाच्या एकूण परकीय चलनात ६.७ अब्ज डॉलरची घट झाली आहे.या घसरणीमुळे देशाचा परकीय चलन साठा आयुष्यभरातील उच्चांकावरून खाली आला आहे. यापूर्वीच्या आठवड्यात देशाच्या परकीय चलनात १४ अब्ज डॉलरहून अधिक वाढ झाली होती आणि त्यात प्रमुख वाटा सोन्याच्या साठ्याचा होता. त्याच वेळी परकीय चलन मालमत्तेत सुमारे ५०० दशलक्ष डॉलरची घट नोंदवली गेली होती.आरबीआयच्या माहितीनुसार, ६ फेब्रुवारीला संपलेल्या आठवड्यात हिंदुस्थानचा परकीय चलन साठा ६.७११ अब्ज डॉलरने घटून ७१७.०६४ अब्ज डॉलरवर आला. त्याआधीच्या आठवड्यात हा साठा १४.३६१ अब्ज डॉलरने वाढून ७२३.७७४ अब्ज डॉलर या विक्रमी पातळीवर पोहोचला होता. सलग चार आठवडे वाढ झाल्यानंतर आता साठ्यात घट नोंदवली गेली आहे. या चार आठवड्यांत एकूण ३६.९७ अब्ज डॉलरची वाढ झाली होती. तज्ज्ञांच्या मते, युरोपियन युनियन आणि त्यानंतर अमेरिकेसोबत झालेल्या व्यापार करारांमुळे साठ्यात वाढ झाली होती.




## कॅलिफोर्नियात हिंदुस्थानी विद्यार्थी अचानक बेपत्ता

**चेन्नई**- आयआयटी मद्रासमधून पदवी मिळवलेला आणि कॅलिफोर्नियात शिक्षण घेत असलेला हिंदुस्थानी विद्यार्थी साकेत श्रीनिवासैया अचानक बेपत्ता झाला आहे. कॅम्पसमध्ये त्याचा बॅकपॅक मिळाला असून गेल्या पाच दिवसांपासून तो बेपत्ता झाला आहे. साकेत हा कॅलिफोर्नियाच्या बर्कले विद्यापीठात पदव्युत्तरचे शिक्षण घेत होता. साकेत ९ फेब्रुवारीपासून बेपत्ता आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, साकेतला अखेरचे यूसी बर्पले कॅम्पसपासून जवळपास एक किलोमीटर दूर पाहिले गेले आहे. तेव्हापासून तो कोणालाच दिसला नाही.



## केदारनाथ धामचे दरवाजे २२ एप्रिलला उघडणार

**केदारनाथ** -रविवार १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीच्या निमित्ताने केदारनाथ संस्थेकडून एक मोठी घोषणा करण्यात आली आहे. या घोषणेनुसार केदारनाथ धामचे दरवाजे उघडण्याची तारीख २२ एप्रिल (बुधवार) सकाळी ८ वाजता निश्चित करण्यात आली आहे. महाशिवरात्रीच्या पवित्र मुहूर्तावर शीतकालीन आसन ओंकारेश्वर मंदिरात पंचांग गणना आणि वैदिक जप करून या शुभ मुहूर्ताची घोषणा करण्यात आली. या घोषणेमुळे भाविकांमध्ये उत्साह निर्माण झाला. परंपरेनुसार बाबा केदारनाथची पंचमुखी डोली नियोजित तारखेपूर्वी केदारनाथला रवाना होईल.१८ एप्रिल रोजी उखीमठात भैरवनाथाची पूजा केली जाईल. १९ एप्रिल रोजी उखीमठ येथून फाट्यासाठी डोली निघेल, २० एप्रिल रोजी गौरीकुंड येथे रात्रीचा मुक्काम करेल आणि २१ एप्रिल रोजी केदारनाथ धाम येथे पोहोचेल. त्यानंतर २२ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता विधीपूर्वक दरवाजे उघडले जातील.



## अडचणी वाढल्या... झिरवाळ नॉट रिचेबल!

**मुंबई**- मंत्रालयातील लाचखोरी प्रकरणामुळे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ चांगलेच अडचणीत आले आहेत. मंत्री कार्यालयातच हा प्रकार घडल्याने झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. दरम्यान, मंत्री झिरवाळ सकाळपासून नॉट रिचेबल असल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा आहे. मंत्री कार्यालयातील लिपिक राजेंद्र ढेरंगे याने मेडिकलचा निलंबित परवाना पुन्हा सुरू करण्यासाठी लाचेची मागणी केल्याचा आरोप आहे. त्यातील ३५ हजारांची लाच घेताना लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंत्रालयात रंगेहाथ पकडले. लिपिकाने मंत्री झिरवाळांच्या स्वीय सहाय्यकाच्या सूचनेनुसार लाच घेतल्याचा दावा केला आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन मंत्री झिरवाळ एसीबीच्या रडारवर आहेत. शनिवारचे सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करून झिरवाळ हे नॉट रिचेबल झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.



## डोंबिवलीत बर्फातून साकारली पाच शिवलिंगांची प्रतिकृती

**ठाणे** – महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सण आहे. हा सण मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात सर्वत्र साजरा केला जातो. या निमित्ताने शहरातील शिवमंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असते. रविवारी १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्र असल्याने शहरातील विविध मंदिरांमध्ये दिवसभर पूजा-अर्चा, अभिषेक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तर डोंबिवलीत एका संस्थेच्यावतीने विशेष आकर्षक शिवप्रतिमा साकारली आहे. यंदा बर्फातून पाच शिवलिंगांची प्रतिकृती साकारली जाणार आहे. या अद्वितीय रचनांचे दर्शन सायंकाळी ५.३० ते मध्यरात्रीपर्यंत भाविकांना घेता येणार आहे. त्यामुळे हर हर महादेवाच्या जयघोषात संपूर्ण डोंबिवली महाशिवरात्रीच्या भक्तिरंगात न्हाऊन निघत आहे.



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ८२ ■ सोमवार, १६ फेब्रुवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# 'हर हर महादेव'च्या निनादात शिवमय झाला वर्धा जिल्हा

## -महाशिवरात्री निमित्त शिवालयांत भाविकांचा महासागर; ढगा भूवनात दीड लाखांची उपस्थिती

**वर्धा जनमाध्यम :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर संपूर्ण वर्धा जिल्हा भक्तिरसात न्हाऊन निघाला. पहाटेच्या काकड आरतीपासून मध्यरात्रीच्या जागरणापर्यंत 'हर हर महादेव' आणि 'ॐ नमः शिवाय'च्या अखंड गजराने आकाश दुमदुमले. बेलपत्रांचा सुगंध, धूप-दीपाची दरवळ, दुग्धाभिषेकाच्या जलधारा आणि दीपमाळांच्या प्रकाशात जिल्हाभरातील शिवालये अक्षरशः शिवमय झाली होती.

कारंजा तालुक्यातील ढगा भूवन येथे 'छोटा महादेव'च्या दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांची प्रचंड गर्दी उसळली. ट्रस्टतर्फे विधिवत रुद्राभिषेक, महाआरती व पूजन करण्यात आले. मंदिरातील गुहेत आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. शिवलिंगावर ओसंडून वाहणाऱ्या दुग्धाभिषेकाच्या धारांमध्ये भक्तांचे भावनिक अश्रू मिसळले होते. दिवसभरात सुमारे दीड लाखांहून अधिक भाविकांनी येथे माथा टेकविल्याची माहिती ट्रस्टतर्फे देण्यात आली. ग्रामीण भागातून येणाऱ्या भाविकांसाठी राज्य परिवहन महामंडळाने विशेष बससेवा सुरू केल्याने दर्शन सोयीस्कर झाले.



**महादेवपुरा मंदिरात पहाटेपासून भक्तीचा जल्लोष-** वर्धा शहरातील प्राचीन महादेवपुरा शिवमंदिर येथे पहाटे पाच वाजता महाआरती पार पडली. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत ओवाळणी केली, तर युवकांनी स्वयंसेवक म्हणून रांगांचे नियोजन सांभाळले. मंदिर परिसरात पूजासाहित्याच्या दुकानांची रेलचेल दिसून आली. दिवसभर शिस्तबद्ध रांगा लागल्या होत्या. 'ॐ नमः शिवाय'च्या जपाने परिसराला आध्यात्मिक तेज प्राप्त झाले होते.

**कोटेश्वर आणि पोहणा येथे रात्रभर जागरण-** देवळी तालुक्यातील कोटेश्वर मंदिर येथे जिल्ह्याबाहेरील भाविकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. रात्रभर भजन, कीर्तन आणि रुद्राभिषेकाचे आयोजन करण्यात आले. हिंगणघाट तालुक्यातील पोहणा शिवमंदिर येथेही पहाटेपर्यंत अभिषेकासाठी भाविकांच्या रांगा सुरू होत्या. गावोगावून आलेल्या भक्तांनी सामूहिक आरतीत सहभागी होत भक्तिभाव व्यक्त केला.

**पिलापूर रोपवाटिकेत फराळ सेवेचा अनोखा उपक्रम-** अप्पर वर्धा धरण परिसरातील पिलापूर येथे आष्टी वनविभागाने महाशिवरात्री निमित्त भाविकांसाठी फराळ, फळे व चहाचे मोफत वितरण केले. सलग तिसऱ्या वर्षी राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून दहा क्विंटल फराळाचे वाटप करण्यात आले. निसर्गरम्य सान्निध्यात भक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम येथे अनुभवायला मिळाला.

**१२ ज्योतिर्लिंगांचे महापूजन; शास्त्री चौकात भक्तिभाव-** शहरातील हनुमान मां दुर्गा मंदिर शास्त्री चौक येथे १२ ज्योतिर्लिंगांचे महापूजन भक्तिभावात पार पडले. फुलांची आरास, दीपमाळांची रोषणाई आणि धुपाच्या सुवासात मंदिर परिसर शिवमय झाला होता. भजन, कीर्तन व सत्संग कार्यक्रमांनी वातावरण अधिकच पवित्र केले. महाप्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**प्रशासनाचा कडक बंदोबस्त**

भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाने ठिकठिकाणी पोलिस बंदोबस्त तैनात केला होता. मंदिर परिसरात तात्पुरत्या पोलिस चौक्या उभारण्यात आल्या. स्वयंसेवकांनी वृद्ध व दिव्यांग भाविकांना दर्शनासाठी मदत केली. शिस्तबद्ध नियोजनामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. महाशिवरात्रीचा हा उत्सव श्रद्धा, भक्ती आणि सामूहिक एकात्मतेचा जिवंत अनुभव ठरला. दीपमाळांच्या उजेडात आणि शिवनामाच्या अखंड जपात वर्धा जिल्हा भोलेनाथाच्या चरणी लीन झाल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले.

---

## मद्यधुंद चालकाचा हैदोस

# महाराष्ट्र शासनाच्या गाडीने शिवभक्तांच्या कारला चिरडले; तिघे गंभीर

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** महादेवाच्या दर्शनासाठी निघालेल्या निष्पाप शिवभक्तांवर बेफाम शासकीय वाहनाचा कहर कोसळला पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या गाडीने पुलगावहून मोठ्या महादेवाकडे जाणाऱ्या कारला दिलेल्या भीषण धडकेत तिघे गंभीर जखमी झाले, तर पाच जण किरकोळ जखमी झाले. शनिवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास तळेगाव-आष्टी राष्ट्रीय महामार्गावर, निखरा पेट्रोल पंपाजवळ हा थरार घडला.



मिळालेल्या माहितीनुसार, गटविकास अधिकारी सुटीवर गावी गेले असताना त्यांची एमएच ३२ एएच ७२४५ क्रमांकाचे शासकीय वाहन पंचायत समितीच्या आवारात उभे होते. चालक ताहीत शेख याने मद्यप्राशन करून गाडी रस्त्यावर आणल्याचा आरोप आहे. दारूच्या नशेत भरधाव वेगाने येत असताना एमएच ३२ वाय १८०८ क्रमांकाच्या कारला जबर धडक बसली.

देवानंद रामटेके (२५), धर्मानंद ढोके (३०) आणि गणेश डहाके (४२) गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

अपघाताची वार्ता समजताच आष्टी पोलीस ठाणे चे ठाणेदार राजेश जोशी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत चालकास ताब्यात घेतले. शासकीय वाहन जप्त करण्यात आले असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

# विज्ञानाच्या आकाशाकडे झेप... ४४ बालवैज्ञानिकांचा इसरोकडे प्रवास

**वर्धा जनमाध्यम :** विज्ञानाची गोडी मनात रुजली, की भविष्य उजळते. जिल्ह्यातील ४४ गुणवंत विद्यार्थी बंगळुरू येथील भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इसरो) व कुप्पम येथील शैक्षणिक भेटीसाठी आज उत्साहात रवाना झाले. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सहलीचा शुभारंभ करण्यात आला.



इसरोची भेट ही केवळ सहल नसून विज्ञानविश्व समजून घेण्याची मोठी संधी आहे. विद्यार्थ्यांनी या अनुभवातून प्रेरणा घेऊन संशोधन क्षेत्रात झेप घ्यावी, असे आवाहन डॉ. भोयर यांनी केले.

जिल्हा नियोजन समितीच्या नावीन्यपूर्ण योजनेतून, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने ही सहल आयोजित करण्यात आली आहे. जिल्हास्तरावरील विज्ञान प्रदर्शनीत उत्कृष्ट कामगिरी केलेल्या ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

विद्यार्थ्यांसोबत तीन प्राध्यापक, एक विस्तार अधिकारी व एक डॉक्टर अशी टीम असून, संपूर्ण व्यवस्था जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आली आहे. नागपूरहून विमानाने सर्व विद्यार्थी बंगळुरूकडे प्रयाण करणार आहेत. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित होऊन भविष्यात ते देशाचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

**सुट्टीची सूचन**

आज दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ सोमवार रोजी महाशिवरात्री (शिव पुजन) निमित्त जनमाध्यम कार्यालयास सुट्टी असल्याने दि. १७ फेब्रुवारीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

---

# महाशिवरात्री निमित्त खा. अमर काळे यांची उपस्थिती; ग्रामस्थांशी साधला संवाद

**गोजी, (वर्धा) जनमाध्यम :** महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर गोजी येथील श्री क्षेत्र मालखोदी महादेव देवस्थान येथे भक्तिभावाचे वातावरण अनुभवायला मिळाले. पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी रांगा लावल्या होत्या. धूप-दीप, बेलपत्र आणि मंत्रोच्चारांनी परिसर शिवमय झाला होता.



यावेळी खासदार अमर काळे यांनी देवस्थानास भेट देऊन महादेवाचे दर्शन घेतले. त्यांनी विधिवत पूजाअर्चा करून जिल्ह्याच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. दर्शनानंतर त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. गावातील नागरिकांनी पाणीपुरवठा, रस्ते व इतर विकासकामांबाबत निवेदन सादर केले. खा. काळे यांनी संबंधित प्रश्नांवर सकारात्मक पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. महाशिवरात्रीच्या निमित्ताने श्रद्धा आणि विकासाचा सुंदर संगम गोजीत अनुभवायला मिळाला.

---

# आर्वी हत्याकांड प्रकरणी सहा आरोपींना ५ दिवसांचा पीसीआर

**अमरावती/प्रतिनिधीः-** वर्धा जिल्ह्यातील आर्वी येथील ३० वर्षीय तरुणाची हत्या करून पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळल्याच्या थरारक प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सहा आरोपींना न्यायालयाने १३ फेब्रुवारी रोजी पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या गुन्ह्यात एका अल्पवयीन मुलालाही पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध बाल न्याय कायद्यानुसार प्रक्रिया सुरू आहे. अचलपूर तालुक्यातील वाघडोह–खोडगाव शिवार परिसरातील शहानूर कॅनॉलमध्ये बुधवारी सकाळी अर्धजळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. तपासानंतर मृताची ओळख शेख शाहरुख शेख रउफ (वय ३०, रा. आर्वी, जि. वर्धा) अशी पटली. पैशांच्या वादातून हा खून घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पोलिसांनी आर्वी व अंजनगाव सुर्जी येथील सहा जणांना अटक केली आहे.आर्वी येथील टिकेश प्रशांत महाजन (वय २८), प्रशांत हरीचंद्र महाजन (वय ५९) आणि अली अजगर (वय २८) तर अंजनगाव सुर्जी येथील शुभम मोहनलाल रॉय (वय २८), हर्षित प्रकाश गौर (वय १९) आणि निखिल दीपचंद गौर (वय ३२) यांचा समावेश आहे. हत्या केल्यानंतर आरोपींनी मृतदेह जहानपूर शिवारात नेऊन जाळण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पुरावे लपविण्यासाठी मृतदेह कॅनॉलमध्ये फेकण्यात आल्याची माहिती तपासात समोर आली आहे.

---

# एमआयएम-भाजप संगनमताने २१ ठिकाणी सत्ता सौदा:प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

## -शिवरायांच्या नावावर राजकारण, मागे वेगळीच संगत

**वर्धा जनमाध्यम:** राज्याच्या राजकारणात नव्या वादळाची चाहूल लागली आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर थेट हल्ला चढवत एमआयएम-भाजप एकाच थालीचे चट्टेबट्टे असल्याचा घणाघाती आरोप केला. महाराष्ट्रातील २१ ठिकाणी भाजपने एमआयएमशी छुपी आघाडी करून त्यांच्या नगरसेवकांच्या मतांवर सत्ता काबीज केली, असा दावा करत त्यांनी सत्ताधाऱ्यांच्या नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

रविवारी गांधी आश्रम येथे भेट दिल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत सपकाळ यांनी शब्दांची तोफ डागली. भाजप आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांचा अभिमान शिकवू पाहते, ही शोकांतिका आहे. शिवाजी महाराजांचा पराक्रम अद्वितीय आहे, त्यांच्या स्वराज्याच्या प्रेरणेनेच अनेकांनी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. मात्र माझ्या वक्तव्याचा विपर्यास करून त्याला हिंदू-मुस्लिम रंग देणे, ही भाजपची जुनी खेळी आहे, असे ते म्हणाले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधताना सपकाळ म्हणाले, जेव्हा मी त्यांची तुलना औरंगजेबाशी केली तेव्हा ते म्हणाले मला ओळखत नाहीत; पण आता माझ्याबद्दल गरळ ओतत आहेत. महाराष्ट्रातील बेरोजगारी, शेतकरी संकट, अतिवृष्टीची मदत, कर्जमाफी, आंतरराष्ट्रीय करार या ज्वलंत प्रश्नांवर मौन धारण केले जाते, मात्र समाजात ध्रुवीकरण घडविण्याचा उद्योग सुरू आहे. नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या घोषणापत्रातील छायाचित्रांचा उल्लेख करत त्यांनी म्हटले, संविधानात ज्या ज्या महामानवांची छायाचित्रे आहेत, त्यावर आक्षेप घेणे म्हणजे संविधान बदलण्याची मानसिकता दर्शवते. लोकशाहीच्या चौकटीत राहून विचारांची लढाई लढण्याऐवजी धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण केले जात आहे.

सपकाळ यांच्या आरोपांमुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. २१ ठिकाणी झालेल्या कथित आघाड्यांची माहिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी त्यांनी करत पारदर्शकतेचा मुद्दा उचलून धरला.

दरम्यान, भाजपकडून या आरोपांना अद्याप अधिकृत प्रतिसाद देण्यात आलेला नसला तरी राजकीय वातावरण तापले आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा वाद अधिक चिघळण्याची चिन्हे आहेत.

सत्ताधाऱ्यांवर थेट आरोपांची झोड उठवत सपकाळ यांनी दिलेला हा इशारा आगामी राजकीय संघर्षाची नांदी ठरणार का, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

---

# प्रशासक नेमण्याच्या आदेशाला स्थगिती

## -३७१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा

**वर्धा जनमाध्यम :** मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याच्या राज्य सरकारच्या आदेशाला मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ यांनी स्थगिती दिल्याने जिल्ह्यातील तब्बल ३७१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण राजकारणात नव्या घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

लोकसभा व विधानसभा निवडणुकांमुळे ग्रामपंचायत निवडणुका लांबणीवर पडल्या होत्या. कार्यकाळ संपल्यानंतर जिल्ह्यातील ३२१ ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नेमण्यात आले. तसेच २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या आणखी ५० ग्रामपंचायतींमध्येही प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुरू होती. मात्र न्यायालयाच्या स्थगितीमुळे ही प्रक्रिया सध्या थांबली आहे.

**तीन वर्षांपासून प्रशासकराज**

गेल्या तीन ते साडेतीन वर्षांपासून अनेक ग्रामपंचायतींवर प्रशासक कार्यरत आहेत. प्रत्येक प्रशासकाकडे दोन ते तीन गावांची जबाबदारी असल्याने कामाचा ताण वाढला आहे. परिणामी विकासकामांवर परिणाम झाल्याची तक्रार ग्रामस्थांकडून होत आहे. स्थानिक पातळीवरील निर्णयप्रक्रिया आणि ग्रामसभांचा सहभाग कमी झाल्याचीही चर्चा आहे.

जिल्ह्यातील एकूण ५२१ ग्रामपंचायतींपैकी ३२१ ठिकाणी प्रशासक नेमण्यात आले आहेत. त्यामध्ये वर्धा तालुक्यात ६०, सेलू ३६, देवळी ४६, आर्वी २६, आष्टी २३, कारंजा ३४, हिंगणघाट ५६ आणि समुद्रपूर ४० ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

**आणखी ५० ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपणार**

सन २०२६ मध्ये आणखी ५० ग्रामपंचायतींचा कार्यकाळ संपत आहे. त्यामध्ये वर्धा ३, सेलू ३, देवळी ३, आर्वी ७, आष्टी ४, कारंजा ८, हिंगणघाट ५ आणि समुद्रपूर १७ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या ठिकाणी प्रशासक नेमण्याची तयारी सुरू असतानाच न्यायालयीन स्थगिती मिळाल्याने निवडणुकांची शक्यता अधिक बळावली आहे.

**राजकीय हालचालींना वेग**

निवडणुका जाहीर होताच ग्रामीण भागात राजकीय हालचाली तीव्र होण्याची चिन्हे आहेत. संभाव्य उमेदवारांकडून गाठीभेटी व बैठका सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महिला व युवक नेतृत्वालाही संधी मिळण्याची चर्चा रंगू लागली आहे.न्यायालयाच्या निर्णयामुळे आता जिल्ह्यातील ३७१ ग्रामपंचायतींमध्ये लोकप्रतिनिधींची पुनर्स्थापना होण्याची आशा निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील विकासकामांना चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---

# सर्वसामान्य नागरीकांच्या कल्याणासाठी शासन कटीबद्ध : पालकमंत्री

## -चारमंडळ येथे जनता दरबारचे उद्घाटन

**-विविध कामाचे लोकार्पण व भूमीपूजन**

**वर्धा जनमाध्यम :** राज्य शासन सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर व शेवटच्या घटकातील नागरिकांना न्याय देण्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासोबतच त्यांच्या समस्या व अडचणींचे निराकरण करण्याचे काम करीत आहे. चारमंडळ येथील या जनता दरबारातून सर्वसामान्यांय न्याय मिळेल, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केले.

सेलू तालुक्यातील चारमंडळ येथील विठ्ठल रुख्मिनी देवस्थान येथे जनता दरबारचे आयोजन करण्यात आले होते.

त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी दिपक कारंडे, तहसिलदार शकुंतला पाराजे, गट विकास अधिकारी देवानंद पानबुडे, चारमंडळच्या सरपंच निता शेळके, अशोक मुडे, प्रफुल खोडे, शिवनगरच्या सरपंच किरणताई अंबुलकर आदी, भाऊराव सोनवने, हिरेश्वर डफरे, गुणवंत कडू, सचिन कडू, प्रवीण करडे, देवेंद्र डफरे, वासुदेव करडे आदी उपस्थित होते.

जनता दरबार आयोजित करण्यात आलेल्या विठ्ठल रुख्मिनी मंदिराला नुकताच 'क' वर्ग तिर्थस्थळाचा दर्जा देण्यात आला असून या मंदिराच्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. मंदिराच्या सभागृहात केवळ धार्मिक कार्यक्रमच नाही तर गावाच्या विकासाचे विविध उपक्रम देखील घेतल्या गेले पाहिजे, असे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर पुढे बोलतांना म्हणाले.



राज्यात मागील वर्षी नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे मोठे नुकसान झाले होते. या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. शेतकऱ्यांकडून वारंवार पिककर्जमाफीची मागणी होत आहे. शासनाने जूनपर्यंत पिककर्ज माफी करण्यात येणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे यासाठी ज्या शेतकऱ्यांकडे पिककर्ज आहे, अशा शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे तलाठी किंवा तहसिल कार्यालयात जमा करावे, जेणे करुन त्यांना कर्जमाफीचा लाभ घेता येईल, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या ई-केवायशी चुकीमुळे काही नावे वगळण्यात आले होते. त्यामुळे शासनाच्यावतीने योजनेच्या लाभाचा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात अडचणी आल्या. यासाठी ज्या लाभार्थ्यांनी चुकीची माहिती सादर केली होती, अशा लाभार्थ्यांनी तत्काळ सुधारीत माहिती पोर्टलवर भरावी. लवकरच लाडकी बहीण योजनेचा हप्ता खात्यात जमा करण्यात येणार असल्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले.

यावेळी पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते मुलींना शाळेत जाण्यासाठी १३ सायकलींचे वितरण करण्यात आले. तसेच जलजीवन मिशन अंतर्गत ७७ लक्ष ६७ हजार रुपये खर्च करुन बांधन्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे व पांदन रस्ता व सिमेंट रस्त्याचे भूमीपूजन व लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमाला तालुकास्तरीय अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# महाशिवरात्रीला काळाची झडप; वणा डॅमने हिरावला तरुणाचा जीव

**हिंगणघाट जनमाध्यम :** महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी आनंदासाठी गेलेले सहा मित्र; पण परतीच्या वाटेवर काळाने एकाचा हातच सोडवून घेतला. हिंगणघाट तालुक्यातील बोरगाव दातार येथील वणा नदीवरील डॅममध्ये बुडून आकाश शेषराव बावणे (वय २१) या तरुणाचा हृदयद्रावक मृत्यू झाला. उत्सवाचा दिवस क्षणार्धात शोककल्लोळात बदलला.

सकाळी दहाच्या सुमारास आकाश आपल्या मित्रांसह डॅमवर पोहण्यासाठी गेला होता. महेश कावळे (३०), आदित्य सातघरे (१९), महेश ढवळे (१९), स्मित किटे (१७) आणि भुनेश्वर गोळकर (१६) हे सर्वजण त्याच्यासोबत होते. पोहून झाल्यानंतर घरी परतताना आकाशची चप्पल पाण्यात पडली. ती काढण्यासाठी तो पुन्हा काठावर गेला. याचवेळी खडकावरून त्याचा पाय घसरला आणि तो थेट खोल पाण्यात कोसळला.

मित्रांनी जीवाच्या आकांताने वाचविण्याचा प्रयत्न केला, मात्र पाण्याची खोली आणि तळाशी अडकल्याने तो नजरेआड झाला.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी धाव घेतली. अनेक तासांच्या शोधमोहीमेनंतर दुपारी तीनच्या सुमारास आकाशचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.

आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा असलेल्या आकाशच्या निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. शेतकरी कुटुंबातील या तरुणाच्या अकाली जाण्याने बोरगाव दातार परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन पंचनामा केला आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## इराणवर युद्धाचे सावट

अमेरिकेने अलीकडे केलेल्या नौदल तैनातीमुळे आणि इराणमध्ये मोठ्या प्रमाणावर जनक्षोभ उसळल्यामुळे प्रत्यक्षात लष्करी संघर्षाचा धोका वाढला आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये युद्धाची शक्यता आहे का, हा संपूर्ण जगाला भेडसावणारा प्रश्न आहे. जागतिक युद्ध निश्चित नसले तरी इराणवरील लष्करी हल्ल्याचा धोका सध्या जास्त आहे. यूएसएस अब्राहम लिंकनच्या नेतृत्वाखालील अमेरिकेचा एक नौदल वाहक आघाडीचा गट सध्या इराणच्या जवळच्या क्षेत्रात दाखल झाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी याला एक खबरदारीचा आर्माडा (लष्करी ताफा) असे याचे वर्णन केले आहे. अमेरिकन लष्कराने आपला दृष्टिकोन कायम ठेवला, तर इराण उच्चस्तरीय युरेनियम संवर्धन पुन्हा सुरू करू शकतो, असे संकेत देऊन इराणने अणुबॉम्ब हे अस्त्रदेखील जवळ बाळगले आहे. यावर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी हे अशक्य असून इराण अणुबॉम्ब बनवू शकत नाही, असे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या पवित्र्यावर इराणी अधिकाऱ्यांनी इशारा दिला आहे, की ते मर्यादित किंवा सर्जिकल हल्लयालाही सर्वंकष युद्धाची घोषणा मानतील. त्यांनी आपल्या सैन्याला उच्च सतर्कतेवर ठेवले असून हल्ला झाल्यास प्रदेशातील अमेरिकन तळांना किंवा इस्त्रायलला लक्ष्य करण्याची धमकी दिली आहे. या निमित्ताने सध्याच्या परिस्थितीचे आणि तिला कारणीभूत असलेल्या घटकांचे विश्लेषण करणे क्रमप्राप्त ठरते. इराणने अमेरिकेच्या नौदल हालचालींना 'आंतरराष्ट्रीय कायद्याचे घोर उल्लंघन' म्हटले आहे आणि या कारवाईला जशास तसे उत्तर देण्याचा इशारा दिला आहे. या प्रदेशातील अमेरिकेची उपस्थिती गेल्या अनेक वर्षांमधील सर्वोच्च पातळीवर आहे. इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांनी देशातील अलीकडच्या आंदोलनांमध्ये हजारो लोकांचा मृत्यू झाल्याचे मान्य केले, परंतु या हिंसाचारासाठी अमेरिका आणि इस्त्रायल या परदेशी चिथावणीखोर राज्यांना जबाबदार धरले. ट्रम्प प्रशासन एका अल्टिमेटमसाठी दबाव आणत आहे, ज्यामध्ये इराणचा अणुकार्यक्रम आणि क्षेपणास्त्र साठ्याचा संपूर्ण नायनाट, हिजबुल्लाह, हमास संघटनांना दिला जाणारा पाठिंबा थांबवणे आणि देशांतर्गत विरोधकांना फाशी देण्याचे थांबवणे या अटींचा समावेश आहे.अमेरिकेचा भर इराणची तेल विकण्याची क्षमता रोखून विद्यमान राजवटीला दिवाळखोर बनवण्यावर आणि तिला वाटाघाटीच्या टेबलवर आणण्यावर आहे. सध्या जागतिक तेल बाजारपेठेत तेलाचा पुरवठा मुबलक आहे आणि अमेरिका स्वतः एक प्रमुख तेल उत्पादक देश बनला आहे. इराणच्या तेलाची गरज असण्याऐवजी अमेरिकेला होर्मुझच्या सामुद्रधुनीची अधिक चिंता आहे. त्यातून जगातील वीस टक्के तेलाचा व्यापार होतो. युद्धामुळे इराण ही सामुद्रधुनी रोखू शकतो, ज्यामुळे जागतिक ऊर्जा किमती गगनाला भिडतील. गेल्या काही काळात परिस्थिती वेगाने बदलली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील सध्याची परिस्थिती खरोखरच एका गंभीर टप्प्यावर आहे. अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यास जागतिक युद्ध सुरू होईल का, हा सध्याचा चर्चेचा विषय आहे. जागतिक युद्ध या शब्दाचा अर्थ 'संपूर्ण जागतिक संघर्ष' असा असला तरी तज्ज्ञ त्याकडे आर्थिक परिणामांसह एक उच्च-धोक्याचे प्रादेशिक युद्ध म्हणून पाहतात.इराणच्या उत्तरेकडील सीमेवर स्थित अझरबैजान या देशाचे इस्त्रायलबरोबर जवळचे लष्करी संबंध आहेत. त्यामुळे तेहरानसाठी एक महत्त्वपूर्ण धोका निर्माण होतो. इराण अमेरिकेच्या लाल समुद्रातील जहाज वाहतुकीला लक्ष्य करण्याची आणि सौदी किंवा इस्त्रायली लक्ष्यांवर लांब पल्ल्याचे हल्ले करण्याची शक्यता आहे. इराक आणि सीरियामधील अमेरिकन तळांवरही इराणकडून हल्ले होऊ शकतात. युक्रेनसोबतच्या संघर्षात खोलवर गुंतलेला असतानाही रशियाने पाश्चात्य निर्बंधांना बगल देण्यासाठी इराणसोबत आपले सामरिक संबंध मजबूत केले आहेत. युद्ध झाल्यास रशिया गुप्तचर माहिती, सायबर समर्थन किंवा प्रगत शस्त्रे पुरवू शकतो, तथापि थेट सैन्य सहभागाची शक्यता कमी आहे. इराणी तेलाचा एक प्रमुख खरेदीदार असल्यामुळे चीनला या प्रदेशातील स्थिरतेमध्ये रस आहे. संघर्ष थांबवण्यासाठी तो कदाचित राजनैतिक आणि आर्थिक दबाव वापरेल, परंतु ऊर्जा सुरक्षेला थेट धोका निर्माण होत नाही, तोपर्यंत तो लष्करी हस्तक्षेप करण्याची शक्यता नाही. नाटो सदस्य आणि इराणसोबत सीमा सामायिक करणारा तुर्की अमेरिकेला हल्ले टाळण्यासाठी राजी करण्याचे अंतिम प्रयत्न करेल. या महिन्यात विश्लेषकांनी नमूद केलेला सर्वात मोठा धोका म्हणजे होर्मुझच्या सामुद्रधुनीची संभाव्य नाकेबंदी. यामुळे तेलाच्या किमती प्रति बॅरल १२० डॉलरच्या वर जाऊ शकतात आणि जागतिक अर्थव्यवस्थेचे संरक्षण करण्यासाठी तटस्थ देशांनाही एका बाजूने उभे राहण्यास भाग पडेल. संभाव्य युद्ध टाळण्याचा तो एक मार्ग असू शकेल. सध्या तुर्की, कतार आणि इजिप्त हे तणाव कमी करण्यासाठी सक्रियपणे काम करत आहेत. या आठवड्याच्या उत्तरार्धात अंकारामध्ये एक संभाव्य उच्चस्तरीय बैठक आयोजित केली जात असल्याची माहिती आहे. दोन्ही देशातील तणाव युरोपियन युनियनपर्यंतही पोहोचला आहे. रशिया आणि चीन या दोन्ही देशांनी अमेरिकेविरुद्ध सामरिक प्रतिकाराची भूमिका घेतली असून इराणवर अमेरिकेचा संभाव्य हल्ला रोखण्यासाठी कठोर राजनैतिक इशाऱ्यांसोबतच लष्करी उपस्थिती वाढवून संतुलन साधले आहे. गेल्या आठवड्यात युरोपियन युनियनने इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) ला दहशतवादी संघटना म्हणून घोषित केल्यानंतर इराणच्या संसदेने प्रत्युत्तर म्हणून युरोपियन युनियन देशांच्या सैन्यांना 'दहशतवादी गट' मानण्याची घोषणा केली आहे. रशिया आणि चीन ही दोन्ही राष्ट्र इराण एकाकी नाही हे दर्शवण्यासाठी कठोर शक्तीचे प्रदर्शन करत आहेत. रशिया आणि चीनने उत्तर हिंदी महासागर आणि ओमानच्या आखातात मेरिटाइम सिक्युरिटी बेल्ट नौदल सरावाच्या आठव्या आवृत्तीची घोषणा केली. या सरावांमध्ये नियमित नौदल युनिट्स आणि आयआरजीसी यांचा समावेश आहे, जे या प्रदेशाकडे येणाऱ्या अमेरिकेच्या अर्माडाला थेट प्रत्युत्तर म्हणून काम करत आहे. चीनने जानेवारी २०२६ च्या अखेरीस जलद हवाई वाहतूक केली; ज्यात तांत्रिक आणि लष्करी मदत पुरवण्यासाठी मालवाहू विमाने इराणला पाठवण्यात आली, ज्याचा उद्देश इराणची हवाई संरक्षण आणि क्षेपणास्त्र प्रतिबंधक क्षमता पुन्हा उभारणे हा असण्याची शक्यता आहे.

# कोंडी सुटली; पण..




**भारताने अमेरिकेशी व्यापार करायला हवा काय? तर होय, करायला हवा; परंतु अमेरिकाच काय, कोणत्याही देशाशी व्यापार करताना आंतरराष्ट्रीय व्यापारातील तुलनात्मक फायद्याचे प्रतिबिंब त्यात दिसणे आवश्यक आहे. भारताच्या प्रगतीला त्यामुळे हातभार लागायला हवा, सध्याच्या करारातून हे घडणार का, हे काळच ठरवेल.**

डॉ. सतीश श्रीवास्तव

होणार होणार म्हणता भारत अमेरिका यांच्यातील व्यापार कराराचा आकृतिबंध (फ्रेमवर्क) एकदाचा झाला. दोन्ही देशांनी या कराराबाबत मसुदा प्रसिद्ध केलेला आहे. अमेरिकेने या व्यापारी कराराचे तथ्य पत्रक (फैक्ट शीट) प्रसिद्ध केले आहे. त्यामुळे भारत-अमेरिका ब्यापाराची कोंडी (डेड लॉक) सुटली असे म्हणता येईल, अद्याप अंतिम करार होणे बाकी आहे.

ट्रम्प यांची अध्यक्षपदाचा दुसरा कार्यकाळ सुरू झाल्यापासून त्यांनी आयात शुल्काचा आसूड कॅनडा, युरोपियन युनियन, जपान, चीन, भारत व इतर दक्षिण आशियाई देश या सगळ्यांवरच उगारला. सुरुवातीला आयात शुल्कात वाढ करायची आणि नंतर व्यापार करताना तो कमी करायचा, असा त्यांचा खाक्या आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या सर्व मूलभूत तत्त्वांना हे हरताळ फासणारे होते. किंबहुना जागतिक व्यापार संघटनेच्या आंतरराष्ट्रीय सौहार्द आणि सहकार्य तसेच परस्पर वाटाघाटीने वाटा आंतरराष्ट्रीय व्यापारातील प्रश्न आणि वाद सोडविण्याच्या भूमिकेला सुरुवातीपासूनच ट्रम्प यांनी केराची टोपली दाखविली आहे. व्यापार व जकातीसंबंधीचा सर्वसाधारण करार/गॅट (जनरल ॲग्रीमेंट ऑन ट्रेड अँड टेरिफ) १९४८ मध्ये स्थापन झाला. भारत हा देखील गॅटचा सदस्य देश होता.

जकात आकारताना देशांना भेदात्मक वागणूक देण्यात येऊ नये, आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडथळे दूर व्हावेत यासाठी जकातीचे दर कमी व्हावेत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ व्हावी या उद्देशाने गॅटची स्थापना झाली होती. याचेच अधिक व्यापक स्वरूप म्हणून १९९५ मध्ये जागतिक व्यापारी संघटनेची (वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन) स्थापना झाली.

तेव्हा अमेरिका ही जगात सुपर पॉवर होती आणि लोकतांत्रिक संस्थांवरील विश्वास वाढावा, अशी त्या काळात स्थिती होती. जागतिक राजकारणात आणि अर्थकारणात चीनथा प्रभाव जसजसा वाढू लागला तसतसे चीनच्या वाढत्या प्रभावाला आणि स्पर्धेला लगाम घालण्याचा प्रयत्न अमेरिकेकडून केला जाऊ लागला. आंतरराष्ट्रीय व्यापार आणि सहकार्य यासाठी म्हणजे नियमांवर आधारित यंत्रणा उभी करणे हे जागतिक व्यापार संघटनेचे महत्त्वाचे कार्य आहे.

या प्रयत्नांना खो घालण्याचा प्रयत्न ट्रम्पपूर्व आणि ट्रम्पोत्तर काळामध्ये अमेरिकेकडून सातत्याने केला गेला. ट्रम्प यांची अध्यक्षीय कारकीर्द सुरू झाल्यावर ब अमेरिकेच्या कॅनडा आणि ब्रिटन या मित्र देशांबरोबर भारतालाही अमेरिकेच्या वाढत्या जकातीचा सामना करावा लागला. गेल्या आठ-दहा महिन्यांपासून भारत आणि अमेरिका यांच्या व्यापाराबाबत द्विपक्षीय वाटाघाटी सुरू झालेल्या होत्या. त्याचे पर्यवसान गेल्या शुक्रवारी जाहीर केलेल्या व्यापार करारामध्ये झाले. अर्थात हा अंतिम करार नसून कराराचा केवळ मसुदा आहे.

### व्यापार कराराचा परिणाम

या व्यापार कराराचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काय परिणाम होईल तसेच सद्यस्थितीत या कराराचे महत्व काय याचे परीक्षण करणे आवश्यक आहे. भिभेदी वागणुकीसाली तक्रार करणे. त्यातून मार्ग काढणे आणि उभय देशांनी त्रयस्थ संस्थेने (उदा डब्ल्यूटीओ) दिलेला निर्णय मान्य करणे ही जी नियमावर आधारित यंत्रणा उल्यूटीओच्या माध्यमातून १४० देशांनी निर्माण केलेली होती, त्याचा ट्रम्पोतर काळात विध्वंस झाल्याने 'वन टू वन' म्हणजेच अमेरिकेशीच द्विपक्षीय वाटाघाटी करायाशिवाय कुठल्याच देशासमोर अन्य पर्याय नाता इथे ही बाब ठेवणे गरजेचे आहे की. आजही अमेरिका ही सुपर पॉवर असलों तरी भारतही जगातील मोठी आणि उदयोन्मुख बाजारपेठ आहे. देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) जीडीपीच्या दृष्टीने भारत ४.१८ लाख कोटी डॉलर असलेली जगातील चौथी अर्थव्यवस्था आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता टूल्स आणि बल्क ड्रग्स चा 'पॉवर हाऊस असलेला देश आहे. तसेच आपटी आणि बिझनेस प्रोसेस मैनेजमेंट (बीपीएम) चा भारताच्या नियति ५० टक्के वाटा आहे तसेच कृषी क्षेत्राचा देखील निर्मातीत १० ते १३ टक्के इतका आहे. भारताचा अमेरिकशी असलेला आंतरराष्ट्रीय व्यापार हा ४१.१८ अब्ज डॉलरने शिलकी स्वरूपाचा आहे. म्हणजे भारत हा अमेरिकेला आयातीपेक्षा अधिक निर्यात करतो.

भारत अमेरिका व्यापार करारासंबंधी जे तथ्य पत्रक जारी केले आहे, त्यानुसार भारताला कापड आणि तयार कपडे, प्लास्टिक व रखरी वस्तू, सेंद्रिय रसायने, गृह सजावट आणि हस्तकला वस्तू, चामड्याच्या वस्तू व पादत्राणे, विशिष्ट यंत्रसामुग्री इत्यादीच्या नियांतीवर १८ टक्के आयात शुल्क द्यावे लागेल. हे पूर्वीच्या पन्नास टक्के आयात शुल्कापेक्षा अर्थातच कमी आहे. याउलट भारत अमेरिकेतून येणा-या वस्तूंवरील आयात शुल्क काढुन टाकेल अथवा कमी करेल. यात औद्योगिक वस्तू, कृषी आणि खाद्य वस्तु पशुखाद्यासाठी वापरला जाणारा मक्याची भरड (मक्यापासून इथेनॉल तयार करताना जो शिल्लक राहतो तो अवशेष) आणि लाल ज्वारी, अक्रोड, बदाम, काजू, ताजी आणि प्रक्रियायुक्त फळे, सोयाबीन तेल, वाईन आणि स्पिरिट इत्यादी या बरोबरच भारतासाठी अमेरिकेकडून पुढील पाच वर्षात ऊर्जा, माहिती दळणवळण व तंत्रज्ञान, कोळसा, शेती माल व इतर श्रेणीमध्ये ५०० अब्ज डॉलरपेक्षा अधिक खरेदीचे लक्ष्य ठेवले जाईल.

भारत अमेरिका व्यापाराच्या या आकृतिबंधातून भारताच्या आर्थिक हितासंबंधी काही महत्त्वाचे मुद्दे उपस्थित होतात. एक म्हणजे हा करार भारतापेक्षा अमेरिकेता अधिक फायदेशीर आहे काय? दुसरा आणि महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या करारामुळे भारताच्या कृषी क्षेत्रातील हिताला नुकसान पोहोचेल काय? तिसरा प्रश्न म्हणजे येत्या पाच वर्षात भारताने अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलरच्या खरेदीचे लक्ष ठेवले आहे काय?

### परस्पर समसमानता जकात

आंतरराष्ट्रीय व्यापारात परस्पर समसमानता जकात (रेसिप्रोकेल कस्टम ड्यूटीज) याचा अर्थ दोन देश व्यापार करताना समान आयात शुल्काची आकारणी करतात. परंतु, ही समसमानता अमेरिका आणि भारत यांच्या व्यापार करारातील मसुद्यांमध्ये दिसून येत नाही, असा आक्षेप आहे.

अर्थात भारतातील निर्यातदारांना दक्षिण आशियातील इतर देशांपेक्षा कमी आयात शुल्क आकारले जाईल, असे दिसते. कारण चीन ३४ टक्के, दक्षिण कोरिया २५ टक्के, व्हिएतनाम २० टक्के, इंडोनेशिया, मलेशिया, बांगलादेश १९ टक्के तर भारतावर १८ टक्के इतके आयात शुल्क राहील. 'कृषी क्षेत्राचे संरक्षण करण्यावर या करारामध्ये भर देण्यात आलेला आहे' असे पत्रकार परिषदेत बोलताना भारताच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांनी म्हटले आहे. मांस, पोल्ट्री, भात, गहू, साखर, सर्व दुग्धजन्य उत्पादने, सर्व जनुकीय सुधारित (जीएम) उत्पादन, सोयाबीन व मका इत्यादी बाबत भारत जवळपास स्वयंपूर्ण आहे. सोयाबीन तेल, अक्रोड, बदाम यासारखी उत्पादने भारत अनेक वर्षांपासून आयात करीत आहे. भारतातील वाईनची बाजारपेठ ही वार्षिक १७टक्क्याने वाढत आहे. बहुदा यामुळे वाईनसाठी भारतातील बाजारपेठ स्पर्धात्मक आणि खुली करण्यात आलेली आहे असे दिसते. महाराष्ट्रातील नाशिक ही भारताची 'वाईन कॅपिटल'समजली जाते. देशातील वाईन उत्पादनातील नाशिकचा वाटा जवळपास ८० टक्के इतका आहे. कर्नाटकात काही प्रमाणात वाईन उत्पादन होते. वाईन संबंधीच्या या धोरणाच्या देशातील वाईन उद्योगावर काय परिणाम होईल हे बघावे लागेल. ताजी व प्रक्रियायुक्त फळे भारत काही प्रमाणात आयात करतो उदा. दरवर्षी ५.५ लाख टन सफरचंद आपण आयात करतो. चहा, कॉफी, मसाले, केळी, नारळ, आंबे, किवी आणि पपई भारत अमेरिकेत निर्यात करतो. त्याचावर अमेरिकेत शून्य आयातशुल्क आहे. तुलनात्मक लाभ हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मूलभूत तत्व आहे. त्यामुळे या कृषी उत्पादनाच्या निर्यातीमुळे भारतीय शेतकऱ्यांचा निश्चितच लाभ होईल. भारतामध्ये प्रामुख्याने सोयाबिन, सरकी इत्यादी तेलबियांच्या उत्पादन प्रक्रियेतील पेड किंवा अवशेष (ड्राईड डिस्टिलर ग्रेन्स) यांचा पशुखाद्यासाठी कच्चा माल म्हणून वापर केला जातो. अमेरिकेत मक्यापासून इथेनॉल तयार करतात. त्यातून पशुखाद्य तयार करण्यासाठी ही डीडीजीएस उपवस्तू (डिस्टिलर धान्य) तयार होते. या करारामुळे अमेरिकेतून डीडीजीएस आयात केले जाईल.

रशियाकडून भारताने खनिज तेलाची खरेदी करू नये, अशी ट्रम्प यांची इच्छा आहे. परंतु विदेश मंत्रालयाच्या प्रवक्त्यांनी संसदीय दलाला याविषयी माहिती देताना 'जो देश भारताला सर्वात कमी दरात खनिज तेल देईल त्या देशाकडून भारत तेलाची खरेदी करेल' असे सांगितल्याचे प्रसिद्ध झालेले आहे. तसेच भारताच्या ऊर्जा सुरक्षितेचे रक्षण केले जाईल, असे सरकारकडून सांगण्यात येत असल्याने भारताने अमेरिकेला अशी कोणतीही हमी दिलेली नाही, हे स्पष्ट होते.

भारत अमेरिका व्यापार करारानंतर झालेल्या बांगलादेश अमेरिका व्यापार करारामध्ये बांगलादेशातील तयार कपड्यांच्या आयातीवर अमेरिका शून्य आयात शुल्क आकारणार आहे, असे म्हटले आहे, मात्र भारतातून होणाऱ्या आयात कपड्यांवर १८ टक्के आयात कर आकारला जाईल, अशी भेदात्मक विभागणी केलेली आहे. भारतातील कपड्यांच्या निर्यातीवर यामुळे कड़वे आव्हान निर्माण झालेले आहे. अमेरिकेतून बांगला देशाला जे कापड निर्यात होईल त्यावर शून्य आयात कर लादला जाईल. त्यातून बांगलादेशात जे तयार कपडे (ॲपरेल) अमेरिकेला निर्यात होतील त्याच्यावर भारतापेक्षा कमी म्हणजे ३ टक्के एवढेच आयात शुल्क अमेरिका आकारेल. याचा अर्थ भारताच्या कापूस उत्पादकांवर आणि कापड उद्योगावर प्रतिकूल परिणाम होईल. भारताने २०२४-२५ मध्ये बांगलादेशाला १.४७ अब्ज डॉलर किमतीच्या सुती धाग्यांची निर्यात केली आहे. भारताची ही निर्यात घटण्याची शक्यता आहे.

### तथ्य पत्रकातील तथ

हा मसुदा प्रसिद्ध झाला आणि ज्याला अमेरिका तथ्य पत्रक 'फॅक्ट शीट' असे म्हणते, त्यात पुन्हा एकदा दुरुस्ती करण्यात आलेली आहे. मंगळवारी, १० फेब्रुवारीला अमेरिकेने तथ्य पत्रकात बदल केला आहे. ज्या कृषी वस्तूंच्या आयातीवर भारत आयात शुल्क कमी करेल त्यात डाळींचा (पल्सेस) समावेश होता. दुरुस्त केलेल्या मसुद्यात तो वगळण्यात आला आहे. परंतु भारताला २०३० पर्यंत ५०० अब्ज डॉलर वस्तू खरेदी करण्याचे 'मान्य केले आहे,' या ऐवजी 'इरादा आहे ('कमिटमेंट' ऐवजी 'इटेंट' असा बदल केला आहे. यामध्ये भारत ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान, कोळसा, कृषी व इतर उत्पादने इतर उत्पादने यांचा समावेश राहिल,असे म्हटले आहे. यात कोणती कृषी व इतर उत्पादने आहेत. याबाबतचा मात्र उल्लेख केलेला नाही.

भारताने अमेरिकेशी व्यापार करायला हवा काय? तर होय,करायला हवा, परंतु अमेरिकाच काय, कोणत्याही देशाशी व्यापार करताना आंतरराष्ट्रीय व्यापारातील तुलनात्मक फायद्याचे प्रतिबिब त्यात दिसणे आवश्यक आहे. भारताच्या प्रगतीला त्यामुळे हातभार लागायला हवा. 'भारताने अमेरिकेसोबत अत्यंत संतुलितपणे बाजारपेठा उघडण्यास सहमती दर्शविली आहे, असे वाणिज्य आणि उद्योग मंत्री यांनी म्हटलेले आहे. हे संतुलन भारताच्या आर्थिक हिताचे ठरावे. दक्षिण कोरियासारख्या अमेरिकेचा मित्रराष्ट्र असलेल्या आणि अमेरिकेशी मुक्त व्यापार असणारा देशही ट्रम्प यांच्या टैरिफ दहशतीचा बळी आहे. तेव्हा बेभरवशाचे आणि मनात येईल तेव्हा बदलणारे ट्रम्पकारण भारताने स्वीकारता कामा नये. कारण जगातील सर्वाधिक तरुणांची लोकसंख्या असलेला आणि विकसित होण्याची प्रचंड क्षमता असलेला भारत हा देश आहे. तथ्य पत्रकात भारत अमेरिका व्यापार करार हे 'पुढील पाऊल' (पाथ फॉरवर्ड) असे म्हटले आहे. हे खरोखरच 'पुढचे पाऊल' आहे का, हे येणारा पुढील काळच ठरवेल. (साभार मटा संवाद)

# तारिक रेहमान यांच्या समोरील आव्हाने!

बांगलादेशमध्ये नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत तारिक रेहमान यांच्या नेतृत्वाखालील बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला मोठा विजय मिळाला आहे.३०० सदस्य असलेल्या बांगलादेश संसदेत, बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला आणि तिच्या मित्रपक्षांना २१२ जागांवर विजय मिळाला आहे.तर जमाते इस्लामी पक्षाच्या नेतृत्वाखालील अकरा पक्षांच्या आघाडीला ७७ जागांवर विजय मिळाला आहे.जुलै २०२४ मध्ये आरक्षणा विरोधात बांगलादेश मधील विद्यार्थ्यांनी जे आंदोलन पुकारले होते, त्यांनी नंतर नॅशनल सिटिझन्स पार्टी या पक्षाची स्थापना केली होती.तो पक्ष जमाते इस्लामी पक्षाच्या नेतृत्वाखालील आघाडीत सहभागी होता.त्या पक्षाला केवळ ६ जागांवर विजय मिळाला आहे.सध्या भारतात वास्तव्याला असलेल्या बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग या पक्षावर निवडणुकीत भाग घेण्यासाठी बंदी घालण्यात आली होती, त्यामुळे बांगलादेश मधील सर्वात मोठा राजकीय पक्ष असलेला अवामी लीग हा पक्ष निवडणुकीत सहभागी होऊ शकला नव्हता.

१९९१ पासून २०२४ पर्यंत बांगलादेश मधील सार्वत्रिक निवडणुकांत बेगम खलेदा झिया आणि बेगम शेख हसीना वाजेद या दोन बेगमांमध्येच आमनेसामने लढत होत होती.मात्र या खेपेच्या निवडणुकीत पहिल्यांदाच या दोन्ही बेगमा निवडणुकीच्या रिंगणात दिसल्या नाहीत.कारण बेगम खलेदा झिया यांचे मध्यंतरी निधन झाले आणि ऑगस्ट २०२४ पासून बेगम शेख हसीना वाजेद या भारतात वास्तव्य करत आहेत. सार्वत्रिक निवडणुकीत प्रचंड बहुमताने विजयी झालेल्या बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचे नेते तारिक रेहमान हे बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खलेदा झिया यांचे सुपुत्र आहेत.बांगलादेशचे माजी अध्यक्ष झिया उर रेहमान हे तारिक रेहमान यांचे वडील होते.झिया उर रेहमान यांनी १९७८ साली बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीची स्थापना केली होती.तारिक रेहमान हे गेली १७ वर्षे लंडनमध्ये वास्तव्यास होते.विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर,माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांनी बांगलादेशातून पलायन केल्यानंतर, तेथे सत्तेवर आलेल्या अंतरिम सरकारने, तारिक रेहमान यांच्या विरोधातील सर्व खटले मागे घेऊन,त्यांचा बांगलादेशमध्ये परतण्याचा मार्ग मोकळा केला होता.

डिसेंबर २०२५ मध्ये जेंव्हा तारिक रेहमान यांनी बांगलादेशच्या भूमिवर पाय ठेवला तेव्हा त्यांचे जे अभूतपूर्व स्वागत झाले ते पाहता बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीचा बांगलादेश मधील जनमानसावर असलेला प्रभाव कमी झालेला नाही,ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली.त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित असलेल्या त्यांच्या समर्थकांची संख्या दहा लाखांच्या आसपास होती.त्यानंतर त्यांची आई आणि बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खलेदा झिया यांचे जेंव्हा निधन झाले तेंव्हा त्यांच्या अंत्ययात्रेत २० लाखांच्या आसपास पाठिराखे सहभागी झाले होते. बांगलादेशमधील जनतेचा, बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीला मोठ्या प्रमाणात पाठिंबा असल्याचे त्यातून ध्वनित झाले होते.या निवडणुकीत माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखालील अवामी लीग हा पक्ष सहभागी होऊ शकला नाही,त्याची उणीव जाणवलीच मात्र अवामी लीगचे बालेकिल्ले राहिलेल्या भागांमध्ये या खेपेस



४० टक्क्यांच्या वर मतदान झाल्याने,अवामी लीगच्या समर्थकांनी मोठ्या प्रमाणात मतदानावर बहिष्कार घातलेला दिसत नाही.बांगलादेश स्वातंत्र्य संग्रामाला विरोध करणाऱ्या जमाते इस्लामी या पक्षाने निवडणूकीत ७७ जागा जिंकून चांगली कामगिरी केली आहे.आजवरचा निवडणुकांचा इतिहास पाहता,जमाते इस्लामी या पक्षाला १८ च्या वर कधीही जागा मिळाल्या नव्हत्या.माजी पंतप्रधान शेख हसीना वाजेद यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तर जमाते इस्लामी पक्षावर बंदी घातली होती.शेख हसीना यांनी बांगलादेशातून पलायन केल्यानंतर तेथे सत्तेवर आलेल्या अंतरिम सरकारने जमाते इस्लामी पक्षावरील बंदी उठवली होती.

तारिक रेहमान यांचा भूतकाळ पाहिला तर तो फारसा भुषणावह मानता येणार नाही.त्यांच्यावर बरेच भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते.२००६-०७ मध्ये बांगलादेशात लष्कर समर्थित अंतरिम सरकार सत्तेवर असताना, तारिक रेहमान यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली तुरुंगात टाकण्यात आले होते.नंतर ते तुरुंगात आजारी पडल्याने,त्यांची जामिनावर सुटका करण्यात आली होती.२००८ साली त्यांनी मेडिकल ट्रिटमेंट घेण्यासाठी इंग्लंडला प्रयाण केले होते.त्यानंतर १७ वर्षे ते इंग्लंडमध्येच वास्तव्य करत होते.इंग्लंडमध्ये बरेच दिवस वास्तव्य केल्याने, त्यांनी तेथील वेस्टमिन्स्टर लोकशाही संसदीय प्रणाली जवळून बघितली असेल.त्याचा फायदा त्यांना पंतप्रधान म्हणून प्रशासन चालवताना नक्कीच होईल. तारिक रेहमान यांच्या समोर अनेक आव्हाने आहेत. बांगलादेशची अर्थव्यवस्था सध्या फार मोठ्या संकटात आहे.बांगलादेशला निर्यातीतून सर्वात जास्त उत्पन्न मिळवून देणाऱ्या गारमेंट व्यवसायाची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे.कायदा आणि सुव्यवस्था परिस्थिती मोठ्या प्रमाणात बिघडली आहे.महागाई आणि बेरोजगारीमुळे, सामान्य माणूस त्रस्त आहे.शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा यांचा बोजवारा उडाला आहे.अशा परिस्थितीत तारिक रेहमान हे या आव्हानांचा सामना कसा करतात ते पहावे लागेल.

अभय गोखले

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## वेचक

### कोलकात्याहून शिलाँगला जाणाऱ्या विमानात बॉम्ब असल्याची धमकी

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालमधील कोलकाता येथून शिलाँगकडे जाणाऱ्या इंडिगोच्या ६ ई ३०७४ या विमानात बॉम्ब असल्याची धमकी मिळाल्याने शनिवारी सकाळी खळबळ उडाली. सकाळी ९.१५ वाजता उड्डाणासाठी सज्ज असलेल्या या विमानाच्या टॉयलेटमध्ये क्रू मेंबर्सना हाताने लिहिलेली एक संशयास्पद चिठ्ठी आढळली. त्या चिठ्ठीवर विमानात बॉम्ब आहे असा उल्लेख करण्यात आला होता. ही माहिती मिळताच नेताजी सुभाष चंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा तत्काळ सतर्क झाली. विमानाला तातडीने आयसोलेशन बेमध्ये हलवण्यात आले. सर्व प्रवाशांना सुरक्षितरीत्या खाली उतरवून विमानाची सखोल तपासणी सुरू करण्यात आली. बॉम्ब शोध पथक आणि सुरक्षा अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. एअरपोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडियाने दिलेल्या माहितीनुसार, मानक कार्यपद्धतीनुसार सर्व आवश्यक खबरदारी घेण्यात आली असून आतापर्यंत कोणतीही संशयास्पद वस्तू आढळलेली नाही. ही धमकी अफवा असण्याची शक्यता वर्तवण्यात येत असून, प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### पाकिस्तानच्या विद्यापीठात विद्यार्थ्यांनी गायले 'जन-गण-मन'

**नवी दिल्ली :** खैबर पख्तूनख्वा प्रांतातील बाचा खान विद्यापीठात एका कार्यक्रमात पाकिस्तानी विद्यार्थ्यांनी भारताचे राष्ट्रगीत 'जन-गण-मन' गायले. चारसद्दा येथे विद्यापीठाच्या दोन दिवसांच्या युवा महोत्सवात किंवा कॅम्पस एक्स्पोमध्ये हा प्रसंग घडला, जिथे फार्मसी विभागातील विद्यार्थी जिब्रान रियाझ यांनी हे गीत सादर केले आणि काही विद्यार्थ्यांनी घोषणाबाजीही केली. घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, अनेकांनी त्यावर प्रतिक्रिया सुद्धा दिली. काहींनी विद्यार्थ्यांवर आणि विद्यापीठ प्रशासनावर टीका करत हे 'राष्ट्रविरोधी' असल्याचे म्हटले आणि कारवाईची मागणी केली. काहींनी या कृतीला मनोरंजनाच्या नावाखालील चूक म्हणून पाहिले, तर काहींनी सांस्कृतिक देवाणघेवाण म्हणून त्याचे स्वागत केले. या घटनेमुळे भारत आणि पाकिस्तानमधील आधीच तणावपूर्ण राजकीय आणि सामाजिक वातावरणात चर्चेला ताजगी मिळाली आहे. बाचा खान विद्यापीठाने अद्याप या घटनेवर अधिकृत निवेदन दिलेले नाही. व्हिडीओमुळे दोन्ही देशांमध्ये सोशल मीडिया वापरकर्त्यांमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली असून, काहींनी तरुणांमध्ये सकारात्मक बदलाचे उदाहरण म्हणून याला पाहिले आहे, तर काहींनी हे अनुचित असल्याचे सांगितले आहे.


### दुबईत रोबोटिक थ्रीडी प्रिंटिंगद्वारे व्हिलाचे बांधकाम

**अबू धाबी :** आपल्या तांत्रिक करामतींमुळे दुबई कायमच जगभरात चर्चेत असते. दुबईत आता रोबोटिक थ्रीडी प्रिंटिंग तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगातला पहिला लक्झरी व्हिला तयार केला जात आहे. दुबई वापरत असलेल्या या तंत्रज्ञानामुळे बांधकामातील माणसांचा वापर जवळपास नगण्य झाला आहे. माणसांच्या जागी रोबोट्सचा वापर केला जात आहे. त्यामुळे ज्या कामाला सहा महिने लागू शकतात, ते आता फक्त दोन आठवड्यांत आणि तेही बिनचूक पद्धतीने होणार आहे. 'मिडिल ईस्ट कंपोजिट्स' ही कंपनी या प्रकल्पाचे नेतृत्व करत आहे. हे तंत्रज्ञान दुबईच्या 'थ्रीडी प्रिंटिंग स्ट्रॅटेजी २०३०'चा भाग आहे. या धोरणाचे उद्दिष्ट बांधकामासाठी लागणारा वेळ ८० टक्क्यांपर्यंत कमी करणे आहे. या प्रकल्पात 'काउच' नावाच्या थ्री ॲक्सिस रोबोटिक आर्मचा वापर केला जात आहे. हा रोबोट संगणकावरून मिळालेल्या डेटाच्या आधारे थेट काँक्रीटचे थर रचून भिंती तयार करतो. हे मशीन ३६० अंशांमध्ये फिरून काम करू शकते. बांधकाम क्षेत्रात २०३० पर्यंत दुबईत तयार होणाऱ्या किमान २५ टक्के इमारती थ्रीडी प्रिंटिंगमधून उभारण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

# लिथियम - तांब्यासाठी भारताचा चिलीसोबत करार

**करारामुळे इलेक्ट्रिक वाहन आणि ऊर्जा क्षेत्राला चालना**

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**




जागतिक व्यापारी नकाशावर सध्या भारताची चर्चा जोरात सुरू आहे. अमेरिकेसोबत केलेला ऐतिहासिक अंतरिम व्यापार करार आणि युरोपीयन युनियनसोबतचा 'मदर ऑफ ऑल डिल्स' मानला जाणारा करार यानंतर आता भारताने आणखी एका महत्त्वाच्या देशाशी करार केला आहे. हा देश म्हणजे लॅटिन अमेरिकेतील चिली. या करारामुळे भारताला दुर्मीळ खनिजांच्या पुरवठ्यात मोठा फायदा होणार असून चीनवरील अवलंबित्व कमी होण्याची अपेक्षा आहे.

चिली हा देश लिथियम आणि कॉपरसारख्या दुर्मीळ खनिजांमध्ये संपन्न आहे. लिथियमसाठी सध्या जगभरात प्रचंड मागणी आहे, कारण मोबाईल फोन, लॅपटॉप, इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरींमध्ये हे खनिज अत्यावश्यक आहे. ऊर्जानिर्मिती क्षेत्रालाही लिथियमची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे, कॉपर उद्योग क्षेत्रात महत्त्वपूर्ण असून जगभरातील सुमारे २३ टक्के कॉपर एकट्या चिलीमधून प्राप्त होतो. भारत-चिली करारामुळे या दुर्मीळ खनिजांचे पुरवठा सुनिश्चित होईल आणि भविष्यातील उद्योग विकासाला चालना मिळेल. चीनच्या एकाधिकारामुळे लिथियम, कोबाल्ट, कॉपर, रिनियम, मॉलिब्डिनसारख्या खनिजांच्या जागतिक पुरवठ्यावर चीनचा प्रभाव मोठा आहे. भारतासह अनेक देशांच्या पुरवठा साखळीत चीनने धोका निर्माण केला आहे; परंतु चिलीसोबत झालेला हा करार भारताच्या दुर्मीळ खनिजांवरील चीनच्या नियंत्रणाला कमी करण्यास मदत करणार आहे.

विशेषतः भविष्यात इलेक्ट्रिक वाहन, ऊर्जा उत्पादन आणि औद्योगिक विकास या क्षेत्रात भारताच्या गरजांसाठी हा करार अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. जागतिक बाजारपेठेत भारताची स्वावलंबनता वाढण्यास हा टप्पा निर्णायक ठरेल. उद्योग, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला या करारामुळे मोठी प्रगती होण्याची शक्यता आहे. चिली करारानंतर भारताच्या जागतिक व्यापार नकाशावरची स्थिती अधिक मजबूत होईल, तर चीनवर अवलंबित्व कमी होत, दुर्मीळ खनिजांसाठी भारताची धोरणात्मक स्वायत्तता वाढेल. ही परिस्थिती केवळ आर्थिकच नव्हे तर राजनैतिक दृष्ट्यादेखील महत्त्वाची ठरणार आहे.

# ब्रह्मपुत्रा नदीखाली पहिल्या रस्ता-कम-रेल्वे बोगद्याला मंजुरी

**नदीच्या पोटातून ट्रेन गाड्या धावणार; १८,६६२ कोटींचा मेगा प्रकल्प**



◆ **दिसपूर (वृत्तसंस्था) :**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारांवरील मंत्रिमंडळ समितीने गोहपूर ते नुमालीगड या राष्ट्रीय महामार्ग-१५ विभागात ४-लेन, प्रवेश-नियंत्रित ग्रीनफील्ड कनेक्टिव्हिटी बांधण्यास मान्यता दिली आहे. यामध्ये ब्रह्मपुत्र नदीखाली १५.७९ किमीचा रोड-कम-रेल्वे बोगदा समाविष्ट आहे. तो आसाममध्ये अभियांत्रिकी खरेदी बांधकाम आधारावर बांधला जाईल ज्याचा एकूण खर्च १८,६६२ कोटी रुपये आहे. सध्या, राष्ट्रीय महामार्ग-७१५ वरील नुमालीगड आणि राष्ट्रीय महामार्ग-१५ वरील गोहपूर दरम्यानचे अंतर २४० किमी आहे. नुमालीगड, काझीरंगा राष्ट्रीय उद्यान आणि विश्वनाथ शहरातून जाण्यासाठी ६ तास लागतात.

या आव्हानांना तोंड देण्यासाठी, हा प्रकल्प राष्ट्रीय महामार्ग-१५ वरील गोहपूर ते नुमालीगडपर्यंत ४-लेन, प्रवेश-नियंत्रित ग्रीनफील्ड कनेक्टिव्हिटी म्हणून विकसित करण्याचा प्रस्ताव आहे, ज्यामध्ये ब्रह्मपुत्र नदीखालील ट्विन-ट्यूब रोड-कम-रेल्वे बोगदा समाविष्ट आहे. हा भारतातील पहिला आणि जगातील दुसरा पाण्याखालील रोड-कम-रेल्वे बोगदा असेल. या प्रकल्पाचा आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड आणि इतर ईशान्येकडील राज्यांना लक्षणीय फायदा होईल. यामुळे मालवाहतूक कार्यक्षमता वाढेल, लॉजिस्टिक्स खर्च कमी होईल आणि या प्रदेशात सामाजिक-आर्थिक विकासाला चालना मिळेल.

हा प्रकल्प दोन प्रमुख राष्ट्रीय महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग-१५ आणि राष्ट्रीय महामार्ग-७१५, तसेच दोन रेल्वे मार्गांना जोडेल. हा प्रकल्प राष्ट्रीय महामार्गाच्या रंगिया विभागाअंतर्गत गोहपूर बाजूला रंगिया-मुकोंगसेलेक रेल्वे विभाग आणि राष्ट्रीय महामार्गाच्या तिनसुकिया विभागाअंतर्गत नुमालीगड बाजूला फुरकाटिंग-मारियानी लूप लाइन विभागाला जोडेल. पाण्याखालील रोड-कम-रेल्वे बोगदा हा प्रकल्प संपूर्ण आसाममधील प्रमुख आर्थिक, सामाजिक आणि लॉजिस्टिक्स नोड्सना उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी प्रदान करेल. शिवाय, हा प्रकल्प ११ आर्थिक नोड्स, ३ सामाजिक नोड्स, २ पर्यटन नोड्स आणि ८ लॉजिस्टिक्स नोड्सना जोडून बहु-मॉडेल एकात्मता वाढवेल, ज्यामुळे ४ प्रमुख रेल्वे स्थानके, २ विमानतळ आणि २ अंतर्देशीय जलमार्गांशी चांगली कनेक्टिव्हिटी मिळेल, ज्यामुळे संपूर्ण प्रदेशात वस्तू आणि प्रवाशांची जलद वाहतूक शक्य होईल.

### ब्रह्मपुत्रा नदीवरील 'कुमार भास्कर वर्मा सेतू'चे उद्घाटन

**दिसपूर :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आसाममध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ब्रह्मपुत्रा नदीवरील कुमार भास्कर वर्मा सेतूचे उद्घाटन केले. या पुलाचे अनेक प्रकारे वैशिष्ट्य आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे ३,०३० कोटी रुपये खर्चून बांधलेला हा ६ पदरी पूल गुवाहाटी आणि उत्तर गुवाहाटी यांना जोडतो आणि ईशान्य भारतातील पहिला विस्तारित पूल आहे. त्याच्या पूर्णत्वामुळे गुवाहाटी आणि उत्तर गुवाहाटीमधील प्रवासाची वेळ फक्त ७ मिनिटांपर्यंत कमी होईल, ज्यामुळे लोकांना मोठा दिलासा मिळेल.

आसाम हा भूकंपप्रवण प्रदेश असल्याने, विशेष तंत्रज्ञानाचा वापर करून हा पूल बांधण्यात आला. बेस आयसोलेशन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला, ज्यामुळे भूकंपाचे धक्के कमी होण्यास मदत होते. शिवाय, पुलाची मजबुती आणि टिकाऊपणा सुनिश्चित करण्यासाठी केबल्स बसवण्यात आल्या आहेत. पुलावर ब्रिज हेल्थ मॉनिटरिंग सिस्टम देखील बसवण्यात आली आहे.

# उत्तर प्रदेश होणार एक्स्प्रेसवे राज्य

**गंगा आणि लखनऊ-कानपूर मार्ग लवकरच सुरू**

◆ **लखनऊ (वृत्तसंस्था) :**

उत्तर प्रदेश जलद गतीने देशातील एक्स्प्रेसवे राज्य म्हणून ओळख मिळवण्याच्या दिशेने पुढे जात आहे. राज्य सरकारने एक विशाल प्रकल्प राबवला आहे, ज्याअंतर्गत २२ नवीन एक्स्प्रेसवे तयार करण्यात येत आहेत. यामध्ये ग्रीनफील्ड आणि लिंक एक्सप्रेसवे दोन्ही प्रकार समाविष्ट आहेत. या प्रकल्पांमुळे केवळ राज्यातील प्रवास सोपा आणि वेगवान होणार नाही, तर दिल्लीपासून पूर्वांचलपर्यंतच्या अंतराचा प्रवासही खूप कमी वेळात पार करता येईल.

गंगा एक्स्प्रेसवे हा प्रकल्प राज्यातील सर्वात महत्वाकांक्षी योजनांपैकी एक मानला जातो. मेरठपासून प्रयागराजपर्यंतच्या या मार्गाने मेरठ, हापुड, बुलंदशहर, अमरोहा, संभल, बदायूं, शाहजहांपूर, हरदोई, उन्नाव, रायबरेली, प्रतापगड आणि प्रयागराज यासारख्या जिल्ह्यांना जोडले जाईल. मुख्य कॅरिजवेचा सुमारे ९६% काम पूर्ण झाले असून फास्टॅग टोल सिस्टीमचे यशस्वी परीक्षणदेखील झाले आहे. अंदाज आहे की मार्चमध्ये हा मार्ग पूर्णपणे सार्वजनिक वापरासाठी सुरू होईल. या मार्गामुळे पश्चिमी उत्तर प्रदेशापासून पूर्वांचलपर्यंतचा प्रवास अत्यंत सोपा होईल.

लखनऊ-कानपूर एक्स्प्रेसवे (एनइ-६) सुमारे ६३ किलोमीटर लांब असून हा ६-लेनचा एक्सेस-कंट्रोल मार्ग आहे, जो भविष्यात ८ लेनपर्यंत वाढवला जाऊ शकतो. या मार्गावर १८-१९ किलोमीटर लांब एलिवेटेड सेक्शन तयार केला गेला असून त्यामुळे हा प्रदेशातील सर्वात मोठा एलिवेटेड एक्स्प्रेसवे ठरणार आहे. सध्या लखनऊपासून कानपूरचा प्रवास २.५ ते ३ तासांमध्ये पूर्ण होतो, पण या एक्सप्रेसवेच्या सुरू होण्यानंतर हा प्रवास फक्त ३५ ते ४५ मिनिटांमध्ये पार करता येईल. या प्रकल्पाची एकूण किंमत अंदाजे ४,७०० कोटी रुपये आहे आणि मार्च २०२६ च्या अखेरीस किंवा एप्रिलमध्ये हा मार्ग सुरू होण्याची शक्यता आहे.

याशिवाय लखनऊ-कानपूर एक्स्प्रेसवे प्रस्तावित गोरखपूर-शामली एक्स्प्रेसवे सुमारे ७५० किलोमीटर लांब असेल आणि तो उत्तर प्रदेशातील सर्वात मोठा एक्स्प्रेसवे ठरेल. हा मार्ग २२ जिल्ह्यांमधून जाईल आणि पश्चिमी यूपीला थेट पूर्वांचलाशी जोडेल. यासाठीची डीपीआर पूर्ण झाली असून जमीन अधिग्रहणाचे काम जलद गतीने सुरू आहे. निर्माणकार्य २०२६-२७ मध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे.


या प्रकल्पांमुळे केवळ उत्तर प्रदेशच नव्हे, तर दिल्ली, हरियाणा, राजस्थान आणि मध्य प्रदेशसारख्या शेजारील राज्यांनाही मोठा फायदा होईल. औद्योगिक गुंतवणूक, पर्यटन आणि व्यवसायाला नवी गती मिळेल. योगी आदित्यनाथ सरकारने या उपक्रमासाठी बजेटमध्ये १५ हजार कोटी रुपये रस्ते बांधकाम आणि देखभालीसाठी राखीव ठेवले आहेत. या एक्स्प्रेसवे नेटवर्कच्या पूर्ण झाल्यानंतर उत्तर प्रदेशातील प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि सोयीस्कर होईल, तर राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला नवा मार्ग मिळेल.


### 'व्हॅलेंटाइन डे'लाच प्रेमीयुगुल कारमध्ये मृतावस्थेत

**लखनऊ :** नोएडा येथील सेक्टर ३९ परिसरात व्हॅलेंटाइन डेच्या दिवशी कारमध्ये तरुण-तरुणीचा मृतदेह आढळला. मृतांची ओळख सुमित (त्रिलोकपुरी, दिल्ली) आणि रेखा (सेक्टर ५८, नोएडा) पटली असून दोघे शुक्रवारीपासून बेपत्ता होते. रस्त्याच्या कडेला संशयास्पद स्थितीत उभी असलेली कार पाहून स्थानिकांनी पोलिसांना कळवले. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांना तरुणाच्या हातात पिस्तुल आढळले. प्राथमिक तपासात दोघांचाही मृत्यू एकमेकांना गोळी घालून झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## कैंची धामचा कायापालट

# 'ॐ' आकाराच्या काचेच्या पुलाची उभारणी





◆ **डेहराडून (वृत्तसंस्था):**

नैनीताल जिल्ह्यामध्ये असलेल्या कैंची धाम येथे गेल्या काही महिन्यांपासून व्यापक विकासकामांना वेग आला आहे. धार्मिक पर्यटनाला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने ध्यानस्थळ, जनसुविधा केंद्र तसेच परिसरात आधुनिक मार्गांची उभारणी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. सुमारे १,७५९ लाख रुपयांच्या खर्चातून राबविण्यात येणाऱ्या या योजनेमुळे धामचे संपूर्ण रूप पालटणार असून भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. धामावर वाढत्या वाहतूक कोंडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बहुमजली पार्किंग प्रकल्पही वेगाने उभा राहत आहे. सुमारे ४०८१ लाख रुपयांच्या सुधारित खर्चातून चार मजली पार्किंग इमारत बांधली जात आहे. पाइलिंग व कॉलम उभारणीचे काम जवळपास पूर्ण झाले असून सध्या तळमजल्याच्या स्लॅबचे काम सुरू आहे. प्रकल्पाची निम्म्याहून अधिक प्रगती झाली आहे.

भाविकांसाठी 'ॐ' आकाराचा काच पूल हे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. ३६ मीटर लांब व २ मीटर रुंद असलेल्या या पुलावरून घाटी व नदीचे विहंगम दृश्य पाहता येणार आहे. जून २०२६ पर्यंत हा पूल पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यामुळे धामाची शोभा आणि पर्यटन आकर्षण अधिक वाढणार आहे.

# जयपूर-कोटा महामार्गावर अपघातात ५ जणांचा मृत्यू

◆ **जयपूर (वृत्तसंस्था) :**

राजस्थानमधील जयपूर-कोटा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर शनिवारी पहाटे भीषण अपघात झाला. जयपूरजवळील चाक्सू परिसरात टिगरिया मोडजवळ सकाळी सुमारे साडेपाच वाजण्याच्या सुमारास भरधाव कार पुढे चाललेल्या ट्रेलरवर आदळली. धडक इतकी जबरदस्त होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि त्यामध्ये प्रवास करणाऱ्या पाच जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका महिलेचा समावेश असून सर्वजण मध्य प्रदेशातील जबलपूर येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. प्राथमिक माहितीनुसार कार मध्य प्रदेशातून जयपूरकडे जात होती. चालकाला झोपेची डुलकी लागल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार पुढील ट्रेलरला जोरात धडकली. अपघातानंतर कारमधील प्रवासी आतमध्येच अडकून पडले होते.

घटनास्थळीच चार जणांचा मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या एका युवकाला रुग्णालयात नेत असताना प्राण सोडले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृतांची ओळख अखिलेश श्रीवास्तव यांची पत्नी रेशमा श्रीवास्तव, राजेश राय यांचा मुलगा पियूष राय, बबलू रजक यांचा मुलगा रजक राहुल आणि चालक अनुराग अशी झाली आहे. पाचव्या मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. स्थानिक पोलीस आणि अपघात प्रतिसाद पथक तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. क्रेनच्या सहाय्याने अपघातग्रस्त वाहने बाजूला करण्यात आली आणि वाहतूक सुरळीत करण्यात आली. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# छत्तीसगडमध्ये ट्रक-कारच्या अपघातात ४ जवानांचा मृत्यू

◆ **रायपूर (वृत्तसंस्था) :**

छत्तीसगडमधील धमतरी जिल्ह्यातील अर्जुनी पोलीस स्टेशन परिसरात शनिवारी पहाटे खापरी-धमतरी बायपासजवळ ट्रक आणि कारची समोरासमोर धडक होऊन बस्तरहून परतणाऱ्या केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) चार जवानांचा मृत्यू झाला. कार पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आणि जवान आतमध्ये अडकले होते. पोलिसांच्या माहितीनुसार, जगदलपूर बटालियनची डिझायर कार खापरी बायपासजवळ समोरून येणाऱ्या ट्रकला धडकली. या अपघातात दोन सैनिकांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या दोघांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर मृत्यू झाला. आणखी एक जण गंभीर जखमी आहे आणि त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच, वरदान परमार्थ रुग्णवाहिका सेवा संस्थेचे शिवा प्रधान, दुमन साहू आणि हेमंत प्रधान तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी नुकसान झालेल्या वाहनात अडकलेल्या सैनिकांना वाचवले आणि त्यांना जिल्हा रुग्णालयात नेले. मृतांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. मृत सैनिकांची नावे मुकेश कुमार, सौरभ तोमर, राजकुमार गोंड आणि चालक हिरा लाल नागर अशी मृत सैनिकांची नावे आहेत, तर अभियान राय नावाचा एक सैनिक जखमी झाला आहे आणि त्याच्यावर उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, हे जवान जगदलपूरहून रायपूरला प्रवास करत होते. ते घरी जात असताना हा दुर्दैवी अपघात झाला.

# अमेरिकेच्या युद्धनौकेचे इराणकडे कूच

**मध्य पूर्वेत अमेरिकेची शक्तिप्रदर्शनाची चाल | इराण-अमेरिका तणावात वाढ**

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**



अमेरिकेने जगातील सर्वात मोठी आणि अत्याधुनिक विमानवाहू युद्धनौका यूएसएस गेराल्ड आर. फोर्ड मध्य पूर्वेकडे पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. हे जहाज तेथे आधीच तैनात असलेल्या यूएसएस अब्राहम लिंकनला साथ देणार असून, पर्शियन आखात परिसरातील अमेरिकेची लष्करी ताकद यामुळे लक्षणीयरीत्या वाढणार आहे.

माजी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत अणु करारासंदर्भात नव्या चर्चेची आशा व्यक्त केल्यानंतर काही दिवसांतच ही हालचाल करण्यात आली आहे. मात्र, तेहरानच्या एका वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्याने ओमान व कतार येथे भेट देऊन अमेरिकन मध्यस्थांशी संदेशांची देवाणघेवाण केली असली तरी चर्चेत ठोस प्रगती झालेली नाही.

दरम्यान, काही अरब राष्ट्रांनी इशारा दिला आहे की अमेरिकेची कोणतीही थेट लष्करी कारवाई व्यापक प्रादेशिक संघर्षाला कारणीभूत ठरू शकते. विशेषतः गाझामधील इस्रायल-हमास युद्धामुळे मध्य पूर्व आधीच अस्थिर स्थितीत आहे. 'गेराल्ड आर. फोर्ड' ही विमानवाहू नौका यापूर्वी कॅरिबियन परिसरात तैनात होती. व्हेनेझुएलावर दबाव आणण्यासाठी ट्रम्प प्रशासनाने तेथे कठोर भूमिका घेतली होती आणि त्या पार्श्वभूमीवर या जहाजाची तैनाती करण्यात आली होती. जून २०२५ पासून समुद्रात कार्यरत असलेल्या या नौकेवर सुमारे ४,५०० हून अधिक अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

ट्रम्प यांनी अलीकडेच इशारा दिला की, अणु करार न झाल्यास इराणसाठी परिस्थिती अत्यंत वेदनादायक ठरू शकते. त्यांनी आणखी एक विमानवाहू युद्धनौका पाठवण्याची शक्यता देखील व्यक्त केली आहे. दरम्यान, इराणमध्ये अलीकडील आंदोलनांचे दडपशाहीत रूपांतर झाल्यानंतर अंतर्गत असंतोष वाढला असून, देशात ४० दिवसांचा शोक पाळला जात आहे. या सर्व घडामोडींमुळे मध्य पूर्वेतील तणाव अधिक वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

# इन्स्टाग्रामवरून जुळले नाते; सेप्टिक टँकमध्ये आढळला मृत्यू

◆ **भोपाळ (वृत्तसंस्था) :**

मध्य प्रदेशातील भोपाळमध्ये सेप्टिक टँकमध्ये बंद पेटीत महिलेचा सडलेला मृतदेह आढळल्याने परिसरात खळबळ उडाली. निशातपुरा भागात टँकमधून तीव्र दुर्गंध येत असल्याची माहिती स्थानिकांनी पोलिसांना दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. पेटीत आढळलेल्या मृतदेहाच्या हातावर गोंदवलेल्या नावावरून तिची ओळख अशरफी उर्फ सिया (वय ३३) अशी पटली. ती मूळची गोंदिया येथील रहिवासी होती.

या प्रकरणी पोलिसांनी महिलेचा पती समीर खान याला अटक केली आहे. समीर हा रिक्षाचालक असून त्याचे यापूर्वी दोन विवाह झाले होते. इन्स्टाग्रामवरून सिया आणि समीर यांची ओळख झाली होती. ओळखीतून प्रेमसंबंध निर्माण झाले आणि काही महिन्यांपूर्वी दोघांनी लग्न केल्याचे सांगितले जाते. समीरचे हे तिसरे, तर सियाचे दुसरे लग्न होते. दुसऱ्या पत्नीसोबत समीरला दोन मुले असल्याने दांपत्यामध्ये वारंवार वाद होत होते. वादातूनच समीरने सियाचा गळा दाबून खून केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यानंतर मृतदेह पत्र्याच्या पेटीत टाकून सेप्टिक टँकमध्ये फेकण्यात आला. पोलिसांनी २० हून अधिक संशयितांची चौकशी केली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, सियाच्या कुटुंबीयांपैकी अद्याप कोणीही पुढे आलेले नाही.

# देशात ७५ हजार सहकारी दुध संस्था स्थापन करणार

**महाराष्ट्रात २०२९ पर्यंत समित्या स्थापन करण्याचे उद्दिष्ट**

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**



सहकाराच्या माध्यमातून देशात 'श्वेत क्रांती २.०' द्वारे दुग्ध क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवून आणले जाणार आहे. यादृष्टीने देशभरात ७५ हजार नव्या बहुउद्देशीय सहकारी दुग्ध संस्था स्थापन केल्या जाणार आहेत. तर महाराष्ट्रात २०२९ पर्यंत सुमारे अडीच हजार नव्या दूध सहकारी समित्या स्थापन करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी राज्यसभेत सीमा द्विवेदी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दिली.

सहकारी दुग्ध संस्थांमुळे रोजगार-व्यवसायाच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून शेतकरी व महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील, असे सांगत मोहोळ म्हणाले की, नव्या श्वेत क्रांतीमुळे देशातील दैनंदिन दूध उत्पादन क्षमता ६६० लाख किलोग्रॅमवरून एक हजार लाख किलोग्रॅमपर्यंत वाढणार आहे. आतापर्यंत २२ हजार सहकारी दुग्ध संस्था स्थापन झाल्या आहेत.


या माध्यमातून पुढील पाच वर्षात असंघटित क्षेत्रातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना संघटित करून दुधाला योग्य दर मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. या योजनेत महिला सक्षमीकरणावर विशेष भर आहे. प्रारूप उपविधींमध्ये बदल करून सहकारी संस्थांच्या निर्णय प्रक्रियेत महिला व अनुसूचित-जाती जमातीच्या घटकांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित केले जाणार आहे.

महाराष्ट्रात सध्या १२ हजार ६०० दूध सहकारी समित्या कार्यरत आहेत. येत्या चार वर्षात अडीच हजार नव्या समित्या स्थापन करण्यात येतील, तसेच चार हजार २०० कार्यरत समित्यांचे सक्षमीकरण केले जाईल, अशी माहिती मोहोळ यांनी दिली.

राष्ट्रीय दुग्धविकास कार्यक्रमाअंतर्गत (एनपीडीडी) नव्या व सध्या कार्यरत असलेल्या सहकारी संस्था व समित्यांना दूध संकलन व परीक्षणासाठी उपयुक्त यंत्रसामग्री तसेच उपकरणे देण्यात येत आहेत, असेही मोहोळ यांनी सांगितले.

# भारतीय पासपोर्टला जागतिक मान्यता

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**




हेन्ली पासपोर्ट इंडेक्स २०२६च्या अहवालानुसार भारतीय पासपोर्टने जागतिक क्रमवारीत उल्लेखनीय प्रगती नोंदवली आहे. भारताने तब्बल १० स्थानांची झेप घेत ७५ व्या क्रमांकावर स्थान मिळवले आहे. या घडामोडीमुळे भारतीय नागरिकांसाठी आंतरराष्ट्रीय प्रवास अधिक सोपा आणि सुलभ होणार आहे.

नव्या क्रमवारीनुसार भारतीय पासपोर्टधारकांना ५६ देशांमध्ये व्हिसामुक्त प्रवेश, आगमनानंतर व्हिसा (व्हिसा-ऑन-अरायव्हल) किंवा ई-व्हिसा सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अनेक देशांसाठी प्रवास करताना दीर्घ प्रतीक्षा, कागदपत्रांची क्लिष्ट प्रक्रिया आणि अनिश्चितता यामध्ये लक्षणीय घट होईल. पर्यटन, उद्योग-व्यवसाय, शिक्षण तसेच आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभागासाठीही भारतीयांना याचा फायदा होणार आहे. हा निर्देशांक आंतरराष्ट्रीय हवाई वाहतूक संघटना (आयएटीए) यांच्या आकडेवारीवर आधारित असून, एखाद्या देशातील नागरिकांना किती देशांमध्ये सहज प्रवेश मिळतो याचे मूल्यमापन करतो. पासपोर्टची रँक जितकी उंच, तितके त्या देशाच्या नागरिकांचे जागतिक स्तरावर प्रवेशस्वातंत्र्य अधिक मानले जाते. भारतीय पासपोर्टच्या या सुधारणेमुळे भारताची जागतिक पातळीवरील प्रतिमा मजबूत होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# अशोक महाविद्यालयात अनियमित व गैरव्यवहार झाल्याचा प्राध्यापकांचा आरोप

## पत्रकार परिषदमध्ये प्रश्नाचा भडीमार;प्राध्यापकांची तारांबळ उडाली

**चांदूररेल्वे/वार्ताहर**

शहरातील स्व. मदन गोपाल मुंदडा कला व वाणिज्य (अशोक) महाविद्यालयात प्राचार्य डॉ जयंत कारमोरे यांचा मनमानी कारभार व आर्थिक गैरव्यवहार तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची माहिती प्रा तपोवन पाटील व प्रा माया वानखडे यांनी पत्रकार परिषदेतून दिली आहे.

शहरातील स्व. मदन गोपाल मुंदडा कला व वाणिज्य (अशोक) महाविद्यालयात २०२४ पासून प्रशासक असून या महाविद्यालयांतील प्रा. तपोवन पाटील व प्रा माया वानखेडे यांनी आज चांदूररेल्वे शहरातील भाकपा पक्ष कार्यालयात पत्रकार परिषद घेऊन प्राचार्य डॉ जयंत कारमोरे यांच्यावर मनमानी कारभार व आर्थिक गैरव्यवहार तसेच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान व पूर्वीचे प्रशासक यांनी डॉ जयंत कारमोरे यांना पाठीशी घालत सहकार्य केले असा आरोप केला तसेच प्रशासक कुंभारे यानी डॉ. कारमोरे यांना शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम नसल्याने वैद्यकीय तपासणीसाठी सक्तीच्या रजेवर पाठवले. प्रभारी प्राचार्य पदाचा कार्यभार प्रा माया वानखेडे यांना दिला. त्यावर डॉ. कारमोरे यांनी न्यायालयीन याचिका दाखल केली. न्यायालयाने शासनाकडील अपील आठवड्यात निकाली काढण्याचा व याचिका सुरू असेपर्यंत प्रशासकांनी कारमोरे यांना



दिलेल्या आदेशाला स्थगिती दिली. त्यानंतर त्यांनी महाविद्यालयात सर्वांसाठी नोटीस काढून सांगितले की, प्राचार्य तेच असल्याने कागदपत्रावर त्यांची सही घ्यावी असे सांगीतले. परंतु विद्यार्थी त्यांचे कागदपत्र घेण्यासाठी येत असतांना प्राचार्य कारमोरे सांगतात की, मी चार्ज घेतला नाही असे सांगत विद्यार्थ्यांना सही व कागदपत्रे देण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप पत्रकार परिषदेला उपस्थित प्राध्यापकांनी केला.त्यासाठी विद्यार्थी पोलीस स्टेशनकडे जाऊन तक्रार करीत असल्याचेही समजते. एकीकडे आपण चार्ज घेतलेला नाही असे सांगून विद्यार्थ्यांना मानसिक त्रास द्यायचा आणि दुसरीकडे प्राचार्य नावाने सुचना काढत असल्याचा आरोप प्रा. तपोवन पाटील व प्रा. माया वानखेडे यांनी केला. सदर विषयावर उपस्थित पत्रकारांनी प्राध्यापकांना विचारले की, आपण इतक्या दिवस याबाबत चुपचाप का?या आधी ही बाब समोर का आणली नाही? प्रशासक कुंभारे यानी कॉलेज मधील लॉकर तोडले,कागदपत्रे ताब्यात घेऊन प्रा. माया वानखेडे यांच्याकडे प्रभारी प्राचार्य पदभार सोपवले तेव्हा पत्रकार परिषद का घेतली नाही? या प्रश्नांचा भडीमार होताच प्रा. तपोवन पाटील व प्रा. माया वानखेडे यांची तारांबळ उडाली.

### प्रशासकांनी अधिकृत प्रभार द्यावा-प्रा.डॉ.कारमोरे

१९ जानेवारीला कार्यालयात येऊन वाद घालत प्रशासक कुंभारे यांनी चार्ज घेतला. मी गेल्यावर लॉकर्स तोडून महत्वाचे कागदपत्रे,सेवापुस्तीका व प्रा.तपोवन पाटील, प्रा.माया वानखेडे यांच्या विरोधात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारी व अन्य कागदपत्रे ताब्यात घेतली.या दोन्ही प्राध्यापकांनी मागील दोन वर्षात २ तासिकेच्यावर एकही तासीका घेतली नाही. विद्यार्थ्यांचे नुकसान करीत आहे,आता जेव्हा न्यायालयाने प्रशासकाच्या आदेशाला स्थगिती दिली, तेव्हा प्रशासकानेच पुन्हा प्रभार द्यावा. माझ्यावर केलेले आरोप या प्राध्यापकांनी सिद्ध करावे. या महाविद्यालयातील कुठल्याही विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही यांची काळजी ह्यांनी करू नये. ते करण्यासाठी मागील १९ वर्षांपासून मी सक्षमपणे या पदावर आहे. अशी प्रतिक्रिया प्राचार्य डॉ जयंत कारमोरे यांना दिली.

# विदर्भ राज्य आंदोलन समितीचे दिल्लीत जनजागर




**अमरावती/का.प्र.**

विदर्भाच्या शोषणाच्या विरुध्द आणि पृथक विदर्भ राज्याची निर्मिती त्वरित व्हावी यां मागण्यासाठी विदर्भाची विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या प्रदेशाध्यक्ष रंजना मामर्डे, पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत व कोअर कमिटी मेंबर डॉ. पद्माताई राजपूत यांनी नवी दिल्ली येथे जंतर मंतरवर धरणे आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. तसेच अखिल भारतीय नवीन राज्य निर्मितीच्या राष्ट्रीय परिसंवादात आपले विचार प्रभावीपणे मांडले.

या प्रसंगी अखिल भारतीय नवीन राज्य निर्मिती महासंघाचे अध्यक्ष बाबा आर . के. तोमर, मेट्टा रामा राव, कमलेश झा, पंकज पटेल, ससुमा खुंगरू, अधोरे देवबरमा, दवा पाखरीन, पापा मंडी, आदिल गांधी, राजन घमेरिया, प्रवीण पांडेय, कर्नल सुधीर चौधरी, रवींद्र पांडे, पणमोली, डी. बी. लामा जोयो, विजय कुमार पनावर, प्रा, अमरेंद्र झा, मदन कुमार झा, वर्षा झा, कल्पना पटेल, अनिरुद्ध तिवारी, सुराऊ मोज बीवई, सुनील नायथेम, विश्व मुथियारी, उमाशंकर तिवारी, माधवी झा, के डी. मिश्रा, अरुण पथेरिया, विनीत सामोबा, नारझे, अजय तोमर, रामपाल माझी, शिवकुमार माझी, मिथिला सुमा तसेच संपूर्ण देशातून पृथक राज्यांची मागणी करणाऱ्या प्रांतातील विविध संघटनांचे शीर्षस्थ नेते हजर होते.

# ज्येष्ठ विधीज्ञ कै. ज्ञानेश्वरराव बाबरेकर यांना मरणोत्तर 'विधी महर्षी' पुरस्कार

**माजी मुख्य न्यायाधीश भूषण गवई व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती**

**अमरावती/का.प्र.**

कायदे क्षेत्रातील शिक्षण आणि प्रत्यक्ष न्यायालयीन कामकाज यांमधील दरी सांधण्याच्या उद्देशाने, बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांच्या वतीने उभारण्यात आलेल्या 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अधिवक्ता प्रशिक्षण आणि संशोधन केंद्रा'चे उद्‌घाटन व अमरावतीचे जेष्ठ विधीज्ञ कै. ज्ञानेश्वरराव बाबरेकर यांना मरणोत्तर विधी महर्षी पुरस्कार सर्वोच्च न्यायलयाचे माजी मुख्य न्यायाधीश भूषण गवई व महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. त्याची मुले माजी जिल्हा सत्र न्यायाधीश अशोक बाबरेकर,



अधिवक्ता संजय बाबरेकर, प्रकाश बाबरेकर, मुलगी कांचन थेटे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

या ऐतिहासिक केंद्राचे उद्‌घाटन भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण आर. गवई यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या मुख्य अतिथीपदी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते, तर मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले.याप्रसंगी मेघालय उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती रेवती मोहिते-ढेरे, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंग, महाराष्ट्राचे महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठे आणि गोव्याचे महाधिवक्ता देविदास पांगम यांसह न्यायक्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. याशिवाय त्यांच्या कुटुंबातील डी.आर. थेटे, कल्पना भागवत, विजय भागवत,रंजना बाबरेकर यांची तसेच वकील मंडळी सुद्धा प्रामुख्याने मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पशूवैद्यकीय दवाखाना स्थलांतरीत करा

## ललीत व्यास यांची मागणी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

शहरातील वर्दळीच्या ठिकाणी असलेले पशूवैद्यकीय दवाखाना स्थलांतरीत करण्याची मागणी जोर धरत आहे.अंजनगाव शहरातील आठवडी बाजारात जीर्ण अवस्थेत असलेली पशूवैद्यकीय इमारत कोसळण्याच्या स्थितीत आहे. तर आठवडी बाजार भरतो त्याठिकाणी जनावरे उपचारासाठी आणण्यात असल्याने बाजाराच्या दिवशी मोठ्या अडचणी येतात त्यामुळे पशू वैद्यकीय दवाखाना स्थलांतरीत करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ललीत व्यास यांनी केली आहे.



शहरातील सुर्जी भागात मोठ्या प्रमाणात वलीताचे क्षेत्र आहे त्यामुळे सुर्जी परिसरात मोठ्या प्रमाणात जनावरांची संख्या असून नगरपरिषदेचे मोठे पटांगण असल्याने व त्या परिसरात अत्यंत आवश्यक पशूवैद्यकीय दवाखाना असल्याने पशूवैद्यकीय दवाखाना त्या जागेवर स्थानांतर करण्यात यावा अशी मागणी ललीत व्यास यांनी केली आहे.पशू वैद्यकीय दवाखाना जीर्ण अवस्थेत असल्याने कोणत्याही वेळी जिवीत हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे ही इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन सॉपीग मार्केट काढल्यास नगरपरिषद उत्पादनात वाढ होऊ शकते. याबाबत चे निवेदन सामाजिक कार्यकर्ते ललीत व्यास यांनी नगरपरिषद प्रशासनाला दिले आहे.

# महानगरपालिकेत स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य

## महापौरांचा इशारा

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका हद्दीत स्वच्छता, आरोग्य आणि शिस्तबद्ध प्रशासनाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी व्यक्त केला आहे. शहरातील स्वच्छतेच्या कामात कोणतीही ढिलाई सहन केली जाणार नसून निष्काळजीपणा करणाऱ्या स्वास्थ्य निरीक्षकांवर कठोर प्रशासकीय कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

महापौरांनी प्रशासनाला आदेश देताना सांगितले की, प्रत्येक प्रभागातील स्वास्थ्य निरीक्षकांनी दररोज क्षेत्रभेट देणे बंधनकारक राहील. रस्ते, नाले, सार्वजनिक ठिकाणे, कचरा संकलन केंद्रे येथे स्वच्छता नियमित होत आहे की नाही, याची स्वतः पाहणी करून अहवाल सादर करावा. नागरिकांना अस्वच्छतेचा त्रास होणार नाही, याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.नगरसेवक किंवा नागरिकांकडून स्वच्छतेबाबत तक्रार प्राप्त झाल्यास ती तात्काळ निकाली काढणे आवश्यक राहील. तक्रारी प्रलंबित ठेवणे किंवा दुर्लक्ष करणे अजिबात सहन केले जाणार नाही. एखाद्या स्वास्थ्य निरीक्षकाविरुद्ध नगरसेवकांकडून तक्रार आल्यास थेट कारवाई करण्यात येईल, असेही महापौरांनी स्पष्ट केले.



### आजपासून प्रत्यक्ष दौरा

महापौर श्रीचंद तेजवानी यांनी जाहीर केले की, १६ फेब्रुवारीपासून ते दररोज सकाळी ८ ते १० या वेळेत मोटरसायकलवरून विविध प्रभागांचा प्रत्यक्ष दौरा करणार आहेत. स्वच्छतेच्या कामांचा आढावा घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना जागेवरच सूचना दिल्या जातील.महानगरपालिका प्रशासन शहर स्वच्छ ठेवण्यासाठी कटिबद्ध असून स्वच्छतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा ठाम संदेश महापौरांनी दिला आहे.

# विचारांच्या स्वातंत्र्यासाठी मेंदूची प्रतिकारशक्ती वाढवा

## श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात श्रीपाद भा. जोशी यांचे व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

जागतिकीकरणाच्या वेगवान युगात प्रसारमाध्यमांची भूमिका, त्यांची विश्वासार्हता आणि समाजमनावर होणारा परिणाम या विषयांवर परखड आणि चिकित्सक भाष्य करत सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत डॉ.श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. 'सद्यस्थिती आणि प्रसारमाध्यमे' या विशेष व्याख्यानात त्यांनी माध्यमांचे बदलते स्वरूप, भांडवलशाहीचा वाढता प्रभाव आणि मातृभाषेच्या प्रश्नांवर थेट व स्पष्ट भूमिका मांडत विचारांच्या स्वातंत्र्यासाठी मेंदूची प्रतिकारशक्ती वाढवा, असे आवाहन उपस्थितांना केले.

शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाच्या वतीने डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित या व्याख्यानाचे अध्यक्षस्थान अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.डॉ. किशोर साबळे यांनी भूषविले तर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. रमेश अंधारे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. श्रीपाद भालचंद्र जोशी म्हणाले की, आज जगातील बहुतेक माध्यमे काही मोजक्या भांडवलदारांच्या ताब्यात केंद्रीत झाली आहेत. जाहिरातदार आणि कॉर्पोरेट घराण्यांच्या हितसंबंधांमुळे बातम्यांचे स्वरूप बदलले असून प्रसारमाध्यमे हळूहळू 'प्रचारमाध्यमे' बनत आहेत. 'बातमी ही उत्पादन (प्रॉडक्ट) बनली आहे;तिचा उद्देश लोकजागृती नसून नफा कमावणे हा आहे.माध्यमांतील आशय, प्रतिमा आणि शब्दरचना यामधून विशिष्ट विचारसरणी पेरली जाते. कामगार, शेतकरी, महिला, आदिवासी यांचे प्रश्न दुय्यम ठरवले जातात, तर सनसनाटी घटनांना रंगवून मांडले जाते, अशी टीकाही त्यांनी केली.



### मातृभाषा, साहित्य आणि स्वाभिमान

भाषा, साहित्य आणि संस्कृती हा समाजाच्या विचारांचा पाया असल्याचे सांगत जोशी यांनी मातृभाषेतून शिक्षण देण्यावर भर दिला.'जोपर्यंत शिक्षण मातृभाषेतून होत नाही, तोपर्यंत समाजाची बौद्धिक उन्नती होऊ शकत नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले. मराठीसह भारतीय भाषांमध्ये प्रचंड शब्दसंपदा असूनही इंग्रजीला एकमेव ज्ञानभाषा मानण्याची प्रवृत्ती धोकादायक असल्याचे त्यांनी नमूद केले.साहित्य संस्थांवरही भांडवलशाही शक्तींचे डोळे असल्याचा आरोप करत त्यांनी विदर्भ साहित्य संघासह विविध साहित्य संस्थांच्या स्वायत्ततेचे रक्षण करण्याचे आवाहन केले.

### 'मेंदूची प्रतिकारशक्ती वाढवा'

जोशी यांनी श्रोत्यांना प्रश्न विचारण्याची सवय लावण्याचे आवाहन केले.'आपण जे पाहतो, ऐकतो ते कितपत सत्य आहे, हे पडताळून पाहिले पाहिजे. फुकट मिळणारी माहिती आपल्यासाठी की कोणाच्या हितासाठी, हा साधा प्रश्न विचारला पाहिजे,' असे ते म्हणाले. माध्यमांच्या प्रभावातून बाहेर पडण्यासाठी व्यक्तीने स्वतःच 'माध्यम' बनून सत्याचा शोध घेतला पाहिजे,त्यासाठी मेंदूची प्रतिकारशक्ती वाढविणे अत्यंत आवश्यक आहे, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात प्रा.डॉ. किशोर साबळे यांनी जोशी यांच्या परखड विश्लेषणाचे कौतुक केले. सकाळपासून रात्रीपर्यंत आपण जे ऐकतो-पाहतो, ते संपूर्ण सत्य असतेच असे नाही. प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता तपासणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. समाजमाध्यमांवर चांगले पत्रकार काम करत असले तरी सर्वसामान्यांनी सजग राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक डॉ. कुमार बोबडे यांनी केले. डॉ.उमेश कडू, डॉ.जयराम गायकवाड व डॉ.राजेश मिरगे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रा.रूपेश फसाटे यांनी आभार मानले. या व्याख्यानाला वाणिज्य विभागप्रमुख डॉ.संजय कटाईत, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ.ज्ञानेश्वर नामुर्ते, गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ.सुजाता सबाने, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ.संगीता भुयार, मराठी विभागप्रमुख डॉ.सुवर्णा गाडगे, हिंदी विभागप्रमुख डॉ.मनोज जोशी, डॉ.के.के.मोहाडीकर, डॉ.शिवाजी कानफाडे, डॉ.प्रशांत हरमकर, डॉ.नकुल धरमकर, डॉ.जी.जी.भारती, डॉ.अपर्णा सरोदे, अधीक्षक किशोर राजगडे, प्रा.प्रतिक करंडे, प्रा.मनीष भंकाळे, प्रा.सर्वेश मराठे, प्रा.मनीषा देशमुख, नागेश गोळे आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक विद्यार्थी व साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### मनपात संत सेवालाल महाराज जयंती



**अमरावती-**संत सेवालाल महाराज जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. संत सेवालाल महाराज जयंती निमित्य मा.महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या हस्ते संत सेवालाल महाराज यांचे प्रतिमेस हारार्पण करुन अभिवादन विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले.यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, अभिलेखागार नंदकिशोर पवार, प्रल्हाद चव्हाण, प्रमोद मोहोड, अजय पोपटानी, भुषण खडेकार, अखिलेश खडेकार, सतिश पवार, कोमलसिंग आडे, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### भागवत सप्ताह निमित्त सेवाकऱ्यांचा सत्कार

**अंजनगाव बारी-**दरवर्षी प्रमाणे स्थानिक आसरानगर येथे गजानन महाराज मंदिराच्या वतीने प्रकटदिन महोत्सवात विविध धार्मिक कार्यक्रम राबविले.तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंती पर्वावर त्यांच्या चरित्राचे वाचन योगेश महाराज सालेगावकर (परभणी) यांच्याकडून करण्यात आले. यंदा याशिवाय सप्ताहभर भजन-कीर्तन, हरिपाठ, कलश स्थापना, ग्रंथ शोभायात्रा, काल्याचे कीर्तन रामगीर महाराज मठाधिपती शंकरगीरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी माजी सभापती व शिंदे शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमुख आशिष धर्माळे यांच्या हस्ते विविध गजानन महाराज मंदिर सेवाकऱ्यांचा शाल, श्रीफळ व गजानन महाराज प्रतिमा भेट देऊन जाहिर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कथा प्रवक्ता ह.भ.प. अभिनंदन गायकवाड महाराज (सोलापूर), रामगिरी महाराज देवस्थान मठाधिपती शंकरगिरी महाराज, वसंतराव सोनार, माजी सरपंच प्रकाश खंडार, मंजिल लोणारे, अक्षर शेलोकार, अंकुश कुंभलकर आदीचा आशिष धर्माळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. गजानन महाराज मंदिर जिर्णोद्धार साठी सढळ हाताने मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.



### महाशिवरात्रीनिमित्त उपमहापौरांचा सत्कार



**अमरावती-**महाशिवरात्रीच्या पावन निमित्ताने जिजाऊ भवन येथे तिरळे कुणबी सन्मित्र संघटना महिला मंडळ कडून सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार पार पडला.सत्काराला उत्तर देताना उपमहापौर सचिन भेंडे यांनी आपुलकीने केलेल्या सन्मानाबद्दल आयोजक व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. महाशिवरात्रीच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमामुळे परिसरात भक्तीमय व आनंदी वातावरण निर्माण झाले होते. यावेळी संघटनेचे अध्यक्ष गजेंद्र बोंडे, श्रीकृष्ण पाळेकर, दिनेश ठाकरे व संपूर्ण महिला मंडळ उपस्थित होते.

### घरकुल लाभार्थ्यांना रेतीवाटप



**तिवसा-** पालकमंत्री ना. चंद्रशेखरजी बावनकुळे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येणाऱ्या 'गावं भेट' उपक्रमांतर्गत घरकुल लाभार्थ्यांना रेतीवाटप कार्यक्रम इसापूर येथे तिवसा तहसील कार्यालयाच्या माध्यमातून यशस्वीपणे पार पडला.शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना घर बांधकामासाठी आवश्यक असलेली रेती सुलभ व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या घर बांधकामास गती मिळण्यास मदत होणार आहे.कार्यक्रमावेळी आमदार राजेश वानखडे, तिवसा विधानसभा मतदार संघ, उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे, तिवसा तहसीलदार मयूर कळसे, गट विकास अधिकारी अभिषेक कासोदे, नायब तहसीलदार आशिष नागरे, प्रदीप गौरखेडे, माजी जिल्हा उपाध्यक्ष तथा विशेष निमंत्रित सदस्य अमरावती, माजी संचालिका कापूस पणन महासंघ मुंबई छाया दंडाळे, सरपंच दिनेश लांडगे, माजी उपसरपंच प्रेमा इंगळे, गजानन राऊत, अनुप अढाऊ, अनिकेत वानखडे, मुकेश कठाळे, राजेश तेलंग तसेच महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि घरकुल लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी सैनिक सुधाकर टारपे यांचे निधन

## हजारोंच्या उपस्थितीत शासकीय इतमामातील अंत्यसंस्कार

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

येथील स्थानिक नेहरू चौक स्थित सामाजिक कार्यकर्ते तसेच शासकीय सेवेतून निवृत्त माजी सैनिक राजू उर्फ सुधाकर लक्ष्मनराव टारपे (६५) यांचे अल्प आजाराने निधन त्याच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व नातूपंतू असा बराचसा आप्त परिवार आहे. त्याच्यावर हिंदू स्मशानभूमी अंजनगाव बारी येथे हजारोंच्या संख्येने उपस्थितांच्या शासकीय इतमामातील मानवंदना देऊन अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावातील जेष्ठ, सामाजिक, राजकीय तसेच सर्वच क्षेत्रात नागरिकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.



**देशाची राजधानी नवी दिल्ली येथे १६ आणि १७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६'कडे संपूर्ण आशिया खंडाचे विशेषतः पश्चिमी प्रगत राष्ट्रांचे लक्ष लागून राहिले आहे. याचे कारण, जागतिक तंत्रज्ञानाच्या नकाशावर 'ग्लोबल साऊथ'चे नेतृत्व सिद्ध करणारी एक महत्त्वाची घटना आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या महाकाय विश्वात भारताच्या वाढत्या प्रगतीचा उद्घोष यानिमित्ताने होणार आहे.**




# एआय विश्वात भारताचा हुंकार

✍ महेश कोळी

गेल्या काही वर्षांत तंत्रज्ञानाच्या जगाने अनेक स्थित्यंतरे पाहिली, पण 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (एआय) नावाच्या लाटेने मानवी संस्कृतीच्या पायालाच हात घातला आहे. चॅटजीपीटीच्या आगमनानंतर सुरू झालेली ही धाव आता अशा वळणावर येऊन ठेपली आहे, जिथे तंत्रज्ञान हे केवळ साधन न राहता जागतिक राजकारणाचे एक अस्त्र बनले आहे. अशा धुमसत्या वातावरणात १६ ते २० फेब्रुवारीदरम्यान नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित होणारी 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट' भारताच्या वाढत्या ताकदीची साक्ष देणारी ठरेल. ग्लोबल साऊथमध्ये होणारी ही पहिलीच जागतिक स्तरावरील परिषद असल्याने संपूर्ण जगाच्या नजरा सध्या भारताकडे लागल्या आहेत. या परिषदेत गुगलचे सुंदर पिचाई, ओपन एआयचे सॅम ऑल्टमन, एनव्हिडियाचे जेन्सन हुआंग आणि अँथ्रोपिकचे डारिओ अमोदेई यांसारख्या दिग्गजांची उपस्थिती लाभणार आहे; परंतु ही केवळ कॉर्पोरेट जगातील मांदियाळी नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली या परिषदेची आखणी 'तीन सूत्रे' आणि 'सात चक्रे' यांवर आधारित करण्यात आली आहे. 'लोक' (पीपल), 'ग्रह' (प्लॅनेट) आणि 'प्रगती' (प्रोग्रेस) ही तीन मुख्य सूत्रे असून, त्यातून शिक्षण, आरोग्य, सुरक्षा आणि शाश्वत विकास यांसारख्या सात महत्त्वाच्या क्षेत्रांचा (चक्रे) ऊहापोह केला जाणार आहे.

विशेष म्हणजे, या परिषदेचा परिघ चर्चेपुरता मर्यादित नसून यामध्ये प्रत्यक्ष अंमलबजावणीचा आराखडा मांडला जाईल. १७ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध होणारा 'एआय कॉम्पेंडियम' हा अहवाल आरोग्य आणि कृषी क्षेत्रातील एआयच्या वापराची यशोगाथा सांगणारा असेल. 'एआय फॉर ऑल' आणि स्त्रियांसाठीची 'एआय बाय हर' यांसारखी पारितोषिके हा तंत्रज्ञानाच्या लोकशाहीकरणाचे प्रतीक ठरणार आहेत. तंत्रज्ञानाच्या जगात सध्या 'एजीआय' (आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स) म्हणजे मानवासारखी बुद्धिमत्ता असणारे यंत्र हा एक चर्चेचा आणि भीतीचा विषय बनला आहे. सॅम ऑल्टमन यांच्यासारखे दिग्गज १००० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची भाषा करत असताना भारताची भूमिका अधिक वास्तववादी आहे. एरिक शिमट आणि योशुआ बेंगिओ यांच्यासारख्या संशोधकांनी स्पष्ट केल्याप्रमाणे सध्याचे एआय मॉडेल्स माहितीच्या बाबतीत प्रगत असले, तरी तर्कशक्ती आणि दीर्घकालीन स्मृतीच्या बाबतीत अद्यापही बाल्यावस्थेत आहेत. एआय हे नजीकच्या भविष्यातील वास्तव नसून एक दीर्घकालीन ध्येय आहे, हे ओळखणे गरजेचे आहे. भारताने याच ठिकाणी ऑगमेंटेड इंटेलिजन्स'चा (संवर्धित बुद्धिमत्ता) पर्याय स्वीकारला असून तो मानवी बुद्धिमत्तेला पर्याय न ठरता तिला अधिक सक्षम करेल.

### 'बिग एआय' विरुद्ध 'स्मॉल एआय': नवा संघर्ष

सध्याचे एआय क्षेत्र हे काही मोजक्या पाश्चात्त्य कंपन्यांच्या हातात एकवटलेले आहे. एनव्हिडियाचे चिप्स बाजारावर ९०-९५ टक्क्यांपर्यंत राज्य करत आहेत. अशा परिस्थितीत तंत्रज्ञानातील सार्वभौमत्व किंवा टेक्नॉलॉजिकल सोव्हरेन्टी धोक्यात येण्याची शक्यता असते. अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाचे सल्लागार पीटर नवारो यांनी 'भारतातील एआयचा खर्च अमेरिकेने का द्यावा' असा प्रश्न विचारणे किंवा भारताला प्रगत चिप्सच्या पुरवठ्यातून वगळणे, हे जागतिक राजकारणातील बदलत्या वाऱ्याचे संकेत आहेत. भारताने याला प्रत्युत्तर म्हणून 'स्मॉल एआय'ची संकल्पना मांडली आहे. प्रचंड ऊर्जा आणि अवाढव्य डेटा सेंटर्सवर अवलंबून राहण्यापेक्षा कमी संसाधनांत जास्तीत जास्त उपयोगिता कशी मिळवता येईल, यावर भारताचा भर आहे. भारताचे १००० कोटींचे 'इंडिया एआय मिशन' हे जरी पाश्चात्त्य कंपन्यांच्या तुलनेत छोटे वाटत असले, तरी भारताचा 'डेटा' हाच भारताचा खरा कणा आहे. जगातील एकूण डेटापैकी २० टक्के डेटा हा भारतातून निर्माण होतो. हीच भारताची खरी ताकद आहे.

### आव्हाने आणि सुरक्षिततेची पायवाट


कोणत्याही मोठ्या क्रांतीसोबत धोके येतातच. योशुआ बेंगिओ यांनी नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'इंटरनॅशनल एआय सेफ्टी रिपोर्ट'मध्ये स्वायत्त यंत्रांच्या धोक्यांकडे लक्ष वेधले आहे. एआय स्वतःच्या अस्तित्वासाठी चुकीचे मार्ग अवलंबू शकते, ही भीती काल्पनिक राहिलेली नाही. भारताने आपल्या 'पाच स्तरांच्या एआय स्टॅक'मध्ये सुरक्षिततेला प्राधान्य दिले आहे. तसेच 'युवाई'सारख्या उपक्रमांतून १३ ते २१ वयोगटातील तरुण पिढीला या तंत्रज्ञानाशी जोडताना नैतिक मूल्यांची जाणीव करून देणे, हे भविष्यातील धोके टाळण्यासाठी उचललेले पाऊल आहे.

या शिखर परिषदेदरम्यान सुमारे १०० अब्ज डॉलरपेक्षा (सुमारे ८.३ लाख कोटी रुपये) जास्त गुंतवणुकीची घोषणा होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. विशेषतः सेमीकंडक्टर, एआय डेटा सेंटर्स आणि क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात मायक्रोसॉफ्ट, अॅमेझॉन आणि गुगल यांसारख्या कंपन्यांकडून मोठ्या प्रकल्पांची घोषणा केली जाईल, ज्यामुळे भारताची ग्लोबल एआय हब म्हणून ओळख अधिक गडद होईल. भारत यावेळी इंडिया एआय गव्हर्नन्स गाईडलाईन्स सादर करणार आहे. यामुळे एआयच्या वापरामध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सुरक्षेसाठी एक जागतिक मानक प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जाईल. याशिवाय, परिषदेच्या शेवटच्या दिवशी होणारी जीपीएआय कौन्सिल बैठक जागतिक एआय धोरणांना अंतिम आकार देण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरेल. भारताचे 'भाषिणी' हे बहुभाषिक एआय मॉडेल आणि 'किसान ई-मित्र' सारखे उपक्रम या परिषदेत आकर्षणाचे केंद्र असतील, जे कमी साधनसामग्री असलेल्या देशांसाठी एक यशस्वी रोडमॅप ठरू शकतात.

एकूणच, भारत मंडपममध्ये पार पडणारी शिखर परिषद भारताला केवळ एक बाजारपेठ म्हणून नाही, तर एआय विश्वाचा मार्गदर्शक म्हणून जागतिक पटलावर उभे करेल. इंटरनेटच्या 'डॉट कॉम' क्रांतीप्रमाणेच एआयच्या क्षेत्रातही एक फुगा (बबल) फुटण्याची भीती व्यक्त केली जात असली, तरी पायाभूत सुविधांच्या दृष्टीने भारत सज्ज आहे. डिजिटल इंडियानंतर आता 'एआय इंडिया'च्या दिशेने होणारी ही वाटचाल भारताला खऱ्या अर्थाने विकसित भारत बनवण्याच्या दिशेने नेणारी असेल. 'स्मॉल एआय'च्या माध्यमातून सामान्यांचे जीवन सुसह्य करणे, हाच भारताचा मूळ उद्देश असून तोच या परिषदेचा गाभा आहे.

# जोडीदाराकडून होणारी हिंसा एक मोठे आव्हान!

✍ अंजली महाजन



विवाह, डेटिंग किंवा 'लिव्ह इन'सारख्या संबंधात एका जोडीदाराने दुसऱ्या जोडीदाराविरोधात हिंसक किंवा अवमानकारक कृत्य करणे गुन्हा आहे. यास घनिष्ठ जोडीदाराकडून होणारी हिंसा किंवा इंटिमेंट पार्टनर व्हॉयलन्स (आयपीव्ही) असे म्हणतात. 'लॅन्सेट'मध्ये प्रकाशित अभ्यासात जगभरातील सुमारे ६०.८ कोटी महिला आयपीव्हीला बळी पडतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, भारतात १८ ते ४९ वयोगटातील तब्बल ३० टक्के महिलांनी आयुष्यात किमान एकदा तरी आयपीव्हीचा अनुभव घेतलेला असतो.

घनिष्ठ जोडीदाराकडून होणारी हिंसा किंवा इंटिमेंट पार्टनर व्हॉयलन्स (आयपीव्ही) असे म्हणतात. भारतात सुमारे प्रत्येक तिसरी महिला 'आयपीव्ही'चा कोणत्या ना कोणत्या रूपातून सामना करते. ही केवळ सामाजिक समस्या नाही, तर महिलांची अस्मिता, आरोग्यावरही गंभीर परिणाम करणारी आहे. अशा हिंसेचे गांभीर्य सहजासहजी उघड होत नाही. मात्र आकडेवारीवरून त्याचे भीषण स्वरूप कळते. हा एक मोठा गंभीर विषय आहे. 'लॅन्सेट'मध्ये प्रकाशित अभ्यासात जगभरातील सुमारे ६०.८ कोटी महिला आयपीव्हीला बळी पडतात. जागतिक आरोग्य संघटनेनुसार, भारतात १८ ते ४९ वयोगटातील तब्बल तीस टक्के महिलांनी आयुष्यात किमान एकदा तरी आयपीव्हीचा अनुभव घेतलेला असतो. कर्नाटक, बिहार आणि तेलंगणमध्ये आयपीव्हीचा दर हा राष्ट्रीय सरासरीच्या तुलनेत अधिक आहे. त्याचवेळी गोवा, हिमाचल प्रदेश, नागालँडमध्ये हा दर कमी आहे.

आयपीव्ही ही एक गंभीर सामाजिक आणि सार्वजनिक आरोग्याची समस्या आहे. ती केवळ शारीरिक हानीपुरती मर्यादित राहत नाही, तर अनेक मार्गांनी समोर येते. भारतात कौटुंबिक हिंसेपासून संरक्षण देण्यासाठी कायदा आहे. लिव्ह इन रिलेशनमध्ये राहणाऱ्या महिला या कायद्याच्या (संरक्षण अधिनियम २००५) आधारे सुरक्षा मिळवू शकतात. अनेक घरात मूल झाल्यानंतर महिलांनी तत्काळ नोकरी करावी असे पुरुषांना वाटते. त्यावेळी महिलांचे आरोग्य मात्र संवेदनशील असते. अशावेळी त्यांना जबरदस्तीने कामावर पाठवणे हे आयपीव्हीअंतर्गत येते. अशी अनेक प्रकरणे समोर येतात. म्हणूनच आयपीव्हीसंदर्भात शाळेतून जनजागृती मोहीम सुरू करायला हवी. मुलांच्या शालेय शिक्षणातच कौटुंबिक हिंसाविरोधी कायद्याची ओळख करून द्यायला हवी. वैद्यकीय मदतीत त्रुटी अडचणी ठरू शकेल. उपचारातील निष्काळजीपणादेखील अनेक बाबतीत 'आयपीव्ही'ला कारणीभूत ठरतो. कोणतीही घटना घडली की महिलांचा सर्वात अगोदर संपर्क डॉक्टरांशी होतो. पण काही वेळा महिलांचे शोषण होत असल्याचे डॉटरांच्या लक्षात येत नाही. अशावेळी डॉटरांनी शारीरिक जखमांच्या, हानीच्या संकेताकडे दुर्लक्ष केले तर पीडितेला वेळीच मदत मिळत नाही. प्रश्न न विचारणे, पोलीस आणि सल्लागार संस्थेशी संपर्क न साधणे या गोष्टीदेखील जोडीदाराच्या हिंसेला बळ देणाऱ्या आहेत. अनेकदा केवळ पाहूनच अंदाज बांधता येतो; परंतु काही महिला जमिनीवर पडल्याचे, मार लागल्याचे खोटे कारण सांगतात. प्रत्यक्षात काही वेळा जोडीदाराकडून हल्ला झालेला असतो. 'आयपीव्ही'मुळे गर्भधारणा असलेल्या महिलांना अनेक प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक अडचणींचा सामना करावा लागतो.

शिवाय अशा कुटुंबातील मुले सुरक्षित नसतात. ती धोकादायक वातावरणात मोठी होतात आणि हिंसेचा अवलंब करू लागतात. हाच पॅटर्न पुढच्या पिढीतही सुरू राहतो. डोळ्या समोर सतत हिंसा असल्याने मुलांच्या मानसिकतेवर परिणाम होतो आणि ती आक्रमक होतात. तसेच ती अमली पदार्थांचे सेवन करतात किंवा गुन्हेगारी विश्वाकडे ओढली जातात. वेगवेगळ्या घटकांतील महिलांचे हिंसेचे स्वरूप वेगळे राहू शकते. दिव्यांग महिलांना त्याचा सर्वाधिक फटका बसतो.

आयपीव्ही रोखण्यासाठी अनेक देशांनी कडक धोरण अंगिकारले आहे. ब्राझील, अमेरिका आणि पेरूसारख्या देशात कायदे आहेत. युरोपीय संघानेदेखील २०२४ मध्ये पहिल्यांदा सर्वकष कायदा तयार केला आहे. या कायद्यात महिलांविरोधातील हिंसा रोखण्यास मदत करणे, हिंसेला गुन्हा मानणे आणि पीडितेच्या सुरक्षेसाठी काम करणे यासाठी नियमावली तयार केली आहे. शिवाय सहमतीविना संबंध खुले करणे, सायबर स्टॉकिंग, सायबर शोषण, हिंसा, चिथावणी देणारी ऑनलाइन सामग्री शेअर करणे यांसारख्या गोष्टींनादेखील कायद्यानुसार हिंसक मानले आहे. भारतातदेखील कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक (डीव्ही) कायदा आहे. मात्र या कायद्यानुसार प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी अनेक वर्षे लागतात. सामाजिक दडपणामुळे अनेक महिला या पुरुषांकडून होणारी मारहाण किंवा कानशिलात लगावणे यांसारखे प्रकार सामान्य असल्याचे गृहित धरतात. कुटुंब, मुलांचे भविष्य आणि सामाजिक प्रतिष्ठा या कारणांमुळे अनेक महिला तक्रार करत नाहीत. 'मजलिस' नावाची कायदेशीर मदत करणारी आणि अधिकार संघटना असून ती महिला आणि मुलांसाठी काम करते. या संस्थेच्या संचालक ऑड्रे डीमेलो म्हणतात, हिंसा अचानक होत नाही. ती हळूहळू पाय पसरते. प्रारंभी टोमणे मारणे, टीका करणे, अवमान करणे यासारख्या गोष्टी होतात. त्याला फारसे गांभीर्याने घेतले जात नाही. सतत असाच अनुभव आल्यानंतर कालांतराने भावनात्मक ताण आणि तणाव निर्माण होतो. त्यातून कौटुंबिक हिंसाचार होण्याची शक्यता राहते.

दरवर्षी 'मजलिस' संघटनेला देशभरातून १५ ते २० हजार कॉल येतात. यापैकी केवळ दहा टक्के महिला कायदेशीर मार्गाचा निवड करतात. न्याय मिळवण्याची प्रक्रिया कठीण आणि दीर्घकाळ चालणारी आहे. या परिस्थितीत पोलीस आणि न्यायालयाकडून जोडीदारांत ताटातूट होणार नाही याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. त्यामुळे ही प्रकरणे मध्यस्थाकडे सोपविली जातात. लोकअकालतीची मदत घेतली जाते.

मात्र वेळ आणखी वाढत जातो. काही वेळा दुसऱ्या पक्षाचे लोक न्यायालयात हजर राहत नाहीत.

न्यायालयाकडून अनेक महिन्यांनंतरची तारीख दिली जाते. मेटेंनन्स ऑर्डर, म्हणजेच भरपाईचा आदेश मिळण्यासाठी अनेक महिने किंवा वर्षे वाट पाहावी लागते. अनेक प्रकरणांत तर दोन ते तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी लागतो.

# बारावी परीक्षेतील गैरप्रकार


✍ प्रा. डॉ. सुनील अग्रवाल

महाराष्ट्रात २०२६ च्या बारावी बोर्ड परीक्षेत गैरप्रकारांचे, विशेषतः कॉपीचे प्रकार, पहिल्याच दिवसापासून मोठ्या प्रमाणावर समोर येत असून ही बाब चिंताजनक बनली आहे. अनेक केंद्रांवर धडाकेबाज कारवाई होऊनही, सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या व्हिडिओंद्वारे कॉपीचे सत्र सुरूच असल्याचे दिसते, ज्यामुळे परीक्षांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पहिल्याच इंग्रजीच्या पेपरला राज्यात मोठ्या प्रमाणात कॉपी प्रकरणे नोंदवली गेली, ज्यामध्ये पुणे आणि अमरावती विभाग आघाडीवर होते.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने राज्यातील नऊ विभागांमध्ये इयत्ता बारावीची अंतिम परीक्षा घेतली जात असून आतापर्यंत या परीक्षेमध्ये ४९ केंद्रांवर १५० गैरप्रकार घडल्याचे समोर आले आहे. यामध्ये सर्वाधिक घटना छत्रपती संभाजीनगर विभागातील असून नालासोपारा येथे एक डमी विद्यार्थी आढळल्याची माहिती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली. काही केंद्रांवर सामूहिक कॉपीचे व्हिडिओ व्हायरल झाल्याने यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. अनेक गैरप्रकारांमध्ये परीक्षा केंद्रावरील कर्मचारी किंवा पर्यवेक्षकांची संमती असल्याचे निदर्शनास येत आहे.

सीसीटीव्ही फुटेजमुळे गैरप्रकार उघड

परीक्षा केंद्रावर उपलब्ध असलेल्या सीसीटीव्ही फुटेज व उत्तरांच्या झेरॉक्स प्रतींच्या आधारे सखोल तपासणी करण्यात आली. तपासणीत विद्यार्थ्यांकडून एकमेकांच्या उत्तरपत्रिकांकडे पाहून गैरप्रकार केल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान केंद्र संचालकासह १९ जणांवर कारवाई प्रस्तावित आहे. या प्रकरणात परीक्षा केंद्र संचालकासह एकूण १९ पर्यवेक्षक व संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. यामध्ये जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या पर्यवेक्षक शिक्षकांविरुद्ध निलंबनाचे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत. तसेच इतर संस्थांतील कर्मचाऱ्यांविरोधात त्यांच्या संस्थेमार्फत शिस्तभंगात्मक व कायदेशीर कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले आहेत. गैरप्रकाराची गंभीरता लक्षात घेता प्रशासनाने तात्काळ निर्णय घेत परीक्षा केंद्रावरील संपूर्ण स्टाफ बदलून नव्याने नियुक्त कर्मचाऱ्यांना परीक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. कॉपीमुक्त अभियान राबवून विशेष भरारी पथके तैनात करण्यात आली आहेत, आणि दोषींवर गुन्हे दाखल करण्यासह परीक्षा केंद्रांची मान्यता रद्द करण्याची कारवाई सुरू आहे., कॉपीमुक्त अभियानासाठी परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही आणि ड्रोनद्वारे देखरेख केली जात आहे. तरी देखील या तंत्रज्ञानाला न जुमानता काही केंद्रांमध्ये सामूहिक कॉपीचा प्रकार उघडकीस आला आहे.



दरम्यान, गैरप्रकार आढळल्यास परीक्षा केंद्राचा संपूर्ण स्टाफ बदलला जात आहे. गैरप्रकारांमुळे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण होत असून, शिक्षणाचे मूल्य टिकवून ठेवण्यासाठी याविरोधात अधिक कडक उपाययोजनांची गरज व्यक्त केली जात आहे. काही प्रकरणांमध्ये, शाळांचे निकाल वाढवण्याच्या दबावामुळे किंवा अनुदानासाठीच्या अटींमुळे काही शिक्षक परीक्षेतील गैरप्रकार (कॉपी) करण्यासाठी विद्यार्थ्यांना अप्रत्यक्ष प्रोत्साहन देऊ शकतात. असे प्रकार घडलेले आहेत तथापि, कॉपी करणे हा शिक्षणाचा दर्जा खालावणारा गंभीर प्रकार मानला जातो आणि त्यासाठी शिक्षण विभाग आणि सरकार कठोर कारवाई करत आहे. शाळांचा निकाल चांगला लागण्यासाठी आणि अनुदानासाठी शिक्षक काही वेळा कॉपीला मुभा देतात, असे दिसून आले आहे.


तसेच विद्यार्थी कॉपीसाठी आटापिटा करण्यामागे पालकांच्या अपेक्षांचे ओझे हे एक महत्त्वाचे कारण आहे. पालकांच्या दृष्टीने शिक्षणाचा अर्थ म्हणजे केवळ गुण मिळवणे, असा झाला आहे. विद्यार्थ्यांनी अधिकाधिक गुण मिळवावेत, ही पालकांची अपेक्षा आहे. त्यामागे आपल्या पाल्याला अधिकाधिक पैसा मिळवून देणाऱ्या अभ्यासक्रमाला प्रवेश हवा आहे. अपेक्षित मार्क मिळाले तरच हा प्रवेश मिळणार आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमता, बौद्धिक स्तर, अभिरूची लक्षात न घेता केवळ अपेक्षा ठेवण्याचे दुष्परिणाम म्हणून विद्यार्थी कॉपी करण्यास प्रवृत्त होत आहेत. अपेक्षांच्या ओझ्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाटा प्रामाणिकतेने न चालता गैरमार्गाने चालताना दिसतात. दहावी, बारावीच्या वर्गात शिकत असताना गुणांसाठी विद्यार्थ्यांना विविध विषयांच्या शिकवण्या लावल्या जातात. त्यासाठी पालक मोठ्या प्रमाणावर खर्च करत असतात. त्याचाही परिणाम म्हणून पालकांच्या इच्छा पूर्ण करायला हव्यात, असा विद्यार्थ्यांवर दबाव निर्माण होतो. हा दबाव क्षमतेचा विचार करत नाही. गेली काही वर्षे शाळा, महाविद्यालयांचे अप्रत्यक्ष शिकवणीवर्गासोबत करार होऊ लागले आहेत. पालकही त्यासाठी पैसा मोजत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना पालकांच्या अपेक्षांप्रमाणे गुण मिळवून देण्यासाठी काही लोक सातत्याने प्रयत्न करतात. शिक्षणाला पर्यायी व्यवस्था म्हणून उभ्या राहणाऱ्या व्यवस्थेचा हा परिणाम आहे का? याचाही शोध घेण्याची गरज आहे.

पालकांच्या उंचावलेल्या अपेक्षांचा फायदा घेऊन काही लोक त्यासाठी हात पुढे करताना दिसत आहेत. त्याचा दुष्परिणाम म्हणून गैरप्रकाराच्या वाटा चालणे पसंद केले जात आहे. शाळांनादेखील प्रवेश हवे आहेत. काही शाळांवर निकालाच्या टक्केवारीसाठी समाज, संस्थाचालक, प्रशासन, शासनाचा दबाव आहे. शाळांचा विशिष्ट टक्के निकाल हवा, विशिष्ट टक्के विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा अधिक मार्क हवेतच, अशा अपेक्षा केल्या जात असतील, तर कुंपणाकडून शेत खाल्ले जाणे स्वाभाविकच आहे. परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी प्रतिज्ञा म्हणून विद्यार्थी कॉपी करणार नाही, अशी अपेक्षा करणे हा आपला भाबडेपणा ठरेल. मुळात प्रतिज्ञेप्रमाणे वाटा चालण्यासाठी मूल्यांची रुजवणूक अधिक महत्त्वाची आहे. आज शिक्षणात मूल्य, व्यक्तिमत्त्व, जीवनकौशल्य यांच्यापेक्षा परीक्षेतील गुणांचा अधिक विचार होतो आहे. हरवलेल्या अर्थामुळे शिक्षण प्रामाणिकतेच्या वाटा चालण्याचे प्रयत्न फारसे घडत नाहीत. समाजात जोवर प्रामाणिकपणाचे मूल्य उंचावत नाही, तोवर बदल अशक्य आहे.

**वर्धा**
**मो. ९५६१५९४३०६**

# मराठी शाळांची अवस्था

✍ प्रा. मधुकर चुटे



आपल्या राज्यात मराठी शाळांची काय अवस्था आहे याची सर्वांनाच माहिती आहे. इंग्रजी शाळांचे सतत वाढणारे महत्व, शासनाकडून त्याला मिळणारे प्रोत्साहन, हा सगळा प्रकार इतका दुर्दैवीच ठरतो. अलीकडेच साताऱ्यात झालेल्या ९९ व्या साहित्य संमेलनाच्यावर्षी राज्यातील नव्वद टक्के शाळा बंद पडलेल्या पाहाव्या लागत असतील तर साहित्य संमेलनाच्या आयोजनापासून ते साहित्यिकांच्या योगदानाबाबत मोठे प्रश्नचिन्ह उभे राहतात. तीन दिवसाच्या साहित्य संमेलनाला पंचवीस ते तीस कोटींचा निधी दिला गेला. एकीकडे मराठी शाळांना अनुदान देण्याची सरकारची तयारी नसते. अशावेळी संमेलन आयोजकांनी हे अनुदान नाकारून ते मराठी शाळांसाठी वापरण्याचे आवाहन सरकारला केले पाहिजे होते. प्रत्येक साहित्यीक किंवा राजकीय नेते यांनी आपापल्या घरात मराठी भाषा टिकवण्याचा कोणता अभिनव उपक्रम सुरु केला आहे याची माहिती दिली पाहिजे. इंग्रजी शिक्षणाशिवाय मराठी भाषा ही खूप उज्ज्वल भवितव्य घडवतात. या विषयीचा आत्मविश्वास येणाऱ्या पिढीमध्ये निर्माण केला पाहिजे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शालेय शिक्षणाची सुरुवात साताऱ्यातल्या मराठी शाळेतून केली. आणि ते जागतिक कीर्तीचे तज्ञ ठरले. आज प्रत्यक्ष साताऱ्यातसुद्धा राज्य शाळांची संख्या कमी आणि इंग्रजी किंवा इंटरनॅशनल शाळांची संख्या जास्त असल्याचे चित्र पाहायला मिळते. या प्रकारचे चित्र राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये देखील दिसून येते. संत ज्ञानेश्वर माऊलींनी अमृताचे पैजा जिंके असा सार्थ अभिमान व्यक्त केला होता. माझ्या मराठीचे बोलु कौतुके असे जेव्हा म्हटले जाते त्या मराठीचे कौतुक करण्यासाठी परिस्थिती आज राहिलेली नाही. मराठी भाषेकडे होत असलेले दुर्लक्ष हा चिंतेचा विषय ठरतो. मग बंद पडणाऱ्या मराठी शाळांपासून ते राज्य व्यवहारामध्ये इंग्रजीला मिळणारे महत्व इथपर्यंत कितीतरी गोष्टी अशा आहेत की, त्यावर विचारमंथन होऊन प्रत्यक्ष कृती आराखडा तयार करणे अत्यंत गरजेचे ठरते. किंबहुना तो आराखडा तयार करून शासन दरबारी त्याचा पाठपुरावा करण्याची तितकीच आवश्यकता आहे. नव्या साहित्यिकांचा समाज व्यवस्थेला समृद्ध करणाऱ्या नव्या विचारांचा वेग आणि येणाऱ्या पिढीमध्ये मराठी मराठी भाषेविषयी प्रेम निर्माण करणे या तीन गोष्टींना प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. पण हे उद्दिष्ट साध्य होताना दिसत नाही.

नागपूर
मो. ९४२०५६६४०४

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या वक्तव्याचा भाजपकडून निषेध ; अकोल्यात आंदोलन

■ प्रतिनिधी | अकोला ■




काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि टिपू सुलतान यांची तुलना केल्याच्या वक्तव्याचा अकोला भाजपच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. महाराष्ट्राच्या अस्मितेला धक्का देणारे हे वक्तव्य असल्याचा आरोप करत भाजप पदाधिकाऱ्यांनी आंदोलन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना जबरदस्तीच्या धर्मांध राजवटीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या टीपू सुलतानशी करणे हा इतिहासाचा अपमान असल्याचे भाजपने म्हटले आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी केलेले वक्तव्य हे ऐतिहासिक अज्ञान दर्शवणारे असून महाराष्ट्रातील जनतेच्या भावना दुखावणारे आहे, असा आरोपही यावेळी करण्यात आला.

या निषेध आंदोलनात प्रदेश सरचिटणीस तथा आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार वसंत खंडेलवाल, महानगर अध्यक्ष जयंत मसने, माजी महापौर विजय अग्रवाल, सौ. शारदा खेडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी किशोर मांगटे पाटील, कृष्णा शर्मा, अनुप शर्मा, माधव मानकर, संजय गोटफोडे, ॲड. देवाशिष काकड, आम्रपाली उपरवट, गिरीश जोशी, पवन महल्ले, संदीप गावंडे, तुषार भिरड, सागर शेगोकार, अमोल गिते, गोपाल मुळे, रणजित खेडकर, सतीश ढगे, संतोष पांडे, सौ. सुनीता अग्रवाल, वैशाली शेळके, माधुरी क्षीरसागर, ॲड. कल्पना गोटफोडे, आरती घोगलिया, मनीषा भंसाली, मंजुषा शेळके, प्राची काकड, विद्या खंडारे, चंदा शर्मा, रंजना विंचनकर, अनिल गरड, बबलू जगताप, शरद तूरकर, नितीन ताकवाले, गणेश अंधारे, विनोद मनवानी, किशोर वरोकार, अमोल मोहोकार, दिलीप मिश्रा, विशाल इंगळे, हर्षद भांबेरे, संतोष डोंगरे, गजानन सोनोने, गणेश पावसाळे, विनोद मापारी, दिलीप भरणे, संजय झाडोकार, धनंजय धबाले, रवी दुतोंडे, कृष्णा पांडे, सुरेंद्र चव्हाण, मनोज साहू, हर्ष चौधरी, राजेश खेडकर यांच्यासह महानगर पदाधिकारी, मंडळ पदाधिकारी व नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. काँग्रेसने या वक्तव्याबाबत खुलासा करावा व महाराष्ट्राच्या जनतेची माफी मागावी, अशी मागणी यावेळी भाजप पदाधिकाऱ्यांनी केली.

# प्रकरणे निकाली काढण्यात दहीहंडा पोलीस ठाणे अव्वल

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट पोलीस उपविभागांतर्गत येणाऱ्या दहीहंडा पोलीस ठाण्याने प्रलंबित गुन्हे निकाली काढण्याच्या मोहिमेत उल्लेखनीय यश संपादन करत उपविभागात अव्वल स्थान पटकावले आहे. डिसेंबर २०२५ पासून प्रलंबित असलेल्या (भाग १ ते ५) प्रकरणांचा प्रभावी निपटारा करून ठाण्याने उत्कृष्ट कार्याचा ठसा उमटवला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक गोपाल ढोले यांनी पदभार स्वीकारल्यानंतर प्रलंबित गुन्ह्यांचा सखोल आढावा घेत तपास प्रक्रियेला गती दिली. वेळेचे काटेकोर नियोजन, पुराव्यांचे बारकाईने संकलन, साक्षीदारांचे जबाब नोंदविणे आणि अधिकारी-अंमलदारांमध्ये योग्य समन्वय साधत तपास कार्य प्रभावीपणे राबविण्यात आले.

याचबरोबर परिसरात वाढत असलेल्या अवैध दारू विक्री, हातभट्टी निर्मिती, जुगार अड्डे तसेच मटका व्यवसायावर धडक कारवाया करण्यात आल्या. नियमित छापे टाकून गुन्हेगारांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली. या कारवायांमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये दहशत निर्माण झाली असून सामाजिक शांतता व सुव्यवस्था राखण्यास मोठी मदत झाली आहे.

या उल्लेखनीय कामगिरीची अकोट उपविभाग स्तरावर विशेष दखल घेण्यात आली असून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून गोपाल ढोले यांच्या कार्याचे कौतुक करण्यात येत आहे. प्रलंबित प्रकरणांचा निपटारा आणि अवैध व्यवसायांवर नियंत्रण यामुळे नागरिकांचा पोलीस प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.



'दहीहंडा पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे तपास कामांना वेग देता आला. टीमवर्कमुळेच ही कामगिरी शक्य झाली. यापुढेही परिसरात शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यावर भर राहील'.

**ठाणेदार गोपाल ढोले**
दहीहंडा पोलिस स्टेशन



उन्हाळ्याची चाहूल लागताच रानमळावर पानगळ झालेल्या पळसाच्या झाडांनी केसरी फुलांची उधळण करत निसर्गाला अग्निरंगाची झळाळी दिली आहे.
**छाया :** स्वप्निल सरकटे

# महाशिवरात्री निमित्त खा. अनुप धोत्रे यांचा राजराजेश्वर मंदिरात महाअभिषेक

■ प्रतिनिधी | अकोला ■



महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त अकोला जिल्ह्यातील शेतकरी, कामगार, मातृशक्ती, युवाशक्ती, व्यापारी, उद्योजक, चाकरमानी तसेच ज्येष्ठ नागरिक यांच्या आरोग्यसंपन्न व सुखी जीवनासाठी आज अकोल्यातील राज राजेश्वर मंदिर येथे विशेष महाअभिषेक करण्यात आला. अकोल्याचे खासदार अनुप धोत्रे व समीक्षा धोत्रे यांच्या हस्ते भगवान महादेवाला साखळी अर्पण करून विधिवत पूजन करण्यात आले.

यावेळी अकोला शहरासह जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच यावर्षी कोणतीही नैसर्गिक आपत्ती ओढवू नये, अशी प्रार्थना करण्यात आली. अकोला लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक नागरिकांवर ग्रामदैवत राजराजेश्वराची कृपादृष्टी राहावी, अशी भावना व्यक्त करण्यात आली.देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने आर्थिक व इतर सर्व क्षेत्रांत आघाडीवर यावे तसेच राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती मिळावी, अशीही प्रार्थना करण्यात आली.

अकोला महानगरपालिका तसेच जिल्ह्यातील नगरपालिकांमधील विकासकामांना चालना मिळून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विशेष मागणी करण्यात आली. महाशिवरात्री निमित्त खासदार धोत्रे यांनी जिल्ह्यातील ४२ महादेव मंदिरांना भेट देत धर्म, संस्कृती आणि परंपरेला नमन केले. विविध मंदिरांमध्ये दर्शन घेऊन त्यांनी भाविकांची भेट घेतली व संवाद साधला. धार्मिक वातावरणात भक्तिभावाने हा कार्यक्रम पार पडला.

# कत्तलीच्या उद्देशाने नेत असलेले चार गोवंशीय बैलांची सुटका; दोघांना अटक

■ प्रतिनिधी | बोरगाव मंजू ■



कत्तल करण्याच्या उद्देशाने निर्दयतेने बांधून व मारहाण करून नेत असलेल्या चार गोवंशीय बैलांची बोरगाव मंजू पोलिसांनी धाडसी कारवाई करत सुटका केली. या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली असून आणखी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोरगाव मंजू पोलीस ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, दोन इसम ग्राम धोतर्डी मार्गे बोरगाव मंजूकडे चार बैल हाकलत नेत आहेत. सदर बैल कत्तलीसाठी नेले जात असल्याची खात्रीलायक माहिती मिळताच पोलिसांनी पंचांसह तत्काळ कारवाई केली.

रेल्वे बोगद्याजवळ सापळा रचून पाहणी केली असता दोन इसम चार गोवंशीय बैलांना एकमेकांना घट्ट दोरीने बांधून, मानेला आखूड दोरी लावून मारहाण करीत नेत असल्याचे आढळले. पोलिसांनी त्यांना थांबवून चौकशी केली असता त्यांनी आपली नावे शेख आवेस शेख युनूस (वय २०, रा. अन्वी मिर्झापूर) व प्रमोद रामकृष्ण चाहाटे (वय ४२, रा. अन्वी मिर्झापूर, ता. जि. अकोला) अशी सांगितली. चौकशीत त्यांनी हे बैल बोरगाव मंजू येथील रहीम कुरेशी व सज्जु उर्फ सद्दाम कुरेशी यांच्या सांगण्यावरून कत्तलीसाठी आणत असल्याचे कबूल केले. पोलिसांनी चारही बैल व दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. सुटका करण्यात आलेल्या बैलांमध्ये एक भुरकट रंगाचा (वय अंदाजे ८ वर्षे), एक पांढऱ्या रंगाचा मोठ्या शिंगांचा (वय अंदाजे १२ वर्षे), एक लाल रंगाचा लहान शिंगांचा (वय अंदाजे १० वर्षे) आणि एक भुरकट रंगाचा (वय अंदाजे १२ वर्षे) यांचा समावेश आहे. चारही बैलांची एकूण अंदाजित किंमत सुमारे १ लाख ६५ हजार रुपये आहे. आरोपींनी बैलांना निर्दयतेने मारहाण करून एकमेकांना घट्ट बांधून कत्तलीच्या उद्देशाने नेत असल्याने त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारित १९९५) मधील कलम ५ (अ), (ब), ९ तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० च्या कलम ११ (क) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कॉन्स्टेबल शेखर कोद्रे यांच्या फिर्यादीवरून चार आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज उघडे करीत आहेत. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनिल गोपाळ, पोलीस उपनिरीक्षक मनोज उघडे, ज्ञानेश्वर लांडे, पोलीस अंमलदार शेखर कोद्रे, अक्षय देशमुख तसेच होमगार्ड रामहरी नागे यांनी केली.

## बोरगाव मंजू पोलिसांची कारवाई

# कार्ला येथे दिव्यांग रुग्णाला आर्थिक मदत

## निलेश कापकर यांची सामाजिक बांधिलकी



■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील कार्ला येथील प्रवीण दिनकर तायडे हे गेल्या चार–पाच वर्षांपासून आलेल्या अपंगत्वामुळे खाटेवर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मात्र दीर्घकालीन आजारपणामुळे त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची बनली आहे. या कठीण प्रसंगी आलेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांनी मदतीचा हात पुढे केला.

कापकर यांनी तायडे कुटुंबाला सात हजार रुपयांची रोख मदत देत त्यांना मानसिक आधार दिला. पुढील उपचारासाठीही आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. त्यांच्या या मदतीमुळे तायडे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

निलेश कापकर हे परिसरात गरजू, आजारी व दुर्बल घटकांना तत्परतेने मदत करणारे कार्यकर्ते म्हणून परिचित आहेत. कोणतीही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता ते सातत्याने सामाजिक कार्य करत असल्याने नागरिकांकडून त्यांच्याबद्दल आदर व्यक्त करण्यात येत आहे.

यावेळी बालू बगाडे, राजेश काळपांडे, रामा राखोंडे, गोपाल इंगळे, मोहन बंड, उगले आदी उपस्थित होते. तायडे यांच्या पुढील उपचारासाठी आवश्यक मदत उभारण्याचा निर्धारही उपस्थितांनी व्यक्त केला.

# राणी सती धाम येथे अर्धनारीनटेश्वर झाकी

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानीय राणी सती धाम येथे पावन महाशिवरात्री निमित्त अर्धनारीनटेश्वर झाकी साकार करण्यात आली. शिवलिंगाला अनेक साहित्यांच्या द्वारे सजविण्यात येऊन छपन्न भोग मांडण्यात आला.आतापर्यंत धाम मध्ये शिवभक्त व शिव संध्या आरती मंडळच्या सौ आकांक्षा सागर पनपालिया यांनी अनेक झाक्या साकार केल्या होत्या.

# देशमुख महिला मंडळाकडून मनपा शाळेला लेझिम संच भेट

■ प्रतिनिधी | अकोला ■



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सामाजिक बांधिलकी जपत देशमुख महिला मंडळाने स्तुत्य उपक्रम राबविला. मंडळाच्या वतीने पीएम श्री मनपा सेमी इंग्रजी मुलांची शाळा क्र. ७, रामदास पेठ, अकोला या शाळेस सुमारे पाच हजार रुपये किंमतीचा लेझिम संच भेट देण्यात आला.

मंडळाच्या अध्यक्षा सौ. राजश्री देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तसेच कांजीवरम ग्रुपच्या ग्रुप लीडर सौ. स्नेहल देशमुख व सर्व सदस्यांच्या सहकार्याने हा उपक्रम पार पडला. कार्यक्रमाला नगरसेवक आशिष पवित्रकार, मनपा शिक्षणाधिकारी हरीशचंद्र इटकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भीमराव डोंगरे व उपाध्यक्ष राजेश गावंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते लेझिम संचाचे औपचारिक प्रदान करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी देशमुख महिला मंडळाच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. लेझिम हा महाराष्ट्राचा पारंपरिक व्यायाम प्रकार असून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता, संघभावना व शारीरिक तंदुरुस्ती वाढविण्यास तो उपयुक्त ठरतो. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक, सांस्कृतिक व मानसिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. देशमुख महिला मंडळाच्या कार्यकारिणीत उपाध्यक्षा सौ. नयना देशमुख, सचिव सौ. स्वप्नाली देशमुख, कोषाध्यक्ष सौ. प्रतिभा देशमुख, सह-कोषाध्यक्ष सौ. सीमा देशमुख, ज्येष्ठ सल्लागार सौ. कविता ढोरे व माजी अध्यक्षा सौ. कल्पना देशमुख यांचा समावेश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नयना गोटे यांनी केले, तर आभार सौ. अनिता नवलकर यांनी मानले.

**जाहीर नोटीस**

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५५/२०२६ — प्रोसेस नं.१५०५/२०२६

चौ.ता. १६/०३/२०२६ — दिनांक : ०३/०२/२०२६

**अर्जदार :** १. अजय प्रकाश मेश्राम रा. वॉटर सप्लाय जवळ, हिंगणा रोड, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. २. प्रिती, संजय गेडाम ३. हर्षा विठ्ठल गेडाम अर्जदार क. २ व ३ रा. विठ्ठल नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. प्रकाश मोतीराम मेश्राम २. शोभाबाई प्रकाश मेश्राम

**पत्ता :-** रा. हिंगणा रोड, वॉटर सप्लाय जवळ, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रकाश मोतीराम मेश्राम यांचे दि. ३०/०४/१९९७ रोजी रेल्वे लाइन, गुडधी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत शोभाबाई प्रकाश मेश्राम यांचे दि. २१/०८/२०१३ रोजी लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०३/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/०२/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४५/२०२६ — प्रोसेस नं.१२५२/२०२६

चौ.ता. ०७/०३/२०२६ — दिनांक : ३०/०१/२०२६

**अर्जदार :** १. रविंद्र हरिलाल टहलरामानी २. योगेश हरिलाल टहलरामानी दोघेही रा. सिंधी कॅम्प, पक्की खोली, अकोला. ता. जि. अकोला. ३ सौ. भावना मनोहर हिरानी उर्फ रेखा हरिलाल टहलरामानी रा. ३०३, श्री चिंतामण को ऑप हाउसिंग सोसायटी, कर्वे रोड, भावे हॉल जवळ, डोंबिवली वेस्ट, विष्णुनगर, ठाणे. ४२१२०२ ४. सौ. जानवी प्रकाश चेलानी उर्फ सुषमा हरिलाल टहलरामानी रा. ५१८, नटराज टॉकिज रोड जवळ, भोसला वडशाळा, महाल, नागपूर ४४००३२

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्री हरिलाल मुलचंद टहलरामानी २. सौ. कमलाबाई हरिलाल टहलरामानी

**पत्ता :-** रा. सिंधी कॅम्प, पक्की खोली, अकोला. ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री हरिलाल मुलचंद टहलरामानी यांचे दि. २३/०६/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले. तसेच मयत सौ. कमलाबाई हरिलाल टहलरामानी यांचे दि.२७/०४/२०१३ रोजी निधन झाले आहे.

अर्जामध्ये पूढे असेही नमूद आहे की सदरहू मयत हरिलाल मुलचंद टहलरामानी यांचे नावे काही शेअर्स खरेदी केले होते. जे अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. अकोला सी. डी. एस. एल. ३५८०० यांच्याकडे असलेल्या डि.मॅट खात्यात अजूनही त्यांच्या नावाने आहेत. मयत हरिलाल मुलचंद टहलरामानी यांच्याकडील शेअर्सचे होल्डिंग स्टेटमेंट खालीलप्रमाणे. सदरहू रकमेचा लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांचे शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी.आज दिनांक ३०/०१/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# चतारी ग्रामीण रुग्णालय दुरुस्तीसाठी ७४ लाख मंजूर

- सामाजिक कार्यकर्ते विकास कीर्तने यांच्या पाठपुराव्याला यश
- प्रशासकीय मंजुरीनंतर कामाला सुरुवात




■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील चतारी येथील ग्रामीण रुग्णालयाची जीर्ण व धोकादायक झालेली इमारत दुरुस्त करण्यासाठी ७४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सामाजिक कार्यकर्ते विकास कीर्तने यांनी याबाबत संबंधित विभागाकडे तक्रार करून सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.


जनमाध्यम
चतारी ग्रामीण रुग्णालयाची इमारत धोकादायक
४० वर्षांची जीर्ण वास्तू; रुग्णांच्या जीवाला धोका
■ नासीर शेख ■

चतारी ग्रामीण रुग्णालयाच्या इमारतीची अवस्था अत्यंत जीर्ण झाली असून, रुग्ण व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या संदर्भातील वृत्त २५ जानेवारी रोजी दैनिक जनमाध्यममध्ये प्रसिद्ध होताच प्रशासन खडबडून जागे झाले. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने पाहणी करून दुरुस्तीचा अंदाजपत्रक तयार केले.

सदर दुरुस्तीकरिता ७४ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आला आहे. मंजुरी मिळताच प्रत्यक्ष दुरुस्तीच्या कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

दरम्यान, संपूर्ण रुग्णालयासाठी नवीन स्वतंत्र इमारतीचा प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया देखील सुरू करण्यात आली आहे. हा प्रस्ताव लवकरच राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. चतारी ग्रामीण रुग्णालयातून पातूर तालुक्यातील दुर्गम भागातील अनेक रुग्ण उपचार घेतात. दुरुस्तीचा निधी मंजूर झाल्याने ग्रामीण आरोग्यसेवेला बळकटी मिळणार असून रुग्ण तसेच वैद्यकीय कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. सामाजिक कार्यकर्ते विकास कीर्तने यांच्या पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ७९**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# ‘संत नामदेव’ ग्रंथाचे भक्तिमय वातावरणात भव्य विमोचन

## -अध्यात्माची ज्योत, मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधीः-** संतपरंपरेचा दिव्य वारसा जपणाऱ्या आणि समाजमनात अध्यात्माची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या संत नामदेव बाबा (गणोरीकर) यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर आधारित ‘संत नामदेव’ या बहुप्रतिक्षित ग्रंथाचा भव्य विमोचन सोहळा आज (दि.१५) अमरावती येथे अत्यंत उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. शहरातील संतभक्त, साहित्यप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मंगल सोहळ्याची शोभा वाढवली.

नवाथे चौक, नंदा मोटर्स समोर येथील नामदेव महाराज समाधी मंदिर येथे सकाळी ठीक ९ वाजता वेदमंत्रांच्या घोषात आणि पारंपरिक विधीनुसार सोळस पूजेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मंदिर परिसरात मंत्रोच्चार, टाळ-मृदंगाचा निनाद आणि भक्तांच्या जयघोषामुळे वातावरण पूर्णतः आध्यात्मिक रंगात न्हाऊन निघाले होते. उपस्थित भाविकांनी संत नामदेव बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. दुपारी ३ वाजता प्रमुख मान्यवरांच्या हस्ते ग्रंथाचे औपचारिक विमोचन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून विलास इंगोले, संस्थेचे अध्यक्ष मुकेश इंगोले, प्रदीप त्र्यंबकराव चौधरी, वंदनाताई प्रदीपजी चौधरी, संजय रा. महल्ले, अरविंद उतखेडे, रावसाहेब यादगिरे, नितीन मोहोड, दामोदर भुजाडे,



सुनील मानकर, प्रणव वैद्य, भरत देशमुख, गजानन अरबट, गोपाळ पुसतकर, विशाल देशमुख तसेच अवंतिका व सुकृत प्रदीपजी चौधरी यांची उपस्थिती लाभली.

यावेळी संत दत्तगिरी महाराज, संत मोहनगिरी महाराज, किशोर तायडे महाराज तसेच संत नामदेव महाराजांच्या सहवासाचा लाभ घेतलेले श्री. सदाशिवराव मोडक यांचे आशीर्वाद लाभले.

संतांच्या कार्याचे स्मरण करत मान्यवरांनी आपल्या मनोगतात संत नामदेव बाबा यांच्या साधेपणाचे, समाजसेवेचे आणि अध्यात्मिक मार्गदर्शनाचे विशेष कौतुक केले. त्यांच्या कार्यामुळे असंख्य भाविकांना जीवनदिशा मिळाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.



**ग्रंथाचे वैशिष्ट्य-**

या ग्रंथाच्या लेखिका देवयानी सुनिल मानकर (एम.ए. अर्थशास्त्र व मराठी), रविनगर, अमरावती यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि भावपूर्ण शैलीत संत नामदेव बाबा यांच्या जीवनप्रवासाचे चित्रण केले आहे. त्यांच्या साधना, अध्यात्मिक साधेपणा, समाजकार्य, लोकांशी असलेला आत्मीय संवाद आणि सहवासातील प्रेरणादायी प्रसंगांचे सविस्तर वर्णन पुस्तकात करण्यात आले आहे. ग्रंथामध्ये संतांच्या विचारांची मांडणी करताना पुढील पिढ्यांना मार्गदर्शन मिळावे, हा मुख्य हेतू स्पष्ट दिसून येतो. संतांच्या कार्याचा आणि तत्वज्ञानाचा ठेवा जतन करून तो समाजापर्यंत पोहोचविण्याचा हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न असल्याचे मान्यवरांनी नमूद केले.

विमोचनानंतर दुपारी ३ वाजता मंदिर परिसरात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. या पत्रकार परिषदेत ग्रंथाच्या लेखन प्रक्रियेविषयी, संदर्भसंकलन, संत नामदेव बाबा यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण टप्पे आणि पुढील उपक्रमांविषयी माहिती देण्यात आली. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना लेखिका व मान्यवरांनी सविस्तर उत्तरे दिली. नामदेव महाराज संस्थानच्या वतीने कार्यक्रमाचे नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध आयोजन करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रमात भक्तिभाव, शिस्त आणि उत्साह यांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. संतभक्त, साहित्यप्रेमी, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची वर्दळ होती. अनेकांनी ग्रंथ खरेदी करून लेखिकेकडून स्वाक्षरीही घेतली.

अध्यात्म, संस्कृती आणि साहित्य यांचा संगम घडवून आणणारा हा सोहळा अमरावतीकरांसाठी अविस्मरणीय ठरला. संत नामदेव बाबा यांच्या कार्याची प्रेरणा समाजमनात दीर्घकाळ जागृत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रम भक्तिमय वातावरणात आणि समाधानाच्या भावनेने संपन्न झाला.

# धारणी येथे पंचायत समिती इमारतीचे भव्य भूमिपूजन

## ‘मेळघाटच्या शेवटच्या टोकापर्यंत विकास’-आ.केवलराम काळे

**धारणी/प्रतिनिधीः-** मेळघाटच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या पंचायत समिती प्रशासकीय इमारतीचे तसेच तलई रोड बांधकामाचे भूमिपूजन शुक्रवारी, १३ फेब्रुवारी रोजी उत्साहात संपन्न झाले. तहसील कार्यालय प्रशासकीय इमारतीच्या बाजूला आयोजित कार्यक्रमात मेळघाट क्षेत्राचे आमदार केवलराम काळे यांच्या हस्ते विधीवत भूमिपूजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात पूजन व मंत्रोच्चाराने झाली. आमदार काळे यांनी विकासाचे प्रतीक म्हणून कुदळ मारून इमारतीच्या बांधकामाची अधिकृत सुरुवात केली. यावेळी



बोलताना त्यांनी मेळघाटातील शहरी भागापासून ते दुर्गम ग्रामीण भागापर्यंत विकासकामे सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त केला. ‘मेळघाटच्या शेवटच्या टोकापर्यंत विकास पोहोचविणे हेच आमचे ध्येय आहे,’ असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी धारणी नगरपंचायतचे अध्यक्ष सुनील चौथमल, माजी आमदार तथा भाजपा जिल्हाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, रमेश मावस्कर, रेखा मावस्कर, क्षमा चौकसे, आमदारांचे स्वीय सहाय्यक राहुल सोनोने, जया खंडारे, दुर्गा बिसंदरे तसेच नगरसेवक प्रतिक मालविय, शैलेष म्हाला, सुनंदा भिलावेकर, उत्तम मोडक, हिरालाल मावस्कर, वृषभ घाडगे आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर प्रशासकीय इमारत पूर्ण झाल्यानंतर पंचायत समितीचे कामकाज अधिक सुलभ व परिणामकारक होणार असून विविध शासकीय योजना व सेवा नागरिकांपर्यंत अधिक वेगाने पोहोचण्यास मदत होणार आहे. मेळघाटच्या विकासासाठी हा एक ऐतिहासिक टप्पा ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. ‘मेळघाट विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात’ या घोषवाक्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

# आयुष संशोधनासाठी डॉ.अनिल बोंडे यांचा प्रभावी पाठपुरावा

## राज्यसभेत प्रश्न उपस्थित; देशभरात ३४ संशोधन प्रकल्पांना गती

**अमरावती/प्रतिनिधीः-** आयुष क्षेत्रातील संशोधन, नवोन्मेष आणि वैज्ञानिक अधिष्ठान यांना चालना देण्यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी राज्यसभेत प्रभावी भूमिका बजावली. त्यांच्या प्रश्नामुळे आयुष मंत्रालयाकडील आयुर्ज्ञान योजनेअंतर्गत सुरू असलेल्या संशोधन कार्याचा सविस्तर आढावा सभागृहासमोर आला. डॉ. बोंडे यांनी राज्यसभेत तारांकित प्रश्न क्रमांक १११ उपस्थित करून, एक्स्ट्रा म्युरल रिसर्च (EMR) योजनेअंतर्गत मंजूर संशोधन प्रकल्पांची संख्या, त्यांचे प्रत्यक्ष परिणाम, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रकाशने तसेच आयुष मनुष्यबळ प्रशिक्षणाबाबत सरकारची प्रगती जाणून घेतली.या प्रश्नाला उत्तर देताना आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी सांगितले की, डिसेंबर २०२५ पर्यंत देशभरात ३४ आयुष संशोधन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून, ६२ संशोधन लेख आंतरराष्ट्रीय वैज्ञानिक नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. डॉ. बोंडे यांनी आयुष पद्धती केवळ परंपरेपुरत्या मर्यादित न राहता वैज्ञानिक चाचण्या, पुरावाधारित संशोधन आणि जागतिक स्वीकारार्हता मिळवणे गरजेचे असल्याचे सातत्याने अधोरेखित केले आहे. त्यांच्या पुढाकारामुळे आयुर्वेद, योग, सिद्ध, यूनानी व होमिओपॅथी क्षेत्रातील संशोधनाला नवी दिशा मिळत असल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, स्थापत्य अभियांत्रिक विभाग, शिवाजी नगर, विभाग नियंत्रक (विभागीय अभियंता) कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**
**ई-मेल** Address-destamravati@gmail.com (**स्वच्छता निविदा सूचना** क्र.१६/२०२५-२६)

राज्य परिवहन महामंडळाच्या अमरावती विभागातील खालील बसस्थानकाची स्वच्छता कंत्राटी पध्दतीने एक वर्षाच्या कालावधीसाठी करण्याकरीता अनुभवी व्यक्ती पंजीकृत संस्थेकडून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

१) व्यक्ती/संस्था कंत्राटी कामगार कायदा १९७० (नियम व निर्मुलन कायदा) नुसार नोंदणीकृत/परवाना धारक आहेत. व सेवासंस्था कायद्यातील तरतुदीचे उदा.किमान वेतन कायदा भ.नि.नि.व संकीर्ण अंतर्गत नोंदल्या आहेत. त्यांना निविदा प्रपत्रे देण्यात येतील.
२) गेल्या तीन वर्षाच्या कालावधीत रा.प.महामंडळाच्या स्वच्छता कामाचा करारनामा भंग केला असेल अशा संस्थांनी प्रक्रियेसाठी अर्ज करु नये, त्यांची निविदा स्विकारली जाणार नाही.
३) ज्या संस्थेस स्वच्छतेचे काम मिळेल त्या संस्थेने संबंधितांशी चर्चा करुन ट्री गार्डसह किमान दोन झाडे संगोपनासह लावून जगविण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
४) पोलीस अधीक्षकाने चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक आहे.
५) ज्या व्यक्ती/संस्थांना स्वच्छता व साफसफाई आणि वरील तरतुदीनुसार काम करण्याचा अनुभव आहे, त्यांना वरील नियमांच्या अंतर्गत निविदा देण्यात येईल.
६) पॅनकार्ड/जी.एस.टी. पत्राची छायांकित प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील.
७) संस्थेकडे आय.एस.ओ.प्रमाणपत्र, प्रोफेशन टॅक्स व ई.एस.आय.प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
८) सशर्त निविदा स्विकारण्यात येणार नाही.

**बसस्थानकाचे नांव -**
१. अमरावती, २. मोर्शी, ३. परतवाडा, ४. दर्यापूर, ५. वरुड, ६. चांदूर रेल्वे, ७. चांदूर बाजार, ८. बडनेरा, ९. धामणगांव रेल्वे, १०. तिवसा, ११. धारणी, १२. चिखलदरा, १३. कुऱ्हा, १४. अंजनगांव सुर्जी, १५.राजापेठ, १६. मोझरी, १७. वलगांव, १८. राजुरा बाजार.

**कामाचे तपशील -**
१) दररोज बसस्थानकाची ईमारत/वाहन तळ झाडणे,
२) कचऱ्याची विल्हेवाट लावणे
३) रोज फरशी पोझा करणे, महिन्यातून एकवेळा संपूर्ण बसस्थानकाची ईमारत धुणे
४) भिंती, खिडक्या, सिलिंग स्वच्छ करणे, पाण्याच्या टाक्या स्वच्छ करणे
५) पावसाळ्यापुर्वी व पावसाळ्यानंतर तसेच आवश्यकतेनुसार टेरेस, गटारे, चेम्बर्स साफ करणे
६) टाकी उपसून घेणे
७) आगार प्रमुख/बसस्थानक प्रमुख यांचे आदेशाने ऐनवेळी येणारी स्वच्छतेची कामे इ. बाबी विहीत वेळेत करुन घ्यावयाची असून त्याबदल्यात दरमहा विशिष्ट रक्कम महामंडळातर्फे संस्थेस देण्यात येईल. काम न झाल्यास अथवा कमी प्रतवारीचे झाल्याने दंड आकारणी करणे अथवा करार रद्द करण्याची तरतुद महामंडळाकडे राहील.

निविदा संच कार्यालयीन कामाच्या दिवशी दि.१६.०२.२०२६ ते ०६.०३.२०२६ सार्वजनिक सुटट्या/शनिवार, रविवार सोडून सकाळी १० ते १५ वाजेपर्यंत मिळू शकेल.

सर्व कामासाठी प्रत्येक निविदा संचाची किंमत (१००० + वस्तू व सेवा कर रु.१८०) अशी एकूण रु.११८०/- (अक्षरी एक हजार एकशे ऐंशी रुपये मात्र) एवढी राहील. निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक ०६.०३.२०२६ दुपारी १५.०० वा. निविदा उघडण्याची दिनांक ०६.०३.२०२६ (दुपारी १६.०० वा.) शक्य झाल्यास.

**सुरक्षा रक्कम-**
जी रक्कम स्विकारण्यात येईल त्यातील एक महिन्याच्या देयकांची रक्कम (करारनामा करतेवेळी) भरावी लागेल. अनामत रक्कम (E.M.D.) सर्व कामागासाठी प्रत्येकी रु.२०००/- (अक्षरी दोन हजार फक्त) रकमेचे मूळ पावती निविदेसोबत जोडावी.

(**टिप -** एक अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार व हक्क रा.प.महामंडळाकडून राखून ठेवण्यात आलेलापोस्टाद्वारे पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच कराराचा कालावधी कमी-अधिक करण्याचा हक्क महामंडळाकडे अबाधित राहील.)

**जा.क्र.** राप/विनि/अम/स्थापत्य/निविदा/स्वच्छता/६३
विभाग नियंत्रक यांचे कार्यालय
रा.प.अमरावती विभाग, अमरावती
**दिनांक ०४.०२.२०२६**

**स्वाक्षरी/-**
**विभाग नियंत्रक,**
**राज्य परिवहन, अमरावती**

**एसटीचा प्रवास, राज्याचा विकास**

# श्री हव्याप्र मंडळाने साधली योग-शक्ती


## ४ थी राष्ट्रीय योगासन स्पर्धा : शिवकालीन शस्त्र प्रदर्शनी

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय पारंपारीक ज्ञान, क्रीडा संस्कृतीचा अविरत वारसा जोपासणाऱ्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे नुकताच ४ थी राष्ट्रीय योगासन स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत देशभरातील योगपटूंनी सहभाग घेतला होता. सर्वच वयोगटात मध्ये पार पडलेल्या या राष्ट्रीय योगासन स्पर्धेचे वैशिष्ट ठरले ते शिवकालीन शस्त्र प्रदर्शनीचे. ३०० पेक्षा अधिक शिवकालीन शस्त्रांची प्रदर्शन आणि योगपटूंच्या उपस्थितीमुळे योगशक्ती चा संयोग स्फुरण चढविणारे ठरले.






श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन महाविद्यालयाच्या योग विभाग व बृहन महाराष्ट्र योग परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत या राष्ट्रीय योगासन स्पर्धेत ४०० पेक्षा अधिक योगपटूंनी सहभाग घेतला होता. वय ६ ते ५५ पर्यंत असा स्पर्धकांचा सहभाग होता. सकाळी ७ ते सायंकाळी ६ वा. पर्यंत आयोजीत या स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ११.३० वाजता करण्यात आले. डिसीपीई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली व्यासपीठावर उद्घाटक म्हणून वरिष्ठ पत्रकार वैभव चिंचाळकर, कृष्णा लोखंडे यांचे सह माजी प्राचार्य व वरिष्ठ योगगुरू डॉ. अरुण खोडस्कर, योग विभागाचे प्रमुख डॉ. सुनील



लाबडे, जेष्ठ योग पट्टू आनंद हिवराळे, नितिन काळे, डॉ वशिष्ट खोडसकर आदी मान्यवर उपस्थित होते.

दिपप्रज्वलन व महर्षि पतंजलि प्रतिमा पुजनासह उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी कार्यक्रमाला मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांनी योग संस्कृती आत्मसात करीत त्याचा प्रचार प्रसार देशभर करा असे आवाहन केले. उद्घाटक पत्रकार वैभव चिंचाळकर यांनी सर्व स्पर्धकांना शुभच्छा देत भारतीय संस्कृतीचा वसा अविरत जोपासा असे आवाहन केले तर पत्रकार कृष्णा लोखंडे यांनी योग आणि शस्त्र प्रदर्शनीद्वारे योगशक्तीचा सुंदर मिलाप झाल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक योगगुरू डॉ.अरूण खोडस्कर यांनी केले. संचालन डॉ. अर्चना देशपांडे तर आभार प्रा. सुष्मा शिरभाते यांनी मानले.

**इतिहासाची साक्ष देणारी शस्त्र प्रदर्शनी-**

४ थी राष्ट्रीय योग स्पर्धेचे औचित्य साधून मंडळाचे योग विभाग व स्वराज्य सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यामाने इतिहासाची साक्ष देणारी शस्त्र प्रदर्शनी लक्षवेधी ठरली. ३०० पेक्षा अधिक विविध शिवकालीन शस्त्र पाहतांना छत्रपती शिवाजी महाराज व स्वराज्याचा अभिमान प्रत्येकाच्या ठायी झळकत होता. योग स्पर्धा उद्घाटन पूर्वी मान्यवरांच्याहस्ते शस्त्र प्रदर्शनीचे उद्घाटन पार पडले. स्वराज्य सेवा प्रतिष्ठान चे प्रा. प्रतिक पाथरे यांनी मान्यवरांना शिवकालीन शस्त्रे व त्याचा उपयोग असे बारकावे समजून सांगितले. यावेळी पत्रकार कृष्णा लोखंडे, पत्रकार वैभव चिंचाळकर, प्राचार्य श्रीनिवास देशपांडे, डॉ. सुनील लाबडे सह अनेक नागरीकांनी विविध शस्त्रांची माहिती त्यांचा उपयोग आदी माहिती जाणून घेतली.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १६१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**जाहीर नोटीस**

माझे पक्षकार **१.झुबेर इंजिनियरिंग वर्क्स तर्फे प्रो. मोहम्मद आशिक मोहम्मद इस्माईल, २. मोहम्मद आशिक मोहम्मद इस्माईल ३. फरजाना बानो मोहम्मद आशिक ४. मोहम्मद सलमान मोहम्मद आशिक** सर्व रा. अनसार नगर, अमरावती ता. जि. अमरावती यांनी दिलेल्या माहिती व अधिकारा वरुन संपूर्ण जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी १. ईकबाल अहमद एजाज अहमद आधार क्र.२०४९६४३९२२४६ २. शहेदा परवीन इकबाल अहेमद आधार क्र. ९८८२५६२०९८१५ ३. अरशान अहेमद ईकबाल अहेमद आधार क्र.५४९८२२१०६४८२ ४. शोएब अहेमद इकबाल अहेमद आधार क्र. ३५३५६७५८२६३० सर्व रा. चपराशीपुरा, कॅम्प अमरावती यांच्या सोबत त्यांच्या मालकी व ताब्यातील शेत तसेच त्यामधील असलेले विहीर, संत्राच्या झाडासहित व मकान, बोरवेल तदंगभुत वस्तूसह व इतर झाडाझुडपा सह एकत्रितरीत्या विकत घेण्याचा सौदा केला असून त्या मिळकतीचे वर्णन येणे प्रमाणे :- शेतीचे वर्णन खालीलप्रमाणे. मौजे - ममदापूर (काटपूर), प्र.ता.पो.ता. मोर्शी जि.अमरावती. येथील ग्रामपंचायत कक्षेतील शेत सर्वे / गट क्र.२८७/१, क्षेत्रफळ १.११ हे. आर., शेत सर्वे / गट क्र.२८७/२, क्षेत्रफळ १.१० हे. आर.शेत सर्वे / गट क्र.२८७/३,क्षेत्रफळ १.११ हे. आर.शेत सर्वे / गट क्र.२८७/४,क्षेत्रफळ १.१० हे. आर. असे एकूण क्षेत्रफळ ४ हे ४२ आर (११ एकर २ आर) भो. वर्ग १, आ.की. रु.५.७५ पैसे असून हि शेतजमीन विहीर, संत्राच्या झाडासहित व मकान, वोरवेल तदंगभुत वस्तूसह व इतर झाडाझुडपासह, विकण्याचा सौदा केला असून याची चतुःसीमा खालील प्रमाणे :

**पूर्वेस : नाला** **पश्चिमेस : लक्ष्मण सरजूसे यांचे शेत**
**उत्तरेस : सरकारी रोड** **दक्षिणेस : नाला**

येणे प्रमाणे वरील चतुःसिमेतील शेतजमीन विहीर, संत्राच्या झाडासहित व मकान, वोरवेल तदंगभुतवस्तूसह व इतर झाडाझुडपासह, या शेतमालमत्ते बाबत माझे पक्षकार यांनी या मिळकतीचे वर नमूद मालकांसोबत इसार सौदा केलेला असून करारात ठरल्याप्रमाणे सदरचे शेत मालमत्तेबाबत पुढील काहीच दिवसामध्ये माझे पक्षकार हे स्वता किंवा ते सांगतील त्यांचे नावे खरेदी करार करणार आहेत.

करीता या द्वारे संपूर्ण जनतेस सूचित करण्यात येते की, सदहू मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, मालकी,गहाणं, बोझा, वारसाहक्क, जप्ती, कर्ज, ताबा अथवा कोणत्याही कुठल्याही प्रकारचा अधिकार असल्यास नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०५ (पाच) दिवसाचे आत पूर्ण लेखी दस्ताऐवजी पुराव्यांसह माझ्या खालील पत्त्यावर, माझेशी संपर्क साधावा. सदर मुदतीनंतर माझे पक्षकार कराराप्रमाणे वरील मिळकती रितसर नोंदणीकृत खरेदी करून घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही तसेच होणाऱ्या परिणामास माझे पक्षकार जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

याकरीता नोटीस प्रसिद्धीस सादर.

**ॲड. सागर द. अंजीकर**
**ऑफिस पत्ताः ‘शांताई’, भूमिपुत्र कॉलनी,**
**काँग्रेस नगर जवळ, अमरावती, ता. जि. अमरावती.**
**मो. क्र.९४२३४२६०८९ / ७०२०३८०११९**

**जाहीर नोटीस**

माझे पक्षकार श्री जनार्दन रामराव पडोळे,रा. पुसदा, ता. जि. अमरावती यांनी मला दिलेल्या माहिती व अधिकारावरून मीपुढीलप्रमाणे सार्वत्रिक जाहीर सूचना संपूर्ण लोकांना देण्यात येत आहे की,मौजे पुसदा भाग-२, ता. अमरावती, जि. अमरावती येथील शेत सर्व्हे नं. ६२, क्षेत्रफळ ०७ हे.६४ आर आणि शेत सर्व्हे नं. ६४/१ क्षेत्रफळ ०२ हे. ८३ आर, ज्याचा आज रोजीचा अद्यावत भुमपान क्र./गट क्र. ३३२, एकुण क्षेत्रफळ १० हे. ४७ आर, आकार ६१ रु. २५ पै. (वरील दोन्ही शेतीचा सर्व्हे नंबरचा एकत्रिकरणानंतर आजचा गट नंबर ३३२आणि क्षेत्रफळ १० हे.४७ आर हि शेत जमीन धर्माळा संस्थान, पुसदा ता. जि. अमरावती यांच्या मालकीची असून त्यावर माझे वर नमूद पक्षकार यांच्या कुळाखालील सतत सन ८५-९०वर्षा पेक्षा जास्त वर्षा पासून ताब्यात आहे.या मिळकतीची चतुःसिमा खालील प्रमाणे:

पुर्वेसः- शेत गट क्र.३३१ व ३२६
पश्चिमेसः- शेत गट क्र.३३३ व ३३४
उत्तरेसः- शेत गट क्र.३२५
दक्षिणेसः- शेत गट क्र.३३६

येणे प्रमाणेवर नमूद शेत जमीनीच्या महसुली दस्ताऐवजांमध्ये गैरकायदेशीर रीत्या काही व्यक्तींनी स्वताचे नाव नोंदऊन महसुली ७/१२ उतारा तयार केला आहे. त्याबाबत विद्यमान उप विभागीय अधिकारी साहेब अमरावती यांच्या समक्ष माझे पक्षकार विरुध्ध महसुली ७/१२ उताऱ्या मधील नमूद व्यक्ती मध्ये दोन प्रकरणे आज रोजी प्रलंबित आहे. त्यामध्ये मा. उपविभागीय अधिकारी साहेब अमरावती यांनी स्थागनादेशाचा आदेश सुध्धा पारित केला असून त्यानुसार सदर प्रकरणामध्ये यानंतर अंतिम निकाल लागे पर्यंत कोणताही फेरफार घेण्यास स्पष्ट मनाई वा स्थगनादेश दिला आहे.

या मालमत्तेमध्ये माझे पक्षकार यांचा कायदेशीर कुळ ताबा असल्याने सर्व लोकांना जाहीरपणे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार यांचे पूर्व परवानगीशिवाय अथवा न्यायालयीन प्रकरण निर्णयांकित झाल्याशिवाय या मालमत्तेबाबत कोणीही कुणाशीही खरेदी-विक्री, गहाण, बक्षीस तसेच भाडेपट्टा व्यवहार अथवा इतर कोणतेही व्यवहार करू नये करू नये. असा कोणताही झालेला व्यवहार हा आपोआप पूर्वलक्षी प्रभावाने गैरकायदेशीर होईल तसेच भविष्यात वर नमूद न्यायालयीन आदेश अशा तिऱ्हाईक व्यक्तीवर सुध्धा बंधनकारक होऊन झालेला व्यवहार गैरकायदेशीर समजण्यात येईल. तसेच सदर मालमत्तेचे व्यवहार करणाऱ्यावर दिवाणी व फौजदारी कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल. याची सर्व लोकांनी नोंद घ्यावी आणि सदर मालमत्तेचा व्यवहार कुणीही कुणाशीही करू नये. करिता जाहीर सूचना प्रकाशित करण्यात येत आहे.

**अधिवक्ता**
**सागर द. अंजीकर**
**भूमिपुत्र कॉलोनी, काँग्रेस नगर, अमरावती**
**मो. क्र.९४२३४२६०८९ / ७०२०३८०११९**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१६०/२०२६
**श्रीमती कानिजा अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.०७.०३.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kaniza Bi Yusuf Khan, Age 75 Yrs. Occu.: Housewife R/o Chaman Nagar, Old Town Badnera, Dist.Amravati.
2. Firoz Khan Yusuf Khan, Age 56 Yrs. Occu.: Business R/o Patel Nagar, Behind Almas Old Town, Badnera, Amravati.
3. Kalim Khan Yusuf Khan, Age 53 Yrs. Occu.: Labour R/o Chaman Nagar, Old Town Badnera, Dist.Amravati.
4. Rizwana Begam Ziyauddin, Age 53 Yrs. Occu.: Housewife R/o Kholapur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati.
5. Sheheen Parveen Abdul Sagheer, Age 53 Yrs. Occu.: HOusewife R/o Moti Nagar, Old Town, Darussalam Masjid, Amdapur, Badnera, Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **युसूफ खान दिलावर खान** हे दिनांक 11.11.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **श्रीमती कानिजा अधिक चार विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती कानिजा अधिक चार विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०२.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# प्रेमदिनी आंतरजातीय-आंतरधर्मीय दांपत्यांचा गौरव

## महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा उपक्रम

**वर्धा/जनमाध्यम**
प्रेमाला जात-धर्माची कुंपणे नसतात, हा संदेश देत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या शहर व जिल्हा वर्धा शाखा आणि राज्याच्या 'जोडिदाराची विवेकी निवड' विभागाच्या संयुक्त विद्यमाने प्रेमदिनानिमित्त आगळावेगळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वर्धा वर्धन हाट झुणका भाकर केंद्राच्या सभागृहात आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह केलेल्या पाच दांपत्यांचे अनुभवकथन व सत्कार करण्यात आला.



आजही समाजात प्रेमविवाह, विशेषतः आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहांविषयी विरोधाची मानासिकता आढळते.ऑनर किलिंग,मारहाण, ॲसिड हल्ले यांसारख्या घटना घडत असतानाच इतिहासात प्रेमाने सामाजिक बंधने ओलांडल्याची अनेक उदाहरणे आहेत. राधा-कृष्ण, लैला-मजनू, अकबर-जोधाबाई तसेच बाजीराव पेशवे यांसारख्या उदाहरणांचा उल्लेख यावेळी करण्यात आला.डॉ. चेतना सवाई-मयूर डफळे, डॉ. हरीश पेटकर-डॉ. माधुरी झाडे, कल्पना सातव-मनीष फुसाटे, भाग्यश्री बुटकुले-प्रीतम श्रीरामे, योगेश राऊत-प्रियंका बाळबुधे या दांपत्यांनी आपल्या वैवाहिक जीवनातील संघर्ष, सामाजिक विरोध आणि मिळालेला स्वीकार यांचे अनुभव कथन केले. प्रेमात जबाबदारी आणि परस्पर सन्मान महत्त्वाचा,असा संदेश त्यांनी दिला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सत्यशोधक समाजाचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक चोपडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक बंग, डॉ. अभ्यूदय मेघे, गजेंद्र सुरकार, मोहन खैरकार आदी उपस्थित होते. मान्यवरांनी प्रेमविवाहाला सामाजिक स्वीकृती देण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माधुरी झाडे यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. मंजुषा देशमुख यांनी मानले. सूत्रसंचालन प्रकाश कांबळे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.प्रेमदिनाला सामाजिक जाणीवेची जोड देत आयोजित हा कार्यक्रम उपस्थितांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला.

## जमीन आमची, निर्णय आमचा, प्रशासनाच्या सक्तीविरोधात संताप उसळला

# परसोडी भूसंपादनाला १९१ शेतकऱ्यांचा एकमुखी नकार

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**
मौजा परसोडी व घोंगली शिवारातील सुमारे ३१२.७८ हेक्टर उपजाऊ शेतजमिनीचे एमआयडीसीसाठी प्रस्तावित भूसंपादन शेतकऱ्यांच्या तीव्र विरोधात अडकले आहे. सिंदी नगरपालिकेच्या सभागृहात झालेल्या बैठकीत १९१ पैकी एकाही शेतकऱ्याने शासनाने जाहीर केलेल्या मोबदल्यास संमती दिली नाही. न्याय्य मोबदल्याशिवाय जमीन देणार नाही, अशी ठाम भूमिका शेतकऱ्यांनी एकमुखाने मांडली.बैठकीस भूसंपादन



अधिकारी, उपविभागीय अधिकारी (वर्धा), तहसीलदार, नायब तहसीलदार (सेलू) तसेच एमआयडीसीचे अधिकारी उपस्थित होते. प्रशासनाकडून प्रति एकर २४,५८,३२१ रुपये आणि प्रति हेक्टर ६१,४५,८०४ रुपये असा मोबदला जाहीर करण्यात आला. मात्र हा दर अत्यल्प व अन्यायकारक असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. खाजगी ग्राहक दुप्पट भाव देण्यास तयार असताना शासन आमच्याशी अन्याय का करते असा प्रश्न बैठकीत उपस्थित करण्यात आला.सदर जमीन औद्योगिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या पट्ट्यात येते. पूर्वेला एमआयडीसी, पश्चिमेला ड्राय पोर्ट, उत्तरेला नागपूर-तुळजापूर महामार्ग, तीन किमी अंतरावर समृद्धी महामार्ग जंक्शन, दक्षिणेला सेंट्रल रेल्वे आणि मधून रिलायन्स रेल्वे मार्ग अशा चारही बाजूंनी विकसित पायाभूत सुविधांनी वेढलेल्या या क्षेत्राला बाजारभावापेक्षा कमी दर देणे अमान्य असल्याचे शेतकऱ्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, संमती असो वा नसो, संपादन सक्तीने केले जाईल; कोर्टात जा, अशा धमकीवजा भाषेचा वापर अधिकाऱ्यांकडून झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. त्यामुळे वातावरण तणावपूर्ण झाले. प्रशासनाने शेतकऱ्यांचे म्हणणे न ऐकता बैठक अर्धवट सोडल्याचा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी बैठकीवर बहिष्कार टाकला.जमीन आमच्या मालकीची आहे, न्याय्य मोबदल्याशिवाय भूसंपादन होऊ देणार नाही, अशा घोषणा देत शेतकऱ्यांनी आपली एकजूट दाखवून दिली. बैठकीस १९१ प्रकल्पबाधित शेतकऱ्यांपैकी शंभराहून अधिक शेतकरी उपस्थित होते. पुढील काळात आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

## कीटकनाशक प्राशन करून युवकाची आत्महत्या

**समुद्रपूर** - समुद्रपूर तालुक्यातील आष्टा नांदरा येथे कीटकनाशक प्राशन करून एका युवकाने आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. भूषण देवढे (३०) असे मृत युवकाचे नाव आहे. घरातच त्याने कीटकनाशक प्राशन केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. प्रकृती बिघडल्याचे लक्षात येताच कुटुंबीयांनी त्याला उपचारासाठी हलवण्याचा प्रयत्न केला; मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. तक्रारीवरून दहेगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## बसमध्ये चढताना भोवळ; वृद्धाचा जागीच मृत्यू

**सेलू** - सेलू बसस्थानकात बसमध्ये चढताना अचानक भोवळ येऊन पडल्याने एका वृद्धाचा मृत्यू झाला. जागोबा मडावी (८०, रा. वडगाव कला) असे मृताचे नाव आहे. मडावी हे गावी जाण्यासाठी बसस्थानकावर आले होते. बस थांबताच ते चढण्यासाठी पुढे सरसावले; मात्र पायरीवर चढत असताना त्यांना अचानक चक्कर आली आणि ते खाली कोसळले. उपस्थित प्रवाशांनी तत्काळ मदत करण्याचा प्रयत्न केला. त्यांना उचलून बाजूला करण्यात आले; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेमुळे बसस्थानक परिसरात काही काळ हळहळ व्यक्त करण्यात आली. तक्रारीवरून सेलू पोलिसांनी



आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

### संक्षिप्त

#### घरगुती वादातून पतीवर उकळते पाणी; गंभीर भाजल

**कारंजा (घाडगे)**-घरगुती वादातून पत्नीने पतीच्या अंगावर उकळते पाणी ओतल्याची घटना इंदिरानगर परिसरात घडली. निसार इस्माईल शाहा (४०) असे जखमी पतीचे नाव आहे. तो दारू पिऊन घरी आल्यानंतर पत्नी शालू हिला स्वयंपाकासाठी कढई मागत होता. यावरून दोघांमध्ये वाद झाला. संतापाच्या भरात पत्नीने आंघोळीसाठी तापवून ठेवलेले उकळते पाणी पतीच्या अंगावर ओतले. यात त्यांचे डोके, चेहरा, छाती व पाठ गंभीर भाजली. जखमींवर उपचार सुरू असल्याची माहिती आहे. तक्रारीवरून कारंजा पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून तपास सुरू आहे.



#### बबन भोयर यांचे निधन

**सिंदी रेल्वे**-येथील बबन भोयर यांचे अल्प आजारात रविवारी पहाटे निधन झाले. ते ७४ वर्षांचे होते. मोक्षधामात दुपारी अंत्यसंस्कार पार पडला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि मोठा आप्तपरिवार आहे.

# सहा दिवस नळ कोरडे; १३ गावांचा पाणीपुरवठा बंद

## हनुमान टेकडी पाइपलाईन दुरुस्तीसाठी २० ते २५ फेब्रुवारी काम; नागरिकांना पाणीसाठ्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) यांच्या वतीने हनुमान टेकडीवरील येळाकेळी जलशुद्धीकरण केंद्राच्या मुख्य पाइपलाईनची दुरुस्ती २० ते २५ फेब्रुवारीदरम्यान करण्यात येणार आहे. या कालावधीत पिपरी (मेघे)सह आसपासच्या १३ गावांचा पाणीपुरवठा तब्बल सहा दिवस बंद राहणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

वारंवार गळती व पाइप फुटीच्या घटना घडत असल्याने ही दुरुस्ती अपरिहार्य ठरली आहे. नागरिकांनी आवश्यक तेवढा पाणीसाठा करून घ्यावा व दुरुस्ती कामात सहकार्य करावे, असे आवाहन कार्यकारी अभियंता प्रशांत बुरडे यांनी केले आहे.

**३.५ किमी काम पूर्ण; उर्वरित टप्पा आता हाती**

उन्हाळ्यापूर्वी गळती रोखण्याचा प्रयत्न येळाकेळी जलपुरवठा योजनेअंतर्गत यापूर्वी ३.५ किमी पाइपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ३.५ किमी भागातील दुरुस्ती आता हाती घेण्यात येणार आहे. उन्हाळ्याच्या तोंडावर होणारी ही कामे भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी महत्त्वाची असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

**३० कोटींची थकबाकी; विभाग आर्थिक अडचणीत**

१६ वर्षांत वसुली अपुरी; नागरिकांना कर भरण्याचे आवाहन मजीप्रा मार्फत जलपुरवठा होत असला तरी गेल्या १६ वर्षांत सुमारे ३० कोटी रुपयांची पाणीकर थकबाकी जमा झाली आहे. दरवर्षी १० कोटींच्या वसुलीचे उद्दिष्ट ठेवले जात असले तरी अपेक्षित वसुली होत नाही.

त्यामुळे सेवा सुरळीत ठेवताना विभागास अडचणी येत आहेत.

या योजनेत पिपरी (मेघे), कारला, बोरगाव (मेघे), सावंगी (मेघे), सिंदी (मेघे), उमरी, वायगाव, साटोडा, आलोडी, दत्तपूर, वरुड, म्हसाडा आणि नालवाडी या गावांचा समावेश आहे.

**जल जीवन मिशनअंतर्गत १० हजारांहून अधिक नळजोडण्या**

७ हजार अवैध जोडण्या; योजनेवर संकटाचे सावट जल जीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषदेमार्फत १० हजारांहून अधिक

घरांना नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. मजीप्राकडे २२ हजार अधिकृत ग्राहक नोंदणीकृत आहेत. मात्र सुमारे ३ हजार ग्राहक वैध असून ७ हजार नळजोडण्या अवैध असल्याचे सांगितले जाते. थकबाकी वाढत असल्याने योजनेच्या आर्थिक शाश्वततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**वायगाव (निपाणी)मध्ये पाणीपुरवठा बंद**

७.५ कोटींची थकबाकी; प्रशासनाचा कठोर निर्णय पाणीटंचाईसाठी ओळखल्या जाणाऱ्या वायगाव (निपाणी) येथे सुमारे ७.५ कोटी रुपयांचा पाणीकर थकीत आहे. त्यामुळे ५ फेब्रुवारीपासून गावाचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे.

**थकबाकीदारांवर लोकअदालतीत कारवाई**

पाणीकर न भरणाऱ्या ग्राहकांच्या नळजोडण्या तोडण्यात येणार असून लोकअदालतीच्या माध्यमातून प्रकरणे दाखल केली जाणार आहेत. ग्रामपंचायतींना भेट देऊन नागरिकांना कर भरण्याचे आवाहन सुरू असल्याची माहिती उपविभागीय अभियंता दीपक धोटे यांनी दिली.दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या या भागातील नागरिकांसाठी ही दुरुस्ती दीर्घकालीन दिलासा देणारी ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## कमलताई गवई यांचा सत्कार



**पुलगाव**-माजी राज्यपाल रामकृष्ण गवई यांच्या पत्नी तसेच भारताचे ५२ वे मुख्य न्यायाधीश भुषण गवई यांच्या मातोश्री श्रीमती कमलताई रामकृष्ण गवई यांनी पुलगाव येथे आयोजित प्रबोधन व सत्कार समारंभात उपस्थित राहून समाजपरिवर्तनाचा संदेश दिला. या वेळी कमलताई गवई यांनी शिक्षण, स्त्रीसक्षमीकरण आणि सामाजिक न्याय यांची गरज अधोरेखित केली. महिला सक्षमीकरण, मुलींचे शिक्षण व आत्मनिर्भरतेसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. ८४ व्या वर्षीही त्यांचा समाजकार्यातील उत्साह कायम असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.कार्यक्रमात जिजाऊ ब्रिगेड वर्धा जिल्हा अध्यक्षा शिवमती अर्चना जगताप, शिवमती स्वाती गोरे आणि शिवमती रत्ना गोतमारे यांनी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व जिजाऊंचे पुस्तक देऊन कमलताई गवई यांचा सत्कार केला.समाजकार्याच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केले असून, पुलगाव येथील कार्यक्रमास नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

# चिमुकल्यांच्या स्वप्नांना स्नेहसंमेलनाचे पंख

## जिल्हा परिषद कन्या व केंद्र शाळेत सांस्कृतिक सोहळा

**विरूळ(आ)/जनमाध्यम**
गावच्या मातीचा सुगंध, पालकांच्या डोळ्यांतलं कौतुक आणि चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरचा निरागस आनंदष्ठ अशा भावपूर्ण वातावरणात विरूळ आकाजी येथील जिल्हा परिषद कन्या व केंद्र शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांना आत्मविश्वासाची नवी उभारी मिळावी, या हेतूने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



इयत्ता पहिली ते चौथीतील विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्यछटा, देशभक्तीपर गीते आणि सामाजिक संदेश देणारे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. रंगीबेरंगी वेशभूषा, निरागस हावभाव आणि आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमून गेले. आपल्या लेकरांना मंचावर पाहून अनेक पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटून आले.कार्यक्रमाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शिल्पा देवुळकर यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून आर्वी पंचायत समितीच्या उपसभापती शोभा मनवर,

मॉडेल हायस्कूलचे मुख्याध्यापक मडवे, तलाठी माळोदे, जिल्हा परिषद माजी सदस्य चंद्रकांत कांडलकर, पत्रकार सचिन देवताळे, विनोद महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक करत ग्रामीण भागातील शाळांमध्येही गुणवत्ता आणि सर्जनशीलतेचा झरा अखंड वाहत असल्याचे नमूद केले.

हीच पिढी उद्याचा सक्षम भारत घडविणार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक काळपांडे, शिक्षिका शितल वडनेरकर, मुख्याध्यापक राजेंद्र नाखले, शिक्षिका पुनम हनमंते, लता बनसोड, मुडे तसेच इतर शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.सूत्रसंचालन शितल वडनेरकर यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन पुनम हनमंते यांनी मानले. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने शाळेचा परिसर आनंद, उत्साह आणि स्वप्नांच्या रंगांनी बहरून गेला



# प्रहारच्या १०० स्वयंसेवकांनी दिला भाविकांना सेवेचा हात

## ढगा यात्रेत शिस्त, सुरक्षा आणि सेवाभावाची जुळवाजुळव

**वर्धा/जनमाध्यम**
जिल्ह्यातील लहान महादेव म्हणून ओळख असलेल्या ढगा येथे महाशिवरात्री निमित्त भरलेल्या यात्रेत प्रहार समाज जागृती संस्थेच्या १०० स्वयंसेवकांनी भाविकांना सेवेचा हात दिला. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

या पार्श्वभूमीवर स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध दर्शन व्यवस्था उभी करत यात्रेला सुव्यवस्थित स्वरूप दिले.

यात्रेदरम्यान स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा लावणे, गडावर चढताना वृद्ध, अपंग व महिलांना आधार देणे, प्रथमोपचार सुविधा उपलब्ध करून देणे तसेच पिण्याच्या पाण्याची पानपोई उभारणे अशी विविध कामे स्वयंसेवकांनी पार पाडली. परिसरातील स्वच्छता व जंगल संवर्धनाबाबतही जनजागृती करण्यात आली.Bor Tiger Project यांच्या सहकार्याने सुरक्षा आणि पर्यावरणपूरक व्यवस्था राखण्यात आली.

प्रहारचे अध्यक्ष कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सेवा प्रकल्प राबविण्यात आला. भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि शांततापूर्ण दर्शन मिळावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे संस्थेतर्फे सांगण्यात आले.

## हुतात्मा राष्ट्रीय इंग्लिश मीडियम स्कूलच्या दोन विद्यार्थ्यांची निवड

# इस्त्रोच्या दारात आष्टीचे पाऊल

### आष्टीच्या नावाला अंतराळाची झेप

तुलनेने नवीन असलेली इंग्लिश माध्यमाची ही शाळा आज तालुक्यात दैदिप्यमान ओळख निर्माण करत आहे. ग्रामीण मातीतून उगवलेली ही दोन कोवळी रोपे आता अंतराळ संशोधनाच्या विश्वात डोकावणार आहेत, हीच खरी शिक्षणाच्या परिवर्तनाची कहाणी आहे.आष्टीचा अभिमान, वर्ध्याचा सन्मान आणि विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना लाभलेले अंतराळाचे आकाश हा क्षण केवळ शाळेचा नाही, तर संपूर्ण समाजाचा आहे.





**आष्टी/जनमाध्यम**
आष्टीच्या शैक्षणिक क्षितिजावर आज अभिमानाचा नवा तारा चमकला आहे. येथील हुतात्मा राष्ट्रीय इंग्लिश मीडियम स्कूलच्या दोन विद्यार्थ्यांची Indian Space Research Organisation (ISRO), बेंगलोर तसेच कुप्पम (आंध्र प्रदेश) येथे आयोजित अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. नैतिक संजय भार्गव आणि कुमारी हुरेन फातिमा शकीलखान पटेल या विद्यार्थ्यांनी आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर थेट अंतराळ संशोधनाच्या पवित्र भूमीत पाऊल ठेवण्याची संधी मिळवली आहे.वर्धा जिल्ह्यातील एकूण ४६ विद्यार्थ्यांमधून या दोघांची निवड झाल्यामुळे शाळेसह संपूर्ण परिसरात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण पसरले आहे.

स्वप्नांना आकाशाची किनार मिळाल्याचा हा क्षण शाळेसाठी ऐतिहासिक ठरत आहे.

**बाल विज्ञान प्रदर्शनातून थेट अंतराळापर्यंत**

या विद्यार्थ्यांनी बाल विज्ञान प्रदर्शनात सादर केलेल्या प्रकल्पाची राज्यस्तरावर निवड झाली होती. त्यांच्या कल्पकतेची आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची दखल घेत हा विशेष अभ्यास दौरा निश्चित करण्यात आला. अंतराळ संशोधनाच्या कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची ही सुवर्णसंधी त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला नवे वळण देणारी ठरणार आहे.

**पालकमंत्र्यांच्या पुढाकारातून विशेष संधी**

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची दखल घेत जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ, भोयर यांनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांना ही प्रत्यक्ष भेटीची संधी उपलब्ध करून दिली. त्यांच्या या प्रयत्नामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही अंतराळ संशोधन संस्थेचे दालन खुले झाले आहे.

**शाळेच्या प्रगतिशील वाटचालीचा मानबिंदू**

हुतात्मा स्मारक समितीचे अध्यक्ष राहुल श्रीधरराव ठाकरे, सचिव विनायक रावजी होले, उपाध्यक्ष डॉ. किशोर गंजीवाले, सहसचिव भरत वंजारा तसेच व्यवस्थापन मंडळाने विद्यार्थ्यांचे कौतुक करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापिका शारदा ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा शैक्षणिक, वैज्ञानिक व विविध प्रकल्पांमध्ये सातत्याने प्रगतिशील कार्य करत आहे. विद्यार्थ्यांच्या

सर्वांगीण विकासावर दिला जाणारा भर आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची परंपरा याच प्रयत्नांचे हे फळ असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ८२
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार सोहळा

# स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती जीवनगौरव पुरस्काराने प्रकाश पोहरे सन्मानित

## विलास बडे यांना स्व.जुगलकिशोर अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान

**अमरावती/क्रा.प्र.**

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणाऱ्या विविध पत्रकारिता पुरस्कारांचा वितरण सोहळा शनिवारी थाटात पार पडला. स्व.दादासाहेब काळमेघ यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार देऊन दैनिक देशोन्नतीचे संपादक तथा शेतकरी चळवळीतील अग्रणी प्रकाश पोहरे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यासोबतच स्व.जुगलकिशोर अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पुरस्काराने न्यूज १८ मराठीचे संपादक विलास बडे यांना सन्मानित करण्यात आले. तसेच विभागस्तरीय आणि जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार देखील वसंतराव घुईखेडकर, प्रवीण आहुजा आणि चंद्रकांत भड यांना या कार्यक्रमात प्रदान करण्यात आले.




श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसदकर सभागृहात अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारित पुरस्कार सन्मान सोहळा पार पडला, यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल होते. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खा. बळवंत वानखडे, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे, महापौर श्रीचंद तेजवानी, पोलिस आयुक्त राकेश ओला, सकाळ समुहाचे संपादक राहुल गडपाले, मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, अकोला जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मिर शौकत अली, सत्कारमूर्ती दै.देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, न्यूज १८ मराठीचे संपादक विलास बडे, दै. नमो महाराष्ट्रचे संपादक वसंतराव घुईखेडकर, दै. प्रतिदिन अखबारचे वृत्तसंपादक प्रवीण आहुजा, दै. मातृभूमीचे प्रतिनिधी चंद्रकांत भड, यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार देऊन दैनिक देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे यांना प्रदान करण्यात आला. ४१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तर स्व. जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार देऊन न्यूज १८ मराठीचे संपादक विलास बडे यांचा सन्मान करण्यात आला. ३१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यासोबतच राहुल गडपाले पुरस्कृत विभागीय पत्रकारिता पुरस्कार देऊन दै. नमो महाराष्ट्रचे संपादक वसंत घुईखेडकर यांचा सपत्नीक सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. २१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच दै.विदर्भ मतदार पुरस्कृत जिल्हास्तरीय शहर पत्रकारिता पुरस्कार दै. प्रतिदिन अखबारचे वृत्त संपादक प्रवीण आहुजा तसेच पी.आर.पोटे एज्यकेशनल गृप पुरस्कृत जिल्हा ग्रामीण पत्रकारिता पुरस्कार देऊन दै. मातृभूमीचे चंद्रकांत भड यांचा सन्मान करण्यात आला. ११ हजार हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह असे या दोन्ही पुरस्काराचे स्वरूप होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष संजय शेंडे यांनी सुत्रसंचालन सरचिटणीस प्रफुल्ल घवळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रसिद्धी प्रमुख गौरव इंगळे यांनी केले. या कार्यक्रमाला श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे माजी सचिव शेषरावजी खाडे, डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन बँकेचे अध्यक्ष नरेश पाटील, दैनिक मतदारचे संपादक दिलीप एडतकर, प्राचार्य नितीन चांगोले, प्रा. डॉ. कडू, विद्यापिठाचे जनसंपर्क अधिकारी विलास नांदूरकर, या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरचिटणीस प्रफुल्ल घवळे, सुधीर भारती, उपाध्यक्ष उल्हास मराठे, चंदू सोजातिया, संजय शेंडे, अरूण जोशी, अनुप गाडगे, अरूण तिवारी, कोषाध्यक्ष विजय ओडे, सहकोषाध्यक्ष सूनील धर्माळे, सहसचिव प्रणय निर्वाण, संजय बनारसे, प्रसिद्धी प्रमुख गौरव इंगळे, ग्रामीण प्रतिनिधी हेमंत निखाडे, कार्यकारिणी सदस्य मंगेश तायडे, सुरेंद्र आकोडे, नितेश राऊत, अमर घटारे, स्वप्नील उमप, विजय धामोरीकर, छाया काळमेघ, स्वीकृत सदस्य डॉ.लोभस घडेकर, सूधीर केने, यशपाल वरठे, अशोक जोशी तसेच पत्रकार विवेक दोडके आणि प्रेम कारेगावकर कार्यालयीन व्यवस्थापक रोशन जोंधळे यांनी प्रयत्न केले. तसेच या कार्यक्रमाला जिल्हाभरातून शहर तसेच ग्रामीण भागातील पत्रकार बांधव, राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**वारसा शहरात जीवंत - वसंतराव घुईखेडकर**

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे काम कौतुकास्पद आहे. अमरावती शहराला पत्रकारितेचा मोठा वारसा असून तो वारसा कायम ठेवण्याचे काम आजही नवी पिढी करताना दिसून येत आहे. स्व.बाळासाहेब मराठे यांच्याकडून आम्हाला पत्रकारितेत प्रेरणा मिळाली. वृत्तपत्र चालविणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. हे काम करणाऱ्यांचा संघर्ष समजून घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे सर्वसामान्यांचे प्रश्न ज्वलंतपणे मांडण्याचे काम आम्ही करतो आहे असे वसंतराव घुईखेडकर यांनी सांगितले.

**भूमिका महत्वाची– खा. बळवंत वानखडे**

मन की बात मुळे पत्रकारितेचे महत्व कमी झाले. आम्ही बोललो की माईक बंद होतात. त्यामुळे पत्रकार हाच आमचा आवाज आहे. आज योग्य विषयावर आम्ही बोललो नाही तर उद्याची पिढी माफ करणार नाही. समाजाचे चित्र जनतेच्या समोर आणण्यासाठी पत्रकारितेची भुमिका महत्वाची असल्याचे बळवंत वानखडे यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

**तत्वांशी ठाम राहा – विलास बडे**

पत्रकारांचे कौतुक करण्यासाठी सर्वसामान्य जनता येते तेव्हा आम्हाला काम करण्याची प्रेरणा येते. हा पुरस्कार मी पायात चिखल तुडविणाऱ्या बळीराजाला मी समर्पित करतो. पत्रकार क्रांतीकारक नाही परंतू आम्ही समाजासाठी काम करतो. लोकशाही टिकली पाहिजे. येणारा काळ अवघड आहे. पत्रकारांनी तत्वांशी ठाम राहून काम करायला हवे. आम्हीच समाजाचे वकिल आहोत. प्रश्न मांडणे आमचे काम आहे. अजेंडाधारी पत्रकारिता न करता पत्रकारितेच्या मुल्याशी प्रतारणा न करता काम करणे गरजेचे आहे. सामान्य माणसाची आशा मरता कामा नये अशा शब्दात विलास बडे यांनी पत्रकारितेविषयीची भावना विशद केली.





## वसंतराव घुईखेडकर, प्रवीण आहुजा, चंद्रकांत भड यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार

**धर्मजातीच्या राजकारणात सर्वकाही गुंडाळल्या जाते आहे – प्रकाश पोहरे**

बँकांमध्ये डिपॉजिट ठेवणारा शेतकरी आज गहाण ठेऊन कर्ज घेणारा कर्ज बाजारी झाला. कुठल्याही कागदाशिवाय कर्जमाफी करणारा शेतमालाच्या किमती वाढविणारा पंतप्रधान मनमोहन सिंग होते. अन्नदाता असलेला शेतकरी आज चुकीच्या धोरणामुळे याचक बनला आहे. युएस डीलमुळे शेतकऱ्यांच्या शवपेटीवर खिळा ठोकण्याच काम केल जाते आहे. जातीधर्माच्या राजकारणात आज राजकारण्यांनी सर्वकाही गुंडाळून ठेवले आहे. पत्रकारसंघाने केलेला सन्मान हा आजीवन लक्षात राहील भावना प्रकाश पोहरे यांनी सत्काराला उत्तर देत असताना सांगितले.

**प्रिंट मिडियामुळेच पत्रकारिता जीवंत–अग्रवाल**

शेतकऱ्यांच्या समस्येवर चर्चा होणे ही चांगली व आवश्यक गोष्ट आहे. समाजाच्या समस्यांचे समाधान पत्रकारच करेल ही अपेक्षा सर्वांना असते. २०१४ नंतर पत्रकारांनी त्यांचे काम करत राहणे हीच मोठी क्रांती आहे. प्रिंट मिडियाचे अस्तित्व धोक्यात असल्याचे बोलले जाते मात्र प्रिंट मिडियामुळेच पत्रकारिता जीवंत आहे. आजही वृत्तपत्रांची संख्या वाढते आहे हे प्रिंट मिडियाच्या जीवंतपणाचे लक्षण आहे.

आज ज्याला सोशल मिडिया म्हणतो तो मिडिया नसून तो सोशल प्लॅटफॉर्म आहे. राजकीय सत्तेसाठी पत्रकारिता कधीच चांगली नसते आणि तीच खरी पत्रकारिता आहे असे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.

**पत्रकारांविषयी नेत्यांच्या मनात आदर असतो – डॉ. बोंडे**

व्यक्त होणे ही माणसाची प्रवृत्ती आहे. त्यामुळे कोणत्यातरी प्लॅटफॉर्मवर लोक येऊन आपली मत मांडत असतात. पत्रकारांचे योगदान हे समाजासाठी अत्यंत मोठे आहे.

पत्रकारांपासून सावध राहण्याची भुमिका नेत्यांची असते. पत्रकारांविषयी भितीमिश्रित आदर नेत्यांच्या मनात असतो असे प्रतिपादन राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी केले


---

## संक्षिप्त



### महाशिवरात्रीनिमित्त उपमहापौरांचा सत्कार


**अमरावती-**महाशिवरात्रीच्या पावन निमित्ताने श्री शिव शंकर मंदिर संस्था तर्फे रहाटगाव येथे भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार पार पडला.सत्काराला उत्तर देताना मा. उपमहापौर सचिन भेंडे यांनी आपुलकीने केलेल्या सन्मानाबद्दल आयोजक व उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. महाशिवरात्रीच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमामुळे परिसरात भक्तीमय व आनंदी वातावरण निर्माण झाले होते. यावेळी माझी खासदार अनंतराव गूढ़े, मनोहर आपा कापसे, रमेश मेंढ़से, सूर्यकांत कूल्कोल्हे, भारत मेंडेस, अभिमान दोईजाद, अशोक जीवरकर, कैलाश गिलोरकर, प्रकाश सांगेकर उपस्थित होते.



### संत सेवालाल महाराज जयंती साजरी

**अमरावती-**बंजारा समाजाचे दैवत संत सेवालाल महाराज यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली.यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. यावेळी उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. संचालन व संत सेवालाल यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

### माणिक खंडारकर यांचे निधन



***लेहेगाव*-**नजीकच्या सावरखेड पिंगळाई येथील प्रतिष्ठित नागरिक अत्यंत मनमिळाऊ स्वभावाचे माणिकराव बापूरावजी खंडारकर यांचे वयाच्या ८१ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, सून, नातू, नात आणि एक मुलगी असा आप्त परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी सावरखेड पिंगळाई येथील हिंदू स्मशानभूमीत झाला असून, यावेळी त्यांचा मित्रपरिवार आणि गणमान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## श्री.साईबाबा विद्यालय येथे मातृ-पितृ पूजन कार्यक्रम

**अमरावती/क्रा.प्र.**






बाल संस्कार केंद्र आणि स्वस्तिक माहेश्वरी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या मनामध्ये संस्कार निर्माण करून त्यांचे उज्ज्वल भविष्य घडवणे हा संस्थेचा मुख्य हेतू आहे. या उद्देशाने बाल संस्कार केंद्रामार्फत श्री साईबाबा विद्यालय, साईनगर येथे मातृ–पितृ पूजन कार्यक्रम अतिशय सुंदर व भावनिक वातावरणात आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या आई–वडिलांचे व शिक्षकांचे पूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. या संपूर्ण मातृ–पितृ पूजन विधीचे नियोजन व संचालन राधा चौधरी यांनी अत्यंत उत्कृष्ट, शिस्तबद्ध व भावपूर्ण पद्धतीने केले.पालकांनीही आपल्या मुलांच्या संस्कारक्षमतेचा अनुभव घेतला. या उपक्रमामुळे पालक–विद्यार्थी नातेसंबंध अधिक दृढ झाले.बाल संस्कार केंद्राच्या सदस्यांमध्ये राधा चौधरी, सुषमा मालधुरे, सुवर्णा भुयारकर, संगीता राठोड, विजय सुने, सुषा खोपे, आणि अर्चना ठाकरे, यांचा समावेश आहे. सर्व सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक राजेश टावरी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्या म्हणून लीला झंवर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेचे पर्यवेक्षक आशिष पसारकर यांचीही विशेष उपस्थिती लाभली. प्रमुख पाहुण्यांनी बालसंस्कारांचे महत्त्व विशद करून पालक आणि शिक्षकांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करावेत,असे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी बाल संस्कार केंद्राच्या कार्याचे मनापासून कौतुक केले.कार्यक्रमाचे संचालन नेहा बुब यांनी केले तसेच आभार प्रदर्शन सुनिता झंवर यांनी केले.अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, कर्तव्यभावना व कुटुंबीयांप्रती आदर निर्माण होऊन समाजघडणीत सकारात्मक बदल घडेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## रामचंद्र मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन

**शिराळा-**येथील श्री रामचंद्र संस्थान वतीने रामचंद्र मुर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन १८,१९,व २०फेब्रुवारीला केले आहे. पौरोहित्य महेन्द्र जमदग्नी गुरुजी,गोवर्धन पुराणिक गुरुजी, गोपाल कुळकर्णी गुरुजी, यश दुबे गुरुजी, श्री प्रणव धोटे गुरुजी राहतील.दैनिक कार्यक्रम १८ फेब्रुवारी ला सकाळी ९ ते दुपारी २ वाजता अधिवास व दुपारी ४ वाजता आसरा माता भजनी मंडळ शिराळा यांचे भजन राहिल तर संध्याकाळी ७ वाजता आरती राहिल. रात्री ८ वाजता सुंदरकांड नरेश हनुमानजी सुंदरकांड भजन मंडळ शिराळा करतील. १९ फेब्रुवारी ला स्थापित देवता पुजन सकाळी ९ ते २ वाजता होमहवन राहिल यजमान सर्वश्री अभिजित मधुकरराव देशमुख,वजयंती अभिजित देशमुख, मनिष रामरावजी दहापुते तेजस्वीता मनिष दहापुते, सुनील रामरावजी हटवार, दिपाली सुनील हटवार, वैभव विजयराव काळे,चैताली वैभव काळे, हरिभाऊ मानापुरे, आशा हरि मानापुरे आहे. विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन राहतील.तरी भाविक भक्तांनी कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा अशी विनंती आयोजक श्री रामचंद्र संस्थान शिराळा यांनी केली आहे.

## गाडगे महाराजांच्या जयंती महोत्सवाचे खा.डॉ.अनिल बोंडे यांना निमंत्रण



**अमरावती-**निष्काम कर्मयोगी श्री संत गाडगे महाराजांच्या १५० व्या जयंती महोत्सवाचा २३ फेब्रुवारीला श्रीक्षेत्र नागरवाडी येथे समारोपीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे विशेष निमंत्रण राज्यसभेचे खासदार डॉ.अनिल बोंडे यांना श्री गाडगे महाराज मिशन कडून त्यांना ससन्मान हे निमंत्रण देण्यात आले आहे. वैराग्यमूर्ती गाडगे महाराजांनी दशसूत्रीच्या माध्यमातून मानवी उत्थानाची दिशा समाजाला दाखवली. आयुष्यभर निष्कामपणे समाजसेवा करून त्यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, ग्राम स्वच्छता अभियान यासह ऐतिहासिक उपक्रम राबविले. त्याच पार्श्वभूमीवर यावर्षी गाडगे महाराजांचा दीडशे वा जयंती महोत्सव उत्साहात साजरा केला जाणार आहे. २३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या या समारोपीय ऐतिहासिक जयंती महोत्सवाचे निमंत्रण श्री गाडगे महाराज मिशन तर्फे खासदार डॉ.अनिल बोंडे यांना देण्यात आले आहे. यावेळी मिशनचे सागर बापू देशमुख, गजानन देशमुख, समाधी मंदिराचे विश्वस्त प्रकाश महात्मे, प्रख्यात वक्ते तथा पत्रकार शुभम बायस्कार यांच्यासह अन्य उपस्थित होते.

## संचमान्यता निर्णयावर शिक्षक समितीचा आक्षेप

### अतिरिक्त शिक्षक समायोजनाबाबत शासनाकडे निवेदन

**अमरावती/का.प्र.**

संचमान्यता शासन निर्णय १५मार्च २०२४ नुसार शाळांतील शिक्षकांची पदे निश्चित केल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिक्षणच धोक्यात येणार आहे. परिणामी शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा मूळ हेतूच नष्ट होईल हे अनेक शिक्षण तज्ज्ञ सातत्याने स्पष्ट करीत आहेत. नवीन संचमान्यता धोरणामुळे केवळ शिक्षकांची पदे कमी होतात यापेक्षाही विद्यार्थ्यांना आपल्या गावात गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचा हक्क संपुष्टात येऊन मुलांसह अनेक मुलींचे शिक्षण थांबेल यासाठी RTE निकषानुसारच नव्हे; तर २८ ऑगस्ट १९८० मध्ये ठरविलेल्या निकषानुसार शिक्षक देण्यात यावे अशी आम्ही महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती म्हणून शासनाकडे सतत विनंती करीत होते. सोबतच आधार कार्ड वैधता आधारित संचमान्यता न करता शाळेत प्रवेशित व प्रत्यक्ष उपस्थितीची पडताळणी करून संचमान्यता निर्धारण करावे अशीही मागणीचे पत्र महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षण प्रधान सचिव रणजितसिंग देओल,राज्य शिक्षण आयुक्त सचिद्र प्रताप सिंग,प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी,शिक्षण उपसचिव तुषार महाजन यांना पत्राव्दारे केली आहे.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने १५ मार्च २०२४ च्या सचमान्यता शासन निणयानुसार अतिरिक्त ठरणाऱ्या जिल्हा परिषद शिक्षकांच्या समायोजन प्रक्रियेवर आक्षेप घेत शासनाकडे पत्र पाठवले आहे. अमरावतीसह ग्रामीण भागातील शाळांमध्ये शिक्षक पदे कमी केल्यास विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येईल, असा समितीचा इशारा आहे.समितीने आधार वैधतेऐवजी प्रत्यक्ष उपस्थितीच्या आधारे संचमान्यता निश्चित करावी, तसेच २८ ऑगस्ट १९८० च्या निकषांनुसार शिक्षक पदे द्यावीत, अशी मागणी केली आहे. ४ फेब्रुवारी २०२६ च्या शिक्षण संचालनालयाच्या पत्रानुसार समायोजनाची प्रक्रिया राबविण्यात येत असली तरी अंतिम संचमान्यतेत त्रुटी असल्याचा दावा करण्यात आला आहे.ग्राम विकास विभागाच्या १२/१८ मे २०११ च्या शासन निर्णयाचा उल्लेख नसल्याने जिल्हा परिषद शिक्षकांचे समायोजन शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार करता येत नाही, अशी समितीची भूमिका आहे. भाषा व समाजशास्त्र विषय शिक्षकांच्या समायोजनाबाबत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करावीत, अशीही मागणी करण्यात आली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# लक्षावधी भाविक, पर्यटक व शेतकऱ्यांच्या जिवाशी खेळ?

## वान धरणात सोलापूरहून ९ मगरी सोडल्याने संताप



**हिवरखेड/प्रतिनिधीः-** अकोला-अमरावती-बुलढाणा या तीन जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेले सुप्रसिद्ध वारी हनुमान तीर्थक्षेत्र आणि वान धरण परिसरात सोलापूर येथून आणलेल्या तब्बल नऊ मगरी सोडण्यात आल्याने नागरिकांमध्ये संताप उसळला आहे. वन विभागाने हा निर्णय स्थानिक ग्रामपंचायत, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांना अंधारात ठेवून घेतल्याचा आरोप होत असून, लक्षावधी भाविक, पर्यटक आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

चीफ वाइल्ड लाईफ वॉर्डन, नागपूर यांच्या आदेशानुसार सोलापूर येथील महात्मा गांधी प्राणी संग्रहालय मधून मगरी आणून मेळघाट व्याघ्र प्रकल्प अंतर्गत वान रेंजमधील नागरतास परिसरात सोडण्यात आल्या. मात्र स्थलांतरानंतर एका मगरीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली असून, त्याचा शवविच्छेदन अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

तर दुसरीकडे मेळघाट परिसरात कुंपण नसल्याने वाघ, बिबट, रानडुक्कर, हरिण यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. भरपाई अपुरी असल्याची तक्रार कायम आहे. त्यातच आता मगरींची भर पडल्याने भीतीचे सावट अधिक गडद झाले आहे. वन विभागाचा निर्णय पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने योग्य की लोकजीवनावर संकट ओढवणारा असल्याचे उत्तर येत्या काळातच मिळणार असले, तरी सध्या वारी परिसरात 'मगरींचा मुद्दा' तापला असून ☞(पान २ वर)

### वन विभागाचे स्पष्टीकरण-

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक आदर्श रेड्डी यांनी मात्र 'मगरी व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात सोडण्यात आल्या असून सामान्य नागरिकांच्या जीवितास धोका होण्याची शक्यता नाही,' असे स्पष्ट केले. वान रेंजचे वनपरिक्षेत्र अधिकारी एस. ए. आंबेकर यांनी 'वरिष्ठांच्या आदेशानुसार मगरी सोडण्यात आल्या. एका मगरीचा मृत्यू झाला असून अहवाल प्रतीक्षेत आहे,' असे सांगितले. वन्यजीव अभ्यासक विशाल बनसोड यांचे मत भिन्न आहे. 'मेळघाटात पूर्वीपासून मगरींचा अधिवास होता. वान धरणाचा बॅकवॉटर भाग मगरींसाठी पोषक आहे,' असे त्यांनी नमूद केले.

# न्यायाधीशांच्या घरांवर चोरट्यांचा डल्ला



**सीसीटीव्हीत कैद झाले संशयित**

अमरावती/प्रतिनिधीः-

न्यायाधीशांच्या घरांवर चोरट्यांनी डल्ला मारला असून १.२७ लाखांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे. येथील अमरावती जिल्हा व सत्र न्यायालय परिसरातील न्यायाधीश कॉलनी आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत झालेल्या घरफोड्यांमध्ये सुमारे १ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचा प्राथमिक अंदाज पोलिस पंचनाम्यातून व्यक्त करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

शनिवार-रविवारच्या सुट्टीमुळे पाच न्यायाधीश व दोन न्यायालयीन कर्मचारी बाहेरगावी गेले होते. त्यांच्या घरांना कुलूप असल्याची खात्री करून चोरट्यांनी डाव साधला. 'नल-दमयंती' इमारतीतील तीन घरांचे कुलूप ☞(पान २ वर)

### ■ १.२७ लाखांचा प्राथमिक अंदाज

या प्रकरणी पोलिस हवालदार अथर अली एजाज अली बेग यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पंचनाम्यानुसार सुमारे १ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचा अंदाज आहे. संबंधित न्यायाधीश व कर्मचारी सध्या बाहेरगावी असल्याने ते परत आल्यानंतर नेमका किती मुद्देमाल चोरीस गेला, याची स्पष्ट माहिती पुढील तपासात समोर येणार आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांवर काँग्रेसचा झेंडा फडकवण्यासाठी संघटन मजबूत करा

### -जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे कार्यकर्त्यांना आवाहन



**अमरावती/प्रतिनिधीः-** इंडियन नॅशनल काँग्रेसच्यावतीने आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस भवन येथे संघटनात्मक आढावा बैठक उत्साहात पार पडली. बैठकीस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी प्रमुख मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांना निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. यावेळी खासदार बळवंत वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती व हरिभाऊ मोहोड, सुधाकरराव भारसाकळे, प्रकाशराव काळबांडे, कांचनमाला गावंडे, रामेश्वरराव अभ्यंकर, प्रवीण मनोहर, दयारामजी काळे, राहुल येवले यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख म्हणाले, 'आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांवर काँग्रेसचा झेंडा फडकवायचा हा आपला निर्धार आहे. त्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने गावपातळीपर्यंत संघटन मजबूत करणे गरजेचे आहे. बूथ प्रमुखांनी आपापल्या क्षेत्रात सक्रिय ☞(पान २ वर)

# सुवर्णकार लुट प्रकरणाचा ४८ तासांत उलगडला

## ७ जणांची टोळी ताब्यात, शहर पोलिसांची कामगिरी

### -१ कोटी १२ लाखांचा मुद्देमाल जुप्त



अमरावती/प्रतिनिधीः-

शहरात धाडसी पद्धतीने सुवर्णकाराला लक्ष्य करत सोन्याचे दागिने व रोकड लुटणाऱ्या सात जणांच्या टोळीचा गुन्हे शाखेने अवघ्या ४८ तासांत पर्दाफाश केला. आरोपींना जेरबंद करण्यात आले असून त्यांच्या ताब्यातून तब्बल १ कोटी १२ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

१३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री ९ वाजता 'सुमित्रा ज्वेलर्स'चे मालक सुशांत शेरेकर हे दुकान बंद करून पोटे कॉलेज रोड, स्वावलंबी नगर येथून बालाजी नगरकडे निघाले होते. दुकानातील सोन्याचे दागिने आणि १.७० लाखांची रोकड त्यांनी मोपेडच्या डिक्कीत ठेवली होती. दरम्यान, पाठीमागून आलेल्या काळ्या चारचाकी वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. ते थांबताच गाडीतून उतरलेल्या तिघांनी चाकूचा धाक दाखवत चावी हिसकावली आणि डिक्कीतील सोन्याचे दागिने व रोकड जबरदस्तीने पळवली. पुढील तपासात सुमारे ७०० ग्रॅम सोन्याची लूट झाल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेची ☞(पान २ वर)

# अंजनगाव-अकोट मार्गावर अपघात, महिलेचा मृत्यू

### -दुचाकीसमोर कुत्रा आडवा आल्याने घटना





**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी-अकोट मार्गावरील कचरा डेपोसमोर दुचाकीसमोर अचानक कुत्रा आडवा आल्याने झालेल्या भीषण अपघातात एका ३८ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. हर्षा विनोद गिरी (वय ३८, रा. पणज, ता. अकोट) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, महामार्गावरील भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विनोद चैतन्य गिरी हे त्यांच्या पत्नी हर्षा यांच्यासह पांढरी येथून दि.१५ रोजी आपल्या गावी पणज (ता. अकोट) कडे दुचाकीने सायंकाळी ५ वाजता जात होते. अंजनगाव-अकोट रोडवर असलेल्या कचरा डेपोसमोर त्यांच्या दुचाकीसमोर अचानक एक कुत्रा आडवा आला. कुत्र्याला वाचवण्याच्या प्रयत्नात विनोद गिरी यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि दोघेही रस्त्यावर कोसळले. या अपघातात हर्षा यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

रस्त्यावरून जाणाऱ्या इतर वाहनचालकांनी तातडीने दोघांनाही जखमी अवस्थेत अंजनगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान हर्षा यांचा मृत्यू झाल्याचे ☞(पान २ वर)

# आर्वी हत्याकांड प्रकरणी सहा आरोपींना ५ दिवसांचा पीसीआर

### -शहानूर कॅनॉलमधील अर्धजळीत मृतदेहाचे प्रकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-**

वर्धा जिल्ह्यातील आर्वी येथील ३० वर्षीय तरुणाची हत्या करून पुरावे नष्ट करण्यासाठी मृतदेह जाळल्याच्या थरारक प्रकरणात अटक करण्यात आलेल्या सहा आरोपींना न्यायालयाने १३ फेब्रुवारी रोजी पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या गुन्ह्यात एका अल्पवयीन मुलालाही पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याविरुद्ध बाल न्याय कायद्यानुसार प्रक्रिया सुरू आहे.

अचलपूर तालुक्यातील वाघडोह-खोडगाव शिवार परिसरातील शहानूर कॅनॉलमध्ये बुधवारी सकाळी अर्धजळालेल्या अवस्थेत ☞(पान २ वर)

# डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाला अजिंक्यपद

### -राष्ट्रीय मूट ट्रायल व जजमेंट स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी



**अमरावती/प्रतिनिधीः-** एन.बी.टी विधी महाविद्यालय नाशिक तर्फे दिनांक १४ व १५ फेब्रुवारी रोजी आयोजित राष्ट्रीय मुट ट्रायल व जजमेंट रायटिंग स्पर्धेत डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाच्या चमुने उत्कृष्ट कामगिरी करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

डॉ.पंजाबराव देशमुख विधि महाविद्यालयाच्या चमुने उत्कृष्ट सांघिक पारितोषिका सोबत बेस्ट जजमेंट रायटिंग या स्पर्धेचे विजेतेपद व बेस्ट एडवोकेट ची २ बक्षिसे व बेस्ट विटनेस चे पारितोषिक मिळविले.

या स्पर्धेत पूर्ण देशातून ३० पेक्षा जास्त चमूंनी सहभाग नोंदवला होता. डॉ.पंजाबराव देशमुख विधी ☞(पान २ वर)

# नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवाचा उत्साहात शुभारंभ

### पर्यटन विकासातून स्थानिकांना रोजगार- पालकमंत्री ॲड.आकाश फुंडकर





**अकोला/प्रतिनिधीः-** गौरवशाली इतिहास व समृद्ध वनवैभव लाभलेल्या नरनाळा किल्ला परिसरातील पर्यटन विकासाला गती देण्यासाठी नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवाचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला. अकोट येथील पोपटखेड रस्त्यावर आयोजित कार्यक्रमात राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले.

यावेळी खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, अकोट नगराध्यक्ष माया धुळे, माजी आमदार संजय गावंडे, मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव श्रीकर परदेशी, पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी वर्षा मीना, उपवनसंरक्षक राहुलसिंह टोलिया, सरपंच विजय तायडे आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले, स्थानिक स्तरावर रोजगार व पूरक व्यवसाय वाढण्यासाठी पर्यटन क्षेत्राचा विकास आवश्यक आहे. नरनाळा परिसरात पर्यटनाच्या मोठ्या संधी असून या महोत्सवातून त्या अधिक सक्षमपणे पुढे येतील. आदिवासी व शेतकरी बांधवांना पर्यटनाच्या माध्यमातून रोजगारनिर्मितीची संधी उपलब्ध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पुढील वर्षी महोत्सव अधिक व्यापक स्वरूपात आयोजित करण्याचा मानसही त्यांनी व्यक्त ☞(पान २ वर)

# पल्लवी गुडधे मृत्यूप्रकरणी भुलतज्ज्ञ डॉक्टरविरुद्ध गुन्हा दाखल

### चौकशी समितीच्या अहवालातून निष्काळजीपणा उघड

अमरावती/प्रतिनिधीः-

बहुचर्चित पल्लवी गुडधे मृत्यूप्रकरणी जिल्हा स्त्री रुग्णालयातील भुलतज्ज्ञ डॉ. अनुप बोंद्रे यांच्याविरुद्ध राजापेठ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशी समितीच्या अंतिम अहवालात पल्लवी गुडधे यांचा मृत्यू भुलतज्ज्ञाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर शनिवारी सायंकाळी ही कारवाई करण्यात आली.

पल्लवी भूषण गुडधे (वय २८, रा. खारतळेगाव) या कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी १२ फेब्रुवारी रोजी डफरीन रुग्णालय येथे दाखल झाल्या होत्या. तपासणीनंतर त्या गर्भवती असल्याचे निष्पन्न झाल्याने १३ जानेवारी रोजी त्यांचा गर्भपात करण्यात आला. त्यानंतर १६ जानेवारी रोजी डॉक्टरांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचा सल्ला दिला. मात्र, त्या वेळी पल्लवी यांची प्रकृती पूर्णतः स्थिर नव्हती. असे असतानाही लक्ष्य पूर्ण करण्याच्या उद्देशाने १६ जानेवारी रोजी पल्लवी यांच्यावर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आली. या प्रक्रियेदरम्यान त्यांना भूल देण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर पल्लवी यांची प्रकृती अचानक खालावली, त्यांच्या अंगावर सूज येऊ लागली. त्यामुळे त्यांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले.

मात्र, रात्री उशिरापर्यंतही प्रकृतीत सुधारणा न झाल्याने नातेवाईकांनी पल्लवी यांना रेडिएंट हॉस्पिटल येथे दाखल केले. १६ ते २३ जानेवारी या कालावधीत त्यांच्यावर तेथे उपचार सुरू होते. अखेर उपचारादरम्यान पल्लवी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

डफरीन रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच पल्लवी यांचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. या प्रकरणी त्यांनी जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्तांची भेट घेऊन संपूर्ण प्रकार निदर्शनास आणून दिला. ☞(पान २ वर)

# हर हर महादेवाचा गजर..., महाशिवरात्री उत्साहात

## आ.सुलभा खोडकेंनी घेतले शिव-शक्ती चे कृपाशीर्वाद







**अमरावती/प्रतिनिधीः-**

महाशिवरात्री हा केवळ एक सण नाही, तर तो आत्मचिंतनाचा, जागृतीचा आणि शिवतत्वाशी एकरूप होण्याचा पावन क्षण आहे. वर्षातून येणारी ही अंधारातील रात्र मनाला प्रकाशाकडे नेणारी आहे. ज्या रात्री संपूर्ण सृष्टी ध्यानमग्न होते, त्या रात्री भोळ्या भावीकांच्या हृदयात शिवचैतन्य जागृत होते. ' शिव म्हणजे कल्याण, शिव म्हणजे शांती आणि शिव म्हणजे सत्य ' अशा या भगवान श्री महादेवांचा महिमा शब्दात मानणे कठीण असले, तरी भावनेतून अनुभवता येतो.भगवान महादेवांच्या उपासनेमध्ये मनातील, आत्म्यातील अशुद्धी दूर करण्याचे सामर्थ्य आहे.आपल्या भौतिक पातळीवर शिव - पार्वती म्हणजे शिव - शक्ती या देवस्वरूप व्यक्तीरेखा त्यांच्या उपासना, पूजन, ध्यान यांच्या द्वारा संतुलन साधणे ही महाशिवरात्रीची साधना होय. शिव - शक्तीची संकल्पना नीट समजून घेतली तर होणाऱ्या आनंदातून वेगळी अनुभूती येऊ शकते.असे प्रतिपादन आमदार सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले.

रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर आयोजित ☞(पान २ वर)

# सदाशिवराव पातूर्डे यांचे निधन



**अमरावती/प्रतिनिधीः-**

स्थानिक राजापेठ येथील प्रमोद कॉलनी निवासी आणि सेवानिवृत्त तलाठी सदाशिवराव बाळसा पातूर्डे यांचे (दि.१५) दिर्घ आजाराने त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. मृत्यू समयी ते ९१ वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर हिंदू स्मशान भूमि येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी कमलताई, आणि गजानन, अरूण, धनंजय हे तीन मुले, सुना नातवंड असा आप्तपरिवार आहे.